CMYK

# सोलापूर तरुण भारत

SOLAPUR TARUN BHARAT

न मे कर्मफले स्पृहा

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | शनिवार, ४ जुलै २०२६ । युगाब्द ५१२८ । वर्ष ४२ वे अंक २१६ । पाने १२ । किंमत रु. ८/-

| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |

ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही

dainiktarunbharat.com

epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प



जो निःसंग आणि निर्लेप आहे. ज्याचे जवळ अहंकार नाही, ज्याचे जवळ धैर्य आहे. ज्याच्या मनात आकांक्षा आणि उत्साह आहे, जो कर्माच्या सिद्धी-असिद्धीने किंवा लाभ-हानीने विचलित होत नाही त्यालाच सात्विक कार्यकर्ता म्हणतात.

**- स्व. सुरेशराव केतकर**
रा. स्व. संघाचे पूर्व सह सरकार्यवाह

## महत्त्वाचे

### शेअर बाजारात सलग तिसऱ्या दिवशी तेजी

**मुंबई :** शेअर बाजारात सलग तिसऱ्या सत्रात तेजीचे वातावरण पाहायला मिळाले. आयटी, फार्मा, मेटल आणि रियल्टी समभागांमध्ये झालेल्या जोरदार खरेदीमुळे शुक्रवारी निफ्टी २४,२५० च्या वर बंद झाला. बाजाराची सुरुवात मजबूत झाली. त्यानंतर व्यवहार जसजसे पुढे सरकले, तशी निर्देशांकांनी आपली घोडदौड कायम ठेवली. या तेजीदरम्यान निफ्टी ५० ने २४,३७८.१५ या ऐतिहासिक उच्चांकाला स्पर्श केला. मात्र, दुपारनंतरच्या सत्रात गुंतवणूकदारांनी नफा वसुलीला प्राधान्य दिल्यामुळे बाजाराने सर्वोच्च पातळीवरून काहीशी माघार घेतली.

# शाळांपासून ५०० मीटर परिसरात 'स्टिंग' एनर्जी ड्रिंक विक्रीवर बंदी

## विद्यार्थ्यांच्या आरोग्यरक्षणासाठी सरकार सतर्क-झिरवळ यांची घोषणा



पावसाळी अधिवेशन





एआय निर्मित छायाचित्र

**मुंबई, ३ जुलै**

शालेय विद्यार्थ्यांच्या आरोग्याशी थेट निगडित असलेल्या एका महत्त्वाच्या मुद्द्यावर राज्य सरकारने विधानसभेत ठोस भूमिका घेताना शाळांच्या परिसरात विद्यार्थ्यांच्या आरोग्यास हानिकारक ठरणारे अन्नपदार्थ तसेच कॅफिनयुक्त पेये विकणाऱ्यांवर प्रचलित कायद्यानुसार कठोर कारवाई करण्यात येईल, अशी महत्त्वपूर्ण माहिती अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांनी दिली. तरुणाई आणि शाळकरी मुलांमध्ये कमालीची क्रेझ असलेल्या 'स्टिंग' या एनर्जी ड्रिंकवर आता शाळांच्या ५०० मीटर परिसरात विक्री करण्यास पूर्णपणे बंदी घालण्यात येणार आहे, असे झिरवळ यांनी सांगितले.

भाजप आमदार विक्रम पाचपुते यांनी विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासादरम्यान 'स्टिंग' ड्रिंकच्या दोन बाटल्या थेट सभागृहात आणून या अत्यंत गंभीर मुद्दा उपस्थित केला. त्यावर उत्तर देताना झिरवळ यांनी सदर घोषणा केली. शाळा परिसरामध्ये ज्याप्रमाणे अंमली पदार्थांच्या विक्रीवर कायदेशीर निर्बंध लादले जातात, अगदी त्याच धर्तीवर या एनर्जी ड्रिंकच्या विक्रीवरही कडक बंदी घालण्यात येईल आणि त्याचे आवश्यक आदेश प्रशासनातर्फे तातडीने जारी केले जातील, असे आश्वासन देखील मंत्र्यांनी यावेळी सभागृहात दिले.

भाजप आमदार राहुल कुल यांनी ऊर्जा देण्याच्या नावाखाली शाळा परिसरात चालणाऱ्या इतर धक्कादायक बाबींकडे सभागृहाचे लक्ष वेधले. शाळा परिसरात 'फ्लेवर पान'च्या नावाखाली शाळकरी मुलांना अंमली पदार्थ विकले जात असून, 'फ्लेवर मिल्क' म्हणून जास्त साखर आणि घातक कृत्रिम द्रव्ये वापरून मुलांचे आरोग्य धोक्यात आणले जात आहे, या प्रकरणाची सखोल चौकशी व्हावी अशी मागणी त्यांनी केली. यावर स्पष्टीकरण देताना मंत्री नरहरी झिरवळ यांनी सांगितले की, या सर्व गंभीर बाबींची शासनाने दखल घेतली असून सध्या वरिष्ठ अधिकारी तुकाराम मुंढे यांच्या मार्गदर्शनाखाली राज्यात विशेष तपासणी आणि कडक कारवाईची मोहीम सुरू करण्यात आली आहे. (तभा वृत्तसेवा)

### अहिल्यानगर जिल्ह्यात दोन मुलांचा मृत्यू

अहिल्यानगरमधील श्रीगोंदा आणि पाथर्डी येथे 'स्टिंग'च्या अतिसेवनामुळे हृदयाचे ठोके अचानक वाढून लहान मुलांचा मृत्यू झाल्याच्या अत्यंत दुर्दैवी घटना समोर आल्याचे आमदार विक्रम पाचपुते यांनी सांगितले. या पेयामध्ये विद्यार्थ्यांच्या आरोग्यास तीव्र हानी पोहोचवणारे कॅफिन, अतिप्रमाणातील साखर आणि 'कार्मोजिन'सारखे कृत्रिम रंग सर्रास वापरले जात आहेत. विशेष म्हणजे, या पेयाच्या बाटलीवर 'लहान मुलांसाठी आणि गर्भवती महिलांसाठी हे पेय योग्य नाही' असा स्पष्ट इशारा लिहिलेला असतो. तरीही शाळा-कॉलेजच्या कॅन्टीन आणि आसपासच्या परिसरात याची दारूपेक्षाही घातक पद्धतीने विक्री होत असल्याचा गंभीर आरोप पाचपुते यांनी केला.

# दोषींना कठोर शिक्षा मिळणे अत्यावश्यक

## सरकार्यवाह होसबळे यांचे वक्तव्य

**नवी दिल्ली, ३ जुलै**

अयोध्येतील श्रीरामलला मंदिरातील दानपेट्यांमधून रक्कम चोरी झाल्याच्या घटनेने संपूर्ण समाज आणि रामभक्तांच्या भावना दुखावल्या आहेत आणि आम्ही सर्व या घटनेने अत्यंत दुःखी झालो आहोत. या प्रकरणाचा तपास करण्यासाठी विशेष तपास पथकाची स्थापना करण्यात आली असून दोषींना कठोर शिक्षा होणे अत्यावश्यक आहे, असे मत राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरकार्यवाह दत्तात्रेय होसबळे यांनी शुक्रवारी व्यक्त केले.

कोट्यवधी रामभक्तांचे समर्पण पिढ्यान्पिढ्यांचा संघर्ष आणि आणि बलिदानानंतर श्रीरामजन्मभूमीवर बांधलेले भव्य मंदिर संपूर्ण हिंदू समाजासाठी आदर, श्रद्धा आणि भक्तीचे केंद्र बनले आहे. श्रीराम जन्मभूमी तीर्थ क्षेत्र विश्वस्त मंडळाच्या निवेदनानंतर उत्तरप्रदेश सरकारने विशेष तपास पथकाची स्थापना करून त्यानुसार कायदेशीर कारवाईला सुरुवात केली आहे. तपासात जे दोषी आढळतील त्यांना कठोर शिक्षा होईल, हे निश्चित करणे आवश्यक आहे.





# सिया-चेतनची सांकेतिक भाषा; दुसरा मोबाईल जप्त

केतन अग्रवाल हत्या प्रकरण



**पुणे, ३ जुलै**

केतन अग्रवाल हत्या प्रकरणात आरोपी सिया गोयल आणि चेतन चौधरी हे परस्परांशी सांकेतिक भाषा आणि निकनेमचा वापर करून संवाद साधत असल्याचे तपासात समोर आले आहे. दोघांची समोरासमोर चौकशी आवश्यक असल्याचे सांगत पोलिसांनी न्यायालयाकडे तीन दिवसांच्या पोलिस कोठडीची मागणी केली. मात्र, न्यायालयाने ही मागणी फेटाळून दोन्ही आरोपींना १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली आहे. सिया गोयल आणि चेतन चौधरी यांची पोलिस कोठडीची मुदत शुक्रवारी संपत असल्याने त्यांना वडगाव मावळ येथील न्यायालयात हजर केले असता त्यांना न्यायालयीन कोठडी सुनावली आहे.

सिया गोयलने केतन अग्रवालचा पासपोर्ट फाडल्याचा संशय असलेल्या ठिकाणाचाही पंचनामा करण्यात आला असून, तिचे कपडे आणि सियाचा दुसरा मोबाईलही जप्त करण्यात आला आहे. नव्याने जप्त करण्यात आलेल्या मोबाइलमधील डिलीट डेटा रिकव्हर करण्यात आला आहे. त्यामध्ये दोन्ही आरोपींनी सांकेतिक भाषा आणि निकनेमचा वापर करून संवाद साधल्याचे दिसले आहे.

सरकारी वकीलांनी युक्तिवाद करताना, सिया गोयल तपासात पूर्ण सहकार्य करत असल्याचे सांगितले. (तभा वृत्तसेवा)



सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



# प्रमाणपत्र नव्हे, प्रत्यक्ष लाभ द्या; महिला शेतकऱ्यांसाठी आ. पाटलांची भूमिका

## ३ लाखांपर्यंत बिनव्याजी कर्ज, शेतीपूरक उद्योगांसाठी स्वतंत्र निधी आणि प्रत्येक मतदारसंघात समिती स्थापन करण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ३ जुलै-**

महिला शेतकरी विविध कार्यकारी धोरण विधेयकावर विधानसभेत झालेल्या चर्चेदरम्यान माढा विधानसभा मतदारसंघाचे आमदार अभिजीत पाटील यांनी महिला शेतकऱ्यांच्या सक्षमीकरणासाठी ठोस आणि परिणामकारक उपाययोजनांची जोरदार मागणी केली. महिलांना केवळ प्रमाणपत्र देऊन थांबू नका, त्या प्रमाणपत्राच्या माध्यमातून प्रत्यक्ष लाभ मिळेल अशी प्रभावी यंत्रणा उभी करा, असे स्पष्ट मत त्यांनी सभागृहात मांडले.

महिला शेतकऱ्यांना ओळख देण्यासाठी प्रमाणपत्र देण्याचा निर्णय स्वागतार्ह असला, तरी त्याचा उपयोग केवळ कागदापुरता मर्यादित राहू नये, असे सांगत त्यांनी प्रमाणपत्रधारक महिलांना शासकीय योजनांचा थेट आणि प्राधान्याने लाभ मिळावा, यासाठी स्वतंत्र अंमलबजावणी यंत्रणा निर्माण करण्याची मागणी केली. महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी कुक्कुटपालन, मत्स्यपालन, चारा लागवड, मधमाशी पालन, जलसंवर्धन, रेशीम उद्योग, गांडूळ खत निर्मिती आणि फलोत्पादन अशा शेतीपूरक उद्योगांसाठी स्वतंत्र आर्थिक तरतूद करण्यात यावी, तसेच महिलांच्या नावावरील प्रकल्पांना शासनाच्या योजनांमध्ये प्राधान्य देण्यात यावे, अशीही त्यांनी भूमिका मांडली.

यावेळी त्यांनी आर्थिक मागणी करत सांगितले की, ज्या पद्धतीने शेतकऱ्यांना तीन लाख रुपयांपर्यंत बिनव्याजी पीक कर्जाची सुविधा उपलब्ध आहे, त्याच धर्तीवर प्रमाणपत्रधारक महिला शेतकऱ्यांनाही उद्योग उभारण्यासाठी तीन लाख रुपयांपर्यंत बिनव्याजी कर्ज देण्यात यावे. महिलांना आर्थिक बळ मिळाल्यास त्या स्वावलंबी होतील आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला नवी चालना मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. महिला शेतकरी योजनांची माहिती प्रत्येक गावातील महिलांपर्यंत पोहोचावी यासाठी गावोगावी जनजागृती शिबिरे, मार्गदर्शन अभियान आणि विशेष संपर्क मोहीम राबविण्याचीही त्यांनी मागणी केली. अनेक महिलांना शासनाच्या योजनांची माहिती नसल्यामुळे त्या लाभापासून वंचित राहतात, याकडे त्यांनी सभागृहाचे लक्ष वेधले. योजनांची अंमलबजावणी करण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात आणि प्रत्येक विधानसभा मतदारसंघात लोकप्रतिनिधींच्या सहभागातून स्वतंत्र समिती स्थापन करण्यात यावी. या समित्यांमार्फत योजनांचे नियोजन, अंमलबजावणी आणि लाभार्थ्यांपर्यंत पोहोचण्याची प्रक्रिया अधिक परिणामकारक होईल, असे त्यांनी नमूद केले.



> महिला शेतकरी प्रमाणपत्रासोबत प्रत्यक्ष लाभ देणारी स्वतंत्र अंमलबजावणी यंत्रणा उभारावी. कुक्कुटपालन, मत्स्यपालन, मधमाशी पालन, रेशीम उद्योग, फलोत्पादन आदी आठ शेतीपूरक उद्योगांसाठी स्वतंत्र निधी द्यावा. प्रमाणपत्रधारक महिला शेतकऱ्यांना उद्योग उभारण्यासाठी ३ लाख रुपयांपर्यंत बिनव्याजी कर्ज उपलब्ध करून द्यावे. महिलांच्या नावावरील प्रकल्पांना शासकीय योजनांमध्ये प्राधान्य द्यावे. प्रत्येक गावात जनजागृती शिबिरे व मार्गदर्शन अभियान राबवावे. प्रत्येक विधानसभा मतदारसंघात लोकप्रतिनिधींच्या सहभागातून स्वतंत्र समिती स्थापन करून योजनांच्या अंमलबजावणीवर देखरेख ठेवावी.
>
> - **अभिजीत पाटील,** आमदार

## महत्वाचे...



### डॉक्टर्स डे निमित्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सतीश कोपूरवाड यांचा गौरव

**सोलापूर, दि. ३ जुलै-**

डॉक्टर्स डे निमित्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सतीश कोपूरवाड यांचा आरोग्य क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल विशेष सन्मान करण्यात आला. फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया, इंडियन रेडक्रॉस सोसायटी आणि डी.एस.टी.एस. मंडळ कॉलेज ऑफ फार्मसी यांच्या संयुक्त विद्यमाने शिवदारे कॉलेज येथे आयोजित पुरस्कार वितरण सोहळ्यात ज्येष्ठ शल्यचिकित्सक डॉ. विजय कानेटकर यांच्या हस्ते त्यांना सन्मानचिन्ह प्रदान करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राजशेखर शिवदारे होते. नांदेड जिल्हा आरोग्य अधिकारी म्हणून कार्यरत असताना 'टीबी मुक्त भारत अभियान' यशस्वीपणे राबवून जिल्ह्याला राज्यात दुसरा क्रमांक मिळवून देण्यात त्यांचे महत्त्वपूर्ण योगदान होते. एप्रिल २०२६ पासून सोलापूर जिल्हा आरोग्य अधिकारी म्हणून त्यांनी ग्रामीण आरोग्य सेवा, लसीकरण, माता-बाल आरोग्य आणि जनजागृती उपक्रमांना गती दिली असून त्यांच्या कार्याचा गौरव म्हणून हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.



### विविध प्रश्नांबाबत खासदार ज्योती वाघमारे यांना निवेदन

**सोलापूर, दि. २ जुलै-**

शिवसेनेच्या खासदार डॉ. प्रा. ज्योती वाघमारे यांना सोलापुरातील शहराच्या विविध प्रश्नांवर संभाजी ब्रिगेडच्या वतीने शासकीय विश्राम गृह मध्ये भेट घेऊन शहरातील विविध प्रश्नांवर चर्चा करून निवेदन देण्यात आले. खा. वाघमारे यांची संभाजी ब्रिगेडच्या शिष्टमंडळाने शासकीय विश्रामगृहामध्ये भेट घेऊन त्यांचा शाल व छत्रपती संभाजी महाराजांची मूर्ती देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी विजापूर रोड वरील छत्रपती संभाजी महाराज तलाव येथे छत्रपती संभाजी महाराज यांच्या पराक्रमी इतिहासाच्या जीवनपटावर आधारित विविध प्रसंगाचे भित्ती शिल्पे उभारण्यात येणार असून, त्यासाठी निधी सुद्धा मंजूर झाला आहे आणि लवकरच त्या कामाचे उद्‌घाटन करण्यात येणार असल्याची माहिती संभाजी ब्रिगेडच्या शिष्टमंडळाला देऊन कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचे आमंत्रणही दिले. यावेळी संभाजी ब्रिगेडचे पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष श्याम कदम, संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष संभाजीराजे भोसले, महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्षा मीनल दास, शहराध्यक्ष शिरीष जगदाळे, ॲड. बाबासाहेब सपाटे, जिल्हा कार्याध्यक्ष शेखर भोसले, संतोष सुरवसे, विक्रम वानकर, जैनुद्दीन नदाफ, प्रकाश डोंगरे, सतीश वावरे उपस्थित होते.



### महापालिकेच्या सफाई कर्मचाऱ्यांना तातडीने रेनकोट देण्याची मागणी

**सोलापूर, दि.३ जुलै-**

पावसाळ्यात जीवाची पर्वा न करता शहराची स्वच्छता आणि ड्रेनेज व्यवस्थेची जबाबदारी पार पाडणाऱ्या घनकचरा व्यवस्थापन विभागातील वर्ग-४ कर्मचारी तसेच सार्वजनिक अभियंता (ड्रेनेज) विभागातील कर्मचाऱ्यांना तातडीने पावसाळी रेनकोट उपलब्ध करून द्यावेत, अशी मागणी महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर ट्रेड युनियनच्या वतीने महापौर विनायक कोंडयाल यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली. झाडूवाले, सफाई कर्मचारी, गटार बिगारी व ड्रेनेज बिगारी हे कर्मचारी पावसात भिजत नियमित सेवा बजावत असून त्यामुळे विविध आजारांचा धोका वाढत असल्याचे नमूद करण्यात आले आहे. दरवर्षी महापालिकेकडून रेनकोट उपलब्ध करून दिले जात असले, तरी यंदा अद्याप त्यांचे वितरण झाले नसल्याची खंतही व्यक्त करण्यात आली. यावर महापौर विनायक कोंडयाल यांनी संबंधित विभागाला तातडीने आवश्यक सूचना देऊन रेनकोट वाटपाची कार्यवाही करण्याचे आश्वासन दिल्याचे शिष्टमंडळाने सांगितले. यावेळी कामगार नेते बापूसाहेब सदाफुले, सफाई कामगार नेते श्रीनिवास रामगल, ट्रेड युनियनचे मार्गदर्शक इकबाल तडकल, खजिनदार अरुण म्हेत्रे, नरेश कदम, आकाश शिवशरण उपस्थित होते.

### तृतीयपंथीयांसाठी शिष्यवृत्ती, स्वयंरोजगारासाठी बीज भांडवल योजना

**सोलापूर, दि. ३ जुलै-**

सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालय, भारत सरकार यांच्या Support for Marginalized Individuals for Livelihood and Enterprise या केंद्रीय क्षेत्र योजनेंतर्गत तृतीयपंथीयांच्या शैक्षणिक, आर्थिक व सामाजिक सक्षमीकरणासाठी शिष्यवृत्ती योजना तसेच स्वयंरोजगार व व्यवसायासाठी बीज भांडवल योजना राबविण्यात येत आहे. पात्र तृतीयपंथीयांनी या योजनांचा लाभ घेण्यासाठी अर्ज करावेत, असे आवाहन सहायक आयुक्त, समाज कल्याण, सोलापूर यांच्या वतीने करण्यात आले आहे. तृतीयपंथी विद्यार्थ्यांसाठीची शिष्यवृत्ती योजना केंद्र शासनाच्या राष्ट्रीय पोर्टलवरून राबविण्यात येत असून, शासनमान्य अथवा खासगी शाळा, महाविद्यालये व विद्यापीठांमध्ये इयत्ता नववीपासून पदव्युत्तर पदवीपर्यंत शिक्षण घेणारे तृतीयपंथी विद्यार्थी या योजनेस पात्र आहेत. अर्जदार भारतीय नागरिक असणे तसेच सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालयाच्या राष्ट्रीय पोर्टलवरून जारी करण्यात आलेले तृतीयपंथी ओळख प्रमाणपत्र असणे आवश्यक. विद्यार्थ्यांनी https://transgender.dosje.gov.in या पोर्टलवर नोंदणी करून ऑनलाइन अर्ज करावा.

## अपघातमुक्त सांगोलाच्या दिशेने; सांगोला पोलिसांचा जनजागृती उपक्रम



**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. ३ जुलै-**

सांगोला पोलीस ठाण्याच्या वतीने तालुक्यात वाढत्या रस्ते अपघातांचे प्रमाण कमी करण्यासाठी तसेच नागरिकांमध्ये वाहतूक नियमांबाबत जनजागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने अभिनव उपक्रम राबविण्यात आला असून सांगोला पोलीस ठाण्याचे अधिकारी व कर्मचारी यांच्या उपस्थितीत या उपक्रमाची सुरुवात करण्यात आली. या उपक्रमांतर्गत सांगोला शहर व परिसरातील प्रमुख रस्त्यांवर वाहतूक नियमांचे पालन, हेल्मेटचा वापर, वेगमर्यादा, मद्यपान करून वाहन न चालविणे, तसेच निष्काळजी वाहन चालविण्याचे दुष्परिणाम याबाबत जनजागृती करणारे आकर्षक फलक उभारण्यात आले आहेत. तसेच अपघातग्रस्त दुचाकी वाहन प्रदर्शित करून अपघाताच्या भीषण परिणामांची जाणीव नागरिकांना करून देण्यात येत आहे. वाहनचालकांनी वाहतूक नियमांचे काटेकोर पालन करावे, हेल्मेट व सीटबेल्टचा नियमित वापर करावा, वेगमर्यादेचे पालन करावे आणि सुरक्षित प्रवास करून स्वतःसह इतरांच्याही जीविताचे रक्षण करावे असे आवाहन सांगोला पोलिसांच्या वतीने करण्यात आले आहे.




## आज सत्कार घेताय, उद्या दुसऱ्याचा सत्कार कराल अशी कामगिरी करा : प्रकाश राठोड

### गुणवंत विद्यार्थी, कृषिरत्न शेतकरी व सेवानिवृत्त अधिकाऱ्यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ जुलै-**

आज तुम्ही सत्कार घेत आहात, उद्या दुसऱ्याचा सत्कार कराल अशी उल्लेखनीय कामगिरी करा. तुमचे यश समाजासाठी प्रेरणादायी ठरावे, असे आवाहन माजी सहाय्यक आयुक्त तथा विशेष कार्यकारी अधिकारी प्रकाश राठोड यांनी केले.

माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक जयंतीनिमित्त विजापूर रोडवरील द्वारकाधीश मंदिर हॉल येथे राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली बंजारा समाजातील गुणवंत विद्यार्थी, कृषिरत्न शेतकरी तसेच सेवानिवृत्त व पदोन्नतीप्राप्त अधिकारी-कर्मचाऱ्यांचा सत्कार सोहळा उत्साहात पार पडला. यावेळी दहावी-बारावी परीक्षेत ७० टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळवलेल्या ६० विद्यार्थी-विद्यार्थिनींचा प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. प्रास्ताविक काशिनाथ भतगुणकी, आभार स्वाती कलशेट्टी यांनी मानले. कार्यक्रमास माजी शिक्षणाधिकारी भांजे, अंकुश राठोड, शैलजा राठोड, नेहरू राठोड, उमेश चव्हाण, राहुल राठोड, दीपक पवार, चंदू खडाखडे, संतोष जाधव, विनोद राठोड उपस्थित होते.

### रविवारी कुंभार समाजातील गुणवंतांचा सत्कार

**सोलापूर, दि. ३ जुलै-**

निलम नगर येथील नेताजी सुभाषचंद्र बोस कन्नड भाषा व कन्नड संस्कृती संवर्धक कुंभार समाज शिक्षण प्रसारक मंडळाच्यावतीने शहर जिल्ह्यातील कुंभार समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार रविवार दि.५ जुलै रोजी सकाळी दहा वाजता होणार आहे.

गेल्या पंधरा वर्षांपासून समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देऊन सत्कार करण्यात आले आहे.अत्तापर्यंत समाजातील हजारो विद्यार्थ्यांनी लाभ घेतला आहे.यावर्षीही समाजातील ७५ टक्केहून अधिक गुण घेतलेल्या दहावी व बारावी विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा निलम नगर येथील नेताजी सुभाषचंद्र बोस प्रशालेच्या प्रांगणात होणार असून समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांनी आपल्या पालकांसह उपस्थित रहावे असे आवाहन संस्था अध्यक्ष अण्णाराव कुंभार यांनी केले आहे.संपर्क विठ्ठल कुंभार (९४२३५२७०७१), चंद्रकुमार कुंभार (९३७००२०३९६)

## एकही दिव्यांग व्यक्ती शासकीय योजनेपासून वंचित राहणार नाही याची दक्षता घ्या

### अप्पर जिल्हाधिकारी गणेश निऱ्हाळी यांचे निर्देश




**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ जुलै-**

जिल्ह्यातील दिव्यांगासाठी असलेल्या विविध शासकीय योजना त्यांच्यापर्यंत पोहोचल्या पाहिजेत; या दृष्टीने सर्व शासकीय विभागांनी प्रयत्न करावेत. तसेच शहरी भागाबरोबरच ग्रामीण भागातील एकही दिव्यांग व्यक्ती शासकीय योजना व लाभांपासून वंचित राहणार नाही, याची संबंधित सर्व विभागांनी दक्षता घ्यावी, असे स्पष्ट निर्देश अपर जिल्हाधिकारी गणेश निऱ्हाळी यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील अप्पर जिल्हाधिकारी यांच्या दालनात आयोजित जिल्हास्तरीय दिव्यांग सक्षमीकरण बैठकीत निऱ्हाळी मार्गदर्शन करत होते. यावेळी उपजिल्हाधिकारी संतोषकुमार देशमुख, सह आयुक्त नगरपालिका प्रशासन अशिष लोकरे, जिल्हा दिव्यांग अधिकारी सुलभा वटारे, संजय गांधी योजनेचे तहसिलदार शिल्पा पाटील, कामगार कल्याण अधिकारी अजितकुमार खानसोळे, महाराष्ट्र राज्य दिव्यांग वित्त व विकास महामंडळाच्या प्रिती पासकंटी, प्राथमिक शिक्षण विभागाचे विस्तार अधिकारी सुहास गुरव, अशासकीय सदस्य दत्तात्रय मोकाशी उपस्थित होते. यावेळी बैठकीत दिव्यांग विवाह प्रोत्साहन अनुदान, शारीरिकदृष्ट्या दिव्यांग व्यक्तींना लघु उद्योगासाठी अर्थसहाय्य बीज भांडवल योजना, पूर्व माध्यमिक विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती, जिल्हा परिषद ५ टक्के सेस फंडातून शेळी गट, झेरॉक्स मशीन, मिरची कांडप व ई-बाईक अशा विविध योजनांचा आढावा घेण्यात आला.



## एमआयटी स्कूलमध्ये डॉक्टर्स डे साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ जुलै-**

समाजाच्या आरोग्यरक्षणासाठी अहोरात्र निस्वार्थ सेवा करणाऱ्या वैद्यकीय क्षेत्रातील डॉक्टरांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याच्या उद्देशाने एमआयटी विश्वशांती गुरुकुल स्कूल येथे डॉक्टर्स डे साजरा करण्यात आला.

कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. विशाल गोरे उपस्थित होते. यावेळी ज्युनियर कॉलेजचे प्राचार्य राजकुमार गायकवाड, प्राचार्या रूपाली हजारे उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात प्रार्थनेने झाली. त्यानंतर प्रमुख पाहुण्यांचे स्वागत व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. आपल्या मनोगतात प्राचार्या हजारे यांनी डॉक्टर हे समाजाचे खरे सेवक असून निरोगी समाज घडविण्यात त्यांचे योगदान अनमोल असल्याचे सांगितले. प्रमुख पाहुणे डॉ. विशाल गोरे यांनी विद्यार्थ्यांना आरोग्यदायी जीवनशैली, स्वच्छतेचे महत्त्व तसेच प्रतिबंधात्मक आरोग्यसेवेची आवश्यकता याविषयी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सरस्वती कांबळे, नमिता अथणीकर, आयेशा महाजन, अनुपमा कोठावडे, श्रेया माशाळ यांनी परिश्रम घेतले.

## लायन्स क्लब सिटीतर्फे डॉक्टर, शेतकरी, सीए दिन साजरा

**सोलापूर दि. ३ जुलै-**

लायन्स इंन्टरनॅशनल अंतर्गत लायन्स क्लब सोलापूर सिटी व विणकामबाग प्रभात मंडळ आयोजित एक जुलै रोजी डॉक्टर दिन, शेतकरी दिन डे, अकाउटंट दिनी सत्कार सोहळा साखरपेठ विणकर बाग येथे साजरा करण्यात आला. डॉ. स्नेहा सिंग रोडा, डॉ. अक्षय आप्पासाहेब आनंद शेट्टी, डॉ. सिद्धी सुहास जकोटिया, डॉ. प्रकाश कल्याणी, इंजिनीयर गणेश इंदापुरे, शेतकर अशोक देविदास चव्हाण आदींचा सन्मान करण्यात आला. स्वागत व शुभेच्छा लायन्स क्लबचे अध्यक्ष व विणकर बागेच अध्यक्ष मोहन भूमकर यांनी केले. वनराज बंडी यांनी आभार मानले. कार्यक्रमास बाबू नागेश कन्ना, चव्हाण, सुनील पवार, शंकर कणकी, मुरली कणकी, सोमशेखर भोगडे, सुरेश श्रीगिरी उपस्थित होते.



## जिल्हा परिषदेचे 'स्टॉप डायरिया' अभियान

### पावसाळ्यात अतिसाराला रोखण्यासाठी ३१ जुलैपर्यंत मोहीम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ जुलै-**

पावसाळ्यात दूषित पाणी आणि अस्वच्छतेमुळे वाढणाऱ्या अतिसारजन्य आजारांना आळा घालण्यासाठी सोलापूर जिल्ह्यात ३१ जुलैपर्यंत स्टॉप डायरिया अभियान-२०२६ राबविण्यात येणार आहे. या अभियानात सुरक्षित पिण्याचे पाणी, स्वच्छता, हात धुण्याची सवय आणि पाणी गुणवत्तेची तपासणी यावर विशेष भर देण्यात येणार असल्याची माहिती जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन यांनी दिली.

अभियानांतर्गत तालुका आणि ग्रामस्तरावर विशेष बैठका घेऊन ग्रामपंचायती, पाणीपुरवठा व स्वच्छता समित्या, शाळा आणि अंगणवाडी केंद्रांमध्ये जनजागृती केली जाईल. गावनिहाय पाणी गुणवत्तेची तपासणी, जलस्रोतांची नियमित चाचणी, फिल्ड टेस्ट किटद्वारे विद्यार्थी व स्वयंसेवकांना प्रशिक्षण, पाणीपुरवठा यंत्रणेतील गळती दुरुस्ती, पाण्याच्या टाक्यांची स्वच्छता व निर्जंतुकीकरण तसेच पिण्याच्या पाण्याचे नियमित क्लोरीनीकरण यावर विशेष भर दिला जाणार आहे.

> **पालकांना विशेष आवाहन**
>
> पाच वर्षांखालील बालकांचे नियमित सर्वेक्षण करून घ्यावे. अतिसाराची लक्षणे आढळल्यास विलंब न करता आशा सेविका किंवा जवळच्या आयुष्यमान आरोग्य मंदिराशी तात्काळ संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सतीश कोपूरवाड यांनी पालकांना केले आहे.

> **प्रतिबंध हाच सर्वोत्तम उपाय**
>
> उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी व स्वच्छता) अमोल जाधव यांनी सांगितले की, सुरक्षित पाणी, स्वच्छता आणि चांगल्या सवयींच्या माध्यमातून अतिसारमुक्त व निरोगी जिल्हा घडविण्यासाठी प्रत्येक नागरिकाने अभियानात सक्रिय सहभाग नोंदवणे आवश्यक आहे. प्रतिबंध हाच सर्वोत्तम उपाय असून नागरिकांच्या सहकार्यामुळे हे अभियान प्रभावी ठरेल.



## राजर्षी शाहू महाराजांना शाक्य संघाची बिगुल वाजवून अनोखी मानवंदना

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ जुलै-**

आरक्षणाचे जनक राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त कोल्हापुरातील जन्मस्थळ आणि ऐतिहासिक दसरा चौक येथे नियोजित शाक्य संघ तसेच माता रमाई महिला ब्रिगेडच्या वतीने बिगुल वाजवून अनोखी मानवंदना देण्यात आली. विशेष ड्रेस कोडमध्ये सहभागी झालेल्या सेवानिवृत्त पोलीस अधिकारी, कर्मचारी आणि पोलीस पत्नींनी मानवंदना देत परिसर देशभक्तीच्या आणि सामाजिक समतेच्या घोषणांनी दणाणून सोडला.

यावेळी खासदार छत्रपती शाहू महाराज, जिल्हाधिकारी डॉ. विजय राठोड, महापालिका आयुक्त राजेंद्र भारूड आणि मराठा सेवा संघाचे वसंतराव मुळीक यांनी राजर्षी शाहू महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. राजर्षी छत्रपती शाहू महाराजांचा विजय असो, छत्रपती शिवाजी महाराजांचा विजय असो, भारतीय संविधानाचा विजय असो, भारतीय लोकशाहीचा विजय असो अशा घोषणांनी वातावरण भारावून गेले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केलेल्या राजर्षी शाहू महाराजांची जयंती दिवाळीसारखी साजरी करा या आवाहनाचा आदर्श घेत शाक्य संघाच्या वतीने नागरिक व विद्यार्थी-विद्यार्थिनींना प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते सुमारे २ हजार लाडूंचे वाटप करण्यात आले. सुमारे १०० किलो मिठाई वितरित करून जयंतीचा आनंदोत्सव साजरा करण्यात आला. संघटक अशोककुमार दिलपाक, अरुण ओहळ यांच्यासह विविध जिल्ह्यांतील पदाधिकाऱ्यांनी कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी पुढाकार घेतला.

# दहशतवाद्यांना पाठिंबा देणाऱ्यांना पाणी नाही

## पाकिस्तानी नेत्यांच्या धमक्यांवर भारताने ठणकावले

## सिंधू जल करार स्थगितच राहणार, हल्ला केल्यास प्रत्युत्तर मिळणार

**नवी दिल्ली, ३ जुलै**



दहशतवाद्यांना रसद पूरवून भारतावर हल्ला करण्यासाठी प्रवृत्त करणाऱ्यांना कदापि पाणी मिळणार नाही. धमक्या दिल्याने भारत घाबरेल आणि सीमापार नद्यांचे पाणी विना अडथळा सोडले जाईल, अशा भ्रमात असणाऱ्यांनी पाणी मिळण्याची आशा सोडून द्यावी. भारतावर हल्ला झाल्यास जोरदार प्रत्युत्तर दिले जाईल. सिंधू जल करार स्थगित आहे आणि पुढेही स्थगितच राहील, अशा शब्दांत भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाने पाकिस्तानला सुनावले.

अलीकडे सिंधू जल करार आणि सीमापार नद्यांचे पाणी मिळण्यासाठी आकांडतांडव करणाऱ्या पाकिस्तानी नेत्यांनी भारताविरोधात गरळ ओकली. पाकिस्तान पीपुल्स पार्टीचे नेता बिलावल भुट्टो यांनी पाणी अडविल्यास भारतावरप अणुबॉम्ब टाकण्याची धमकी दिली. त्याला प्रत्युत्तर देताना परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी पत्रपरिषदेत सांगितले की, भारत धमक्यांना भीक घालत नाही. सिंधू पाणी कराराबाबत भारताची भूमिका कायम आहे. पाकिस्तानकडून सीमापार दहशतवादाला सतत पाठिंबा मिळत असल्यामुळे हा करार सध्या स्थगित आहे. जर पाकिस्तानला चर्चा पुढे न्यायची असेल, तर त्यांनी सीमापार दहशतवादाला दिलेला पाठिंबा पूर्णपणे आणि कायमस्वरूपी संपवला पाहिजे. दहशतवाद्यांना रसद पुरवणाऱ्यांना भारताच्या हद्दीतील पाणी कदापि मिळणार नाही. त्यांनी हल्ल्याचा प्रयत्न केल्यास भारत प्रत्युत्तर देण्यासाठी सज्ज आहे.

### तिस्ता नदी प्रकल्पावर चर्चेने तोडगा

तिस्ता नदी प्रकल्पाबाबत जयस्वाल म्हणाले, भारत या मुद्यावर परस्पर सहमतीने, ठरवलेल्या आराखड्याने आणि चर्चेने तोडगा काढण्यास तयार आहे. भारताने तीस्ता नदी प्रकल्पाबाबत आपले मत बांगलादेशला आधीच कळवले आहे. या विषयावर आमचे भविष्यातील धोरण ठरवताना आम्ही सर्व संबंधित बाबी विचारात घेणार आहे. याप्रकरणी तिसऱ्या देशाचा हस्तक्षेप अमान्य असल्याचे स्पष्ट करत त्यांनी चीनवर अप्रत्यक्ष निशाणा साधला.

### अफगाणवरील हल्ल्याचा निषेध

पाकिस्तानने अफगाणिस्तानवर केलेल्या हवाई हल्ल्यांचा भारत तीव्र निषेध करतो. या हल्ल्यात महिला आणि मुलांसह अनेक नागरिक मारले गेले. अफगाणिस्तानची प्रादेशिक अखंडता आणि सार्वभौमत्वाला आमचा खंबीर पाठिंबा आहे. आमची मानवतावादी मदत अफगाणिस्तानला सुरूच राहणार असल्याचे जयस्वाल यांनी स्पष्ट केले. ◂ (वृत्तसंस्था)



भारताने सीमेवरील नद्यांवर सुरू केलेले प्रकल्प

### खलाशाच्या मृतदेहाची विटंबना गंभीर बाब

व्हेनेझुएलामध्ये एका भारतीय खलाशाच्या मृतदेहाची कथित विटंबना झाल्याच्या प्रकरणाची चौकशी करण्याची मागणीही भारताने केली आहे. जहाजावर मृत्यू पावलेले भारतीय खलाशी राकेश चौहान यांच्या मृतदेहाची छेडछाड आणि अवयव काढल्याची घटना गंभीर आहे. भारताने व्हेनेझुएला सरकारकडे हा मुद्दा उपस्थित केला आहे. आम्ही तेथील सरकारला या प्रकरणाची त्वरित आणि निष्पक्ष चौकशी करण्याची विनंती केल्याचे जयस्वाल यांनी सांगितले.

## मुख्यमंत्र्यांवर टीका; माजी मंत्र्याला अटक

**चेन्नई, ३ जुलै**

तामिळनाडूचे मुख्यमंत्री सी. जोसेफ विजय यांच्या विरोधात अपमानजनक वक्तव्य केल्याप्रकरणी द्रमुकचे माजी मंत्री अनिता आर. राधाकृष्णन यांना शुक्रवारी तामिळनाडूतील तुतीकोरीन येथे अटक करण्यात आली. या प्रकरणात मद्रास उच्च न्यायालयाने यापूर्वीच त्यांचा अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळला होता, त्यानंतर पोलिसांनी ही कारवाई केली. या कारवाईनंतर राज्यातील राजकीय वातावरण तापले आहे.

तुतीकोरीनपासून सुमारे २३ किलोमीटर अंतरावर आथूर येथे भेट देण्यासाठी गेले असताना राधाकृष्णन यांना ताब्यात घेण्यात आले. त्यानंतर त्यांना पोलिस जीपमधून नेण्यात आले. अटकेची बातमी कळताच त्यांचे समर्थक घटनास्थळी जमले आणि पोलिस कारवाईविरोधात घोषणाबाजी करत निदर्शने केली. ◂ (वृत्तसंस्था)



जम्मू- काश्मीरमधील गांदरबल जिल्ह्यात अमरनाथ यात्रेच्या सुरक्षेसाठी तैनात असलेल्या सीआरपीएफ पथकाचे भरधाव वाहन श्रीनगर-लेह राष्ट्रीय महामार्गावर अनियंत्रित होऊन रस्त्याच्या कडेला उलटले. यात सहा जवान गंभीर जखमी झाले. सुरक्षा दलाचे कर्मचारी घटनास्थळी पोहोचले असून त्यांनी बचावकार्य सुरू केले

# फाल्कन घोटाळा; जेटचा ३ कोटींत लिलाव

**नवी दिल्ली, ३ जुलै**

अंमलबजावणी संचालनालयाच्या (ईडी) हैदराबाद विभागीय कार्यालयाने फाल्कन घोटाळ्यात जप्त केलेल्या एका विमानाचा (हॉकर ८००ए) एमएसटीसी लिमिटेडमार्फत ३ कोटी रुपयांत लिलाव केला आहे. या घोटाळ्याचे मुख्य आरोपी अमरदीप कुमार, कॅपिटल प्रोटेक्शन फोर्स प्रायव्हेट लिमिटेड आणि इतरांविरुद्ध पीएमएलए अंतर्गत नोंदवलेल्या फसवणुकीच्या गुन्ह्यासंदर्भात ७ मार्च २०२५ रोजी ईडीने राजीव गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळावरुन हे विमान जप्त केले होते.

विमान जप्त केल्यानंतर ईडीने पीएमएलए अंतर्गत सक्षम न्यायनिर्णय प्राधिकरणाकडे मूळ अर्ज दाखल केला. ऑगस्ट २०२५ च्या एका आदेशाने याची पुष्टी करण्यात आली. ईडीने जप्त केलेली विमाने विकण्याची परवानगी मागण्यासाठी मनी लॉंडरिंग प्रतिबंधक नियम २०१३ च्या नियम ४(२) अंतर्गत न्यायनिर्णय प्राधिकरणाकडे अर्ज दाखल केला. पीएमएलएच्या न्यायनिर्णय प्राधिकरणाने २० नोव्हेंबर २०२५ रोजीच्या आदेशान्वये तपास यंत्रणेला जप्त केलेल्या विमानांचा लिलाव करण्याची परवानगी दिली.

ईडीने कॅपिटल प्रोटेक्शन फोर्स प्रायव्हेट लिमिटेडचे संचालक अमरदीप कुमार आणि इतरांविरुद्ध पीएमएलए अंतर्गत गुन्हा दाखल केला. सायबराबाद आर्थिक गुन्हे शाखेने फाल्कन ग्रुप, त्याचे सीएमडी अमरदीप कुमार आणि इतर अनेकांविरुद्ध दाखल केलेल्या तीन एफआयआरच्या आधारे ही कारवाई केली. अमरदीप कुमार, कॅपिटल प्रोटेक्शन फोर्स प्रायव्हेट लिमिटेड आणि इतरांनी एका पॉन्झी योजनेद्वारे मोठ्या संख्येने गुंतवणूकदारांची अंदाजे ७९२ कोटी रुपयांची फसवणूक केल्याचा आरोप आहे. त्यांनी गुंतवणूकदारांना इन्व्हॉइस डिस्काउंटिंग योजनेअंतर्गत भरीव परतावा देण्याचे आश्वासन दिले होते. परंतु प्रत्यक्षात असे कोणतेही इन्व्हॉइस डिस्काउंटिंग व्यवहार झाले नाहीत. ◂ (वृत्तसंस्था)




ईडी या रकमेतून गुंतवणूकदारांना पैसे करणार परत

### मूळ गुंतवणूकदारांना पैसे परत देणार

याप्रकरणी ईडीने अमरदीप कुमारचा भाऊ संदीप कुमार, चार्टर्ड अकाउंटंट शरद चंद्र तोशनीवाल आणि फाल्कन इन्व्हॉइस डिस्काउंटिंगचे सीईओ आर्यन सिंग छाबरा यांना अटक केली आहे. ईडीने २९ सप्टेंबर, २०२५ रोजी संबंधित न्यायालयासमोर हे प्रकरण सादर केले. एक अभियोग तक्रारही दाखल करण्यात आली. खरेदीदाराकडून मिळालेल्या ३ कोटी रुपयांच्या रकमेचा वापर तपास यंत्रणा पीएमएलए २००२ च्या तरतुदींनुसार मूळ गुंतवणूकदारांना पैसे परत करण्यासाठी करेल.

## चित्रपट वार्ता

### अभिजित सावंत पुन्हा ‘इंडियन आयडॉल’च्या मंचावर



**मुंबई** : जगभरातील प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवत पहिल्या ‘इंडियन आयडॉल’चा मानकरी ठरलेला गायक अभिजीत सावंत पुन्हा एकदा ‘इंडियन आयडॉल’च्या मंचावर झळकणार आहे. आजवर अनेक सुपरहिट गाण्यांद्वारे रसिकांची मनं जिंकणाऱ्या अभिजीतची यंदा सोनी टीव्हीवर प्रसारित होणाऱ्या मइंडियन आयडॉलफच्या नव्या पर्वात विशेष उपस्थिती पाहायला मिळणार आहे. नुकत्याच सोशल मीडियावर समोर आलेल्या प्रोमोमधून ‘इंडियन आयडॉल’च्या वीकेंड स्पेशल भागात अभिजीत सावंत दिसणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. पहिला विजेता म्हणून मिळालेला सन्मान आणि आज स्पेशल गेस्ट म्हणून त्याच मंचावर जाऊन परफॉर्म करण्याची संधी मिळणं ही अतिशय सुखद भावना आहे, असे अभिजित म्हणाला.

### ‘माळीण’ २४ जुलैला मोठ्या पडद्यावर

**पुणे** : जिल्ह्यातील आंबेगाव तालुक्यातील माळीण गावावर ओढवलेल्या भीषण दुर्घटनेवर आधारित ‘एक होतं माळीण’ हा मराठी चित्रपट येत्या २४ जुलै रोजी संपूर्ण महाराष्ट्रात प्रदर्शित होणार आहे. नुकताच चित्रपटाचा टीझर सोशल मीडियावर प्रदर्शित करण्यात आला. सत्य घटनेवर आधारित या चित्रपटाची उत्सुकता वाढली आहे. माळीण गावातील ग्रामस्थ पाऊस पडावा म्हणून वरुणराजाची प्रार्थना करून आदल्या दिवशी रात्री निर्धास्त झोपी गेले होते. मात्र, त्याच रात्री झालेल्या अतिवृष्टीमुळे संपूर्ण गावच पावसाच्या तडाख्यात वाहून गेले आणि कल्पनाही करता येणार नाही अशी भीषण परिस्थिती निर्माण झाली. हृदयद्रावक सत्यघटनेवर चित्रपटाची कथा आधारित आहे. ‘ड्रीम डॉट क्रिएशन प्रोडक्शन’चे संतोष जगन्नाथ म्हात्रे यांनी या चित्रपटाची निर्मिती केली. प्रशांत मोहिते, अश्विनी कासार, अभिजित श्वेतचंद्र, सिद्धी पाटणे, अनिल नगरकर, प्रशांत तपस्वी, रामचंद्र धुमाळ, अक्षय म्हात्रे, दीपज्योती नाईक आणि अनुज ठाकरे यांच्या प्रमुख भूमिका आहेत.



### ‘खाशाबा’त बड्या कलाकारांची फौज

**मुंबई** : स्वतंत्र भारताला पहिले वैयक्तिक ऑलिम्पिक पदक मिळवून देणारे महान कुस्तीपटू खाशाबा दादासाहेब जाधव यांच्या जीवनावर आधारित ‘खाशाबा’ हा चित्रपट लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. या बहुप्रतीक्षित चित्रपटाचा टीझर नुकताच प्रदर्शित करण्यात आला असून, चित्रपटाचे दिग्दर्शन आघाडीचे नागराज मंजुळे यांनी केले आहे. मराठी चित्रपटसृष्टीतील अनेक दिग्गज कलाकार या चित्रपटात महत्त्वाच्या भूमिकांमध्ये झळकणार आहेत. १ जानेवारी २०२७ रोजी ‘खाशाबा’ प्रदर्शित होणार आहे. चित्रपटात महेश मांजरेकर, गिरीश कुलकर्णी, जितेंद्र जोशी, संदीप कुलकर्णी, वैभव मांगले, छाया कदम, गार्गी कुलकर्णी, संदेश कुलकर्णी, ओम भूतकर यांच्यासह स्वतः नागराज मंजुळेही अभिनय करताना दिसणार आहेत.



## नातेवाईकांच्या नावावर ६० शेल कंपन्या

**नवी दिल्ली, ३ जुलै**

ईडीच्या कोलकाता विभागीय कार्यालयाने कॉनकास्ट स्टील अँड पॉवर लिमिटेड आणि इतरांविरुद्धच्या एका प्रकरणात मनी लॉंडरिंग प्रतिबंधक कायद्यांतर्गत अंदाजे ३१.३० कोटी रुपये एकूण बाजारमूल्याच्या २० स्थावर मालमत्ता तात्पुरत्या स्वरूपात जप्त केल्या आहेत. जप्त केलेल्या मालमत्तांमध्ये पश्चिम बंगाल, उत्तर प्रदेश, उत्तराखंड आणि दिल्ली येथील निवासी मालमत्ता, व्यावसायिक युनिट्स, फ्लॅट्स आणि जमिनीच्या तुकड्यांचा समावेश आहे.

या मालमत्ता प्रत्यक्षात संजय कुमार सुरेका यांच्या मालकीच्या आणि नियंत्रणाखाली आहेत. गुन्ह्यातून मिळालेला पैसा लपवण्यासाठी या मालमत्ता एकतर त्यांच्या स्वतःच्या नावावर किंवा त्यांच्या नातेवाईक, कर्मचारी, साथीदार आणि शेल कंपन्यांच्या नावावर ठेवल्या होत्या. ◂ (वृत्तसंस्था)

# इंस्टाग्राम जाहिरातींवर सरकार कठोर

## बाल लैंगिक शोषणाची सामग्री दाखवल्याप्रकरणी नोटीस बजावणार

**नवी दिल्ली, ३ जुलै**

सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर मुलांची सुरक्षा पुन्हा एकदा चर्चेच्या केंद्रस्थानी आली आहे. केंद्रीय माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांनी इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाच्या अधिकाऱ्यांना बाल लैंगिक शोषणाच्या सामग्रीला प्रोत्साहन देणाऱ्या इंस्टाग्राम जाहिरातींच्या संदर्भात ’मेटा’ला बोलावण्याचा निर्देश दिला आहे. सरकार या प्रकरणी कंपनीकडून उत्तर मागविण्याच्या तयारीत आहे.

सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर मुलांच्या सुरक्षेबाबत पुन्हा एकदा गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत. इंस्टाग्रामच्या जाहिरात प्रणालीचा वापर बाल लैंगिक शोषणाच्या सामग्रीशी संबंधित खाती आणि वेबसाइट्सना प्रोत्साहन देण्यासाठी केला गेला, असा आरोप आहे. याप्रकरणी माहिती तंत्रज्ञान मंत्रालय आता ’मेटा’कडून स्पष्टीकरण मागणार आहे. अशा जाहिराती प्लॅटफॉर्मवर कशा पोहोचल्या आणि त्यांना रोखण्यासाठी ‘मेटा’ने कोणत्या सुरक्षा उपाययोजना लागू केल्या होत्या, हे सरकारला जाणून घ्यायचे आहे. सरकारने मेटाविरोधात कठोर भूमिका घेण्याची ही पहिली वेळ नाही. यापूर्वी बुधवारी केंद्र सरकारने व्हॉट्सॲपला त्यांच्या प्रस्तावित युझरनेम फीचरसंदर्भात नोटीस बजावली होती. अद्याप दुसरी नोटीस बजावली नसली तरी त्यासाठीची तयारी निश्चितपणे सुरू केली आहे. ◂ (वृत्तसंस्था)



# स्कूल बसमध्येही मुलांची काळजी घेणे शाळेचे कर्तव्य

## न्यायालयाचे निरीक्षण | घरी सुरक्षित पोहोचविणे शाळांची जबाबदारी

**बंगळुरू, ३ जुलै**

विद्यार्थ्यांची काळजी घेण्याची जबाबदारी केवळ शाळेच्या प्रवेशद्वारावर संपत नाही, तर स्कूल बसमध्ये आणि विद्यार्थी सुरक्षितपणे त्यांच्या पालकांकडे पोहोचेपर्यंत कायम राहते, असे निरीक्षण कर्नाटक उच्च न्यायालयाने नोंदवले. एका प्रकरणावरील सुनावणीदरम्यान न्या. एम. नागप्रसन्न यांनी नमूद केले की, ‘स्कूल बस’ हा शाळेचाच भाग आहे.

१ ऑगस्ट २०२५ रोजी विद्यार्थी स्कूल बसने घरी जात होता. यावेळी बसमधील स्पार्कलरमुळे विद्यार्थ्याना इजा होऊन एका डोळ्याची दृष्टी कायमची गेली. नंतर त्याला ४० टक्के कायमस्वरूपी अपंगत्व आल्याचे प्रमाणित करण्यात आले. यानंतर मुलाच्या पालकांनी पोलिसांत तक्रार दाखल केली. त्यात शाळा व्यवस्थापनाने बसमध्ये पुरेशी देखरेख ठेवली नाही, अटेंडंट दिला नाही आणि बसमधील सीसीटीव्ही कॅमेराही बंद होता असा आरोप केला. पोलिसांनी दाखल केलेला गुन्हा रद्द करण्यासाठी शाळा व्यवस्थापनाने उच्च न्यायालयात याचिका दाखल केली. उच्च न्यायालयाने ही याचिका फेटाळताना म्हटले की, स्कूल बसमधील मुलांची सुरक्षा ही कोणताही दानधर्म किंवा सोयीची गोष्ट नसून, कायद्यानुसार ती बंधनकारक जबाबदारी आहे. शाळा या कायद्याच्या नियमांचे उल्लंघन करू शकत नाहीत. ◂ (वृत्तसंस्था)

# पोलिस उपअधीक्षक निघाला ‘धनकुबेर’

**तेलंगणात एसीबीचे १६ ठिकाणी छापे**

**२०० कोटींची मालमत्ता जप्त**



**हैदराबाद, ३ जूलै**

लाचलुचपत प्रतिबंधक ब्युरोने (एसीबी) तेलंगणामधील भ्रष्टाचाराविरोधात मोठी कारवाई केली आहे. एसीबीने पोलिस संगणक सेवा विभागाचे पोलिस उपअधीक्षक संकिरेड्डी भीम रेड्डी यांच्या निवासस्थानी छापा टाकला. तपासात २०० कोटींहून अधिक रुपयांची बेहिशेबी मालमत्ता उघडकीस आली. नोकरीच्या काळात त्यांनी उत्पन्नापेक्षा जास्त मालमत्ता जमा केल्याचाही त्यांच्यावर आरोप आहे.

एसीबीच्या माहितीनुसार, गुरुवारी डीएसपी संकिरेड्डी भीम रेड्डी यांच्या घरासह १६ ठिकाणी एकाच वेळी शोधमोहीम राबवण्यात आली. यामध्ये त्यांचे नातेवाईक, मित्र, कथित बेनामीदार आणि सहकाऱ्यांच्या जागांचा समावेश होता. या शोधमोहिमांदरम्यान तेलंगणा आणि कर्नाटकमध्ये पसरलेल्या महत्त्वपूर्ण मालमत्तेशी संबंधित कागदपत्रे जप्त करण्यात आली. यामध्ये इब्राहिमबाग येथील वसेला मेडोजमधील पेंटहाऊससह एक आलिशान जी+२ व्हिला, गचीबोवली, टेलिकॉम नगर आणि तेलपूर येथील चार फ्लॅट्स, तसेच नागोले आणि पटनचेरू येथील तीन मोकळे भूखंड यांचा समावेश आहे.

### रोख रक्कम, सोने, चांदी आणि बँक ठेवीही जप्त

एसीबीने रेड्डी यांच्या निवासस्थानावरुन माणिकोंडा येथील जी+५ व्यावसायिक संकुलातील हिस्सेदारी, ३,००० चौरस फुटांची व्यावसायिक जागा आणि कर्नाटक, संगारेड्डी, विकाराबाद व मुचिंताला येथील ५० एकरहून अधिक शेतजमिनीशी संबंधित कागदपत्रेही जप्त करण्यात आली. तपासात एका खाणकाम कंपनीमधील ७५ लाख रुपयांच्या गुंतवणुकीचाही खुलासा झाला. तसेच घरातून ३.६ लाख रुपये रोख आणि एका कथित बेनामीदाराच्या घरातून ४० लाख रुपये जप्त केले. याव्यतिरिक्त, २ किलो सोन्याचे दागिने, २० किलो चांदीच्या वस्तू आणि अंदाजे १९.९१ लाख रुपयांच्या बँक ठेवीही सापडल्या. जप्त केलेल्या स्थावर मालमत्तेचे सध्याचे बाजारमूल्य २०० कोटी रुपयांपेक्षा जास्त असल्याचा अंदाज आहे. ◂ (वृत्तसंस्था)

# ई-रिक्षाची बॅटरी चीनने केली हॅक

## ‘प्ले स्टोअर’वरून ॲप तात्काळ हटवा | केंद्र सरकारचे आदेश

**नवी दिल्ली, ३ जुलै**

धावत्या ई-रिक्षा थांबवणाऱ्या चिनी मोबाईल ॲप्सविरोधात केंद्र सरकारने एक मोठे पाऊल उचलले आहे. सरकारने बीएटी-बीएमएस, लॉसिगी आणि इपोक्ल-इ-इऑन सारखे ॲप्स प्ले स्टोअरवरून तात्काळ हटवण्याचे आदेश दिले आहेत. ब्लूटूथ-आधारित लिथियम बॅटरी असलेल्या ई-रिक्षा बंद पाडणाऱ्या या ॲप्सचे व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाले होते. त्यामुळे सुरक्षेबाबत चिंता वाढली होती. अशाच प्रकारे गैरवापर होणारे इतर ॲप्सदेखील ब्लॉक केले जातील, असेही सरकारन स्पष्ट केले आहे.

सरकारच्या मते, हे ॲप्स मूळतः बॅटरीची चाचणी आणि सर्व्हिसिंगसाठी तयार केले गेले होते. परंतु, काही लोक त्यांचा गैरवापर करत होते. अशा प्रकरणांमध्ये ते परवानगीशिवाय ई-रिक्षाच्या बॅटरीशी कनेक्ट होऊन वाहनाचा वीजपुरवठा खंडित करू शकत होते. या पार्श्वभूमीवर, केंद्र सरकारने तात्काळ कारवाई करत संबंधित ॲप्स काढून टाकण्याचा निर्णय घेतला आहे. भविष्यात अशा कोणत्याही ॲप्समुळे सार्वजनिक सुरक्षेला धोका निर्माण होऊ नये, यासाठी तयारीही सुरू करण्यात आली आहे. माहिती तंत्रज्ञान सचिव एस. कृष्णन यांनी सांगितले की, ॲप स्टोअर चालकांना अशा ॲप्सची तपासणी करताना अधिक सतर्क राहावे लागेल. सार्वजनिक सुरक्षेला धोका निर्माण करणारे ॲप्स भविष्यात उपलब्ध होणार नाहीत, हे सुनिश्चित करण्यासाठी सरकार ॲप स्टोअर कंपन्यांसोबत मिळून एक यंत्रणा विकसित करेल. ◂ (वृत्तसंस्था)



### हे ॲप्स कसे बनले धोकादायक?

बीएटी-बीएमएस आणि तत्सम अप्स ब्लूटूथ तंत्रज्ञानाद्वारे बॅटरी मॅनेजमेंट सिस्टीमशी जोडले जातात. बॅटरी चार्ज, व्होल्टेज, तापमान आणि इतर तांत्रिक माहितीवर लक्ष ठेवणे हा त्यांचा मुख्य उद्देश आहे. तथापि, काही स्वस्त लिथियम-आयन बॅटरी सिस्टीममध्ये पासवर्ड किंवा सुरक्षा वैशिष्ट्ये नसल्यामुळे ब्लूटूथच्या रेंजमधील कोणीही बॅटरीशी कनेक्ट होऊ शकत होते. त्यानंतर, अपमधील ‘डिस्चार्ज’ किंवा ‘ऑन-ऑफ’ पर्याय दाबून ई-रिक्षा बंद केली जाऊ शकते. यामुळे वाहन अचानक थांबून अपघात होऊ शकतो.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## अग्रलेख

# वसाहतवादी वर्तनाचे ओझे...

पोलिसांचे काम समाजात शांतता-सुव्यवस्था राखण्यासाठी गुन्हेगारी रोखणे आणि गुन्हेगारांना दंडित करण्यासाठी व्यवस्थेला मदत करणे हे आहे. कायदा आणि सुव्यवस्था हा तसा राज्य सरकारच्या अखत्यारीतील विषय आहे. त्यामुळे पोलिस खाते संबंधित राज्य सरकारच्या अधिकारात काम करते. पोलिस महासंचालक, आयुक्त, अधीक्षक किंवा अन्य पदावरील आयपीएस अधिकारी पोलिस खात्यातले 'साहेब' असले, तरी हे खाते गृहमंत्री आणि मुख्यमंत्री यांच्या थेट नियंत्रणात असते. त्यामुळे पोलिसांच्या हातून घडलेल्या कोणत्याही त्रुटीसाठी, चुकीसाठी गृहमंत्री किंवा मुख्यमंत्र्यांना जबाबदार धरले जाते. त्यांची जबाबदारी थेट नसते; तरीही ते जबाबदार असतात. कारण अंतिम अधिकार त्यांचा असतो. प्रत्यक्ष काम करणारी यंत्रणा खाकी वर्दीवाल्यांची. त्यांची जबाबदारी कायद्याचे राज्य प्रस्थापित करण्याची. कायदा हातात घेण्याचा अधिकार त्यांना नाही. मात्र, बऱ्याच घटनांत पोलिस कायदा हातात घेतात. एखाद्या गुन्ह्याच्या घटनेचा रीतसर तपास करून न्यायालयात आरोपपत्र सादर करण्याची जबाबदारी पोलिसांची असते. त्यापूर्वी कायद्यानुसार एखाद्या व्यक्तीविरुद्ध गुन्हा (एफआयआर) पोलिसांना दाखल करता येतो. आरोपीला अटक करता येते. आणखीही काही अधिकार पोलिसांना आहेत, पण कायदा हातात घेण्याचा किंवा कायद्याच्या बाहेर वागण्याचा अजीबात नाही. अटक केल्यानंतर आरोपीला न्यायालयात उभे केले पाहिजे, हा नियम. न्यायालय अधिक तपास करण्यासाठी आरोपीला पोलिस कोठडी सुनावते आणि तपास पूर्ण झाला असेल तर न्यायालयीन कोठडीत म्हणजे तुरुंगात पाठवते. पोलिस कोठडीत अनेकदा कबुलीजबाब घेण्यासाठी आरोपींचा अमानुष छळ केला जातो, हे उघड गुपित आहे. पोलिस वारंवार थर्ड डिग्रीचा वापर करतात आणि त्यात आरोपीचा मृत्यू होतो, अशाही घटना घडल्या आहेत. वाशीम जिल्ह्यातील रिसोड येथे अशाच एका प्रकरणात आरोपीकडून गुन्ह्याची कबुली मिळविण्यासाठी पोलिसांनी त्याला बेदम मारहाण केली आणि त्यात आरोपीचा मृत्यू झाला. या प्रकरणात न्यायालयाने रिसोडच्या तत्कालीन ठाणेदारांसह ९ पोलिसांना जन्मठेपेची शिक्षा ठोठावली. मूळ घटना १५ वर्षांपूर्वीची आहे. एका चोरी प्रकरणात पोलिसांनी पारधी वस्तीवर धाड टाकली आणि एका आरोपीला उचलून कोठडीत डांबले. तेथे त्याला अमानुष मारहाण करण्यात आली. या मारहाणीत आरोपीचा मृत्यू झाला. या प्रकरणाचा तपास सीआयडीकडे सोपविण्यात आला आणि त्या यंत्रणेने या प्रकरणाचा तपास अतिशय प्रामाणिकपणे केला, हे न्यायालयाने दोषींना सुनावलेल्या शिक्षेवरून दिसून येते. खरे तर सीआयडीचा असा लौकिक नाही. मात्र, या प्रकरणात तसे घडले. पुढचा प्रश्न उरतोच आणि तो असा की, सीआयडीने अल्प काळात तपास पूर्ण करून आरोपपत्र दाखल केले असताना आरोपींना शिक्षा होण्यास दीड दशक का जावे लागले?

कोठडीतील आरोपीच्या मृत्यूची ही महाराष्ट्रातील आणि देशातीलही पहिली घटना नाही. पोलिसांनी पारधी व्यक्तीला अटक केली होती. पारधी समाजावर ब्रिटिशांच्या काळापासून गुन्हेगार समाज म्हणून शिक्का लागला आहे. देशाला स्वातंत्र्य मिळून आठ दशके व्हायला आलीत. पारधी समाजावरचा हा कलंक अजूनही मिटलेला नाही. ते व्हावे यासाठी अनेक प्रयत्न झाले. अजूनही एखादा गुन्हा घडला की, अनेक ठिकाणचे पोलिस सर्वात आधी पारधी समाजाच्या वस्तीवर धाड घालतात आणि काही पुरुषांना उचलून आणतात. गुन्हा कबूल करवून घेण्यासाठी त्यांना अमानुष मारहाण करतात. अनेक वेळा जीव वाचवण्यासाठी खोटी कबुली दिली जाते. आपल्या देशातील पोलिस खाते अजूनही इंग्रजी सत्तेच्या मानसिकतेतून बाहेर आलेले नाही. ब्रिटिशांच्या काळात पोलिस खाते भारतीय जनतेला गुलाम आणि गुन्हेगार समजत होते. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर पोलिसांचे मालक बदलले. भारतीय लोक सत्तेत आले. पण पोलिसांची एकाधिकारशाही, हुकूमशाही बऱ्यापैकी अजूनही इंग्रजकालीन पद्धतीची आहे. 'सद्रक्षणाय खलनिग्रहणाय' हे पोलिसांचे ब्रीदवाक्य. पण, आपल्या ब्रीदाला जागले पाहिजे, असे त्यांना नेहमी वाटत नाही, ही खरी समस्या. क्वचित ते वागतातही. पण, बहुतेकदा इंग्रजांच्या अधिकाऱ्यांसारखी त्यांची वर्तणूक असते. या खात्यात काही चांगले अधिकारी आणि कर्मचारी आहेत. त्यांची संख्या वाढण्याची आवश्यकता आहे. अनेक ठिकाणी पोलिसांवर खोट्या एन्काउंटरचे आरोप होतात. नुकतीच बिहारमध्ये एन्काउंटरची घटना घडली. या घटनेनंतर मोठा जनक्षोभ उसळल्यामुळे बिहार सरकारला त्याची दखल घ्यावी लागली. दोषी पोलिसावर आपण कारवाई केली, असे दाखवावे लागले. मात्र, सरकार कुणाचेही असले तरी ते पोलिसांच्या हातून घडलेल्या गुन्ह्यांकडे गांभीर्याने पाहत नाही, हे सर्वत्र दिसते. सरकार सहसा पोलिसांच्या बाजूने असते. आता रिसोडचे प्रकरण बघा ना. खुनाचा आरोप असलेल्या पोलिसांना निलंबित करण्यात आले होते. नंतर निलंबनाचा कालावधी संपल्यावर या सर्वांना कामावर रुजू करून घेण्यात आले. यातील चार आरोपी अजूनही पोलिस खात्याच्या सेवेत आहेत. कोणताही सरकारी वा निमसरकारी खात्यात नोकरी देण्यापूर्वी पोलिस पडताळणी केली जाते. एखाद्यावर पोलिसात गुन्हा दाखल असेल तर त्याला नोकरीसाठी अपात्र ठरवले जाते. मग खुनाचा आरोप असलेल्या पोलिसांना निलंबन कालावधी संपल्यावर पुन्हा सरकारी सेवेत रुजू कसे करून घेतले, असा प्रश्न येथे विचारला पाहिजे. त्यासोबतच वरिष्ठ अधिकाऱ्यांची जबाबदारीही ठरवली पाहिजे. एखाद्या गंभीर प्रकरणाच्या तपासात वरिष्ठ पोलिस अधिकारी पत्रपरिषद घेऊन माहिती देतात आणि त्याचे श्रेय घेत असतात. मग अशा घटनांतही त्यांना अपश्रेय दिले गेले पाहिजे. आपल्या कनिष्ठांवर नियंत्रण ठेवले नाही, कायद्यानुसार तपास करण्यास बाध्य केले नाही, असा ठपका वरिष्ठ अधिकाऱ्यांवर नक्कीच ठेवता येतो.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राजधानी दिल्लीतील तसेच इतरत्र वसाहतवादी मानसिकतेत बदल घडवून आणण्याचा प्रयत्न केला. अनेक रस्त्यांची ब्रिटिशकालीन नावे बदलली, राजपथचे कर्तव्यपथ केले, पंतप्रधान निवासस्थान असलेल्या ७-रेसकोर्सचे ७-लोककल्याण मार्ग केले. केंद्र सरकारने आता पोलिस दलाची वसाहतवादी मानसिकता बदलण्यासाठी पुढाकार घेतला पाहिजे. पोलिसांना मित्र माना वगैरे, सांगण्यासाठी ठिकाय. पण, वास्तवात त्यांच्या वाट्याला सज्जन माणूस जात नाही. आजही पोलिस ठाण्याची पायरी चढताना सर्वसामान्यांना, निरपराधांना भीती वाटते. ही भीती दूर करण्याची गरज आहे. स्वातंत्र्य फक्त राजकीय नसते. ते मानसिक देखील असते. आपल्या व्यवस्थेत आपले ऐकले जाईल, आपल्यावर कुणीही अन्याय-अत्याचार करू शकणार नाही आणि केलाच तर त्याला पोलिस पाठून घेतील, असा विश्वास सामान्यातल्या सामान्य माणसाला वाटला पाहिजे. सध्या होते असे की, आपल्याला कितीही त्रास होत असेल तरी लोक सहसा पोलिसांकडे जात नाहीत. अनेकदा तर अशीही भीती वाटत असते की, आपण ज्याच्याविरुद्ध तक्रार करण्यासाठी जात आहोत, त्यालाच पोलिस साथ देतील तर आपले काय होईल? कारण तसे घडले आणि घडते आहे. पारधी समाजासारख्या उपेक्षित समुदायातील व्यक्तींचे या व्यवस्थेत काय होत असेल, याची कल्पनाही करवीत नाही. खाकी वर्दीतला माणूस मित्र वाटावा, हा आदर्शवाद झाला. तो तसा वाटत नाही, हे वास्तव आहे. ते बदलण्यासाठी नुसते प्रयत्न आता पुरेसे नाहीत. विकसित राष्ट्राचे स्वप्न दोन दशकांवर येऊन ठेपलेले असताना पोलिसांच्या वसाहतवादी वर्तनाचे ओझे भारतीय लोकशाहीला परवडणारे नाही. ■

## यंगिस्तान

# हिंदुस्थान आणि पाकिस्तानमधील अंतर

**जयेश शत्रुघ्न मेस्त्री**

पाकिस्तानला पाण्याची समस्या सतावू लागली असल्याने अचानक त्यांना त्यांच्या मूळ सिंधू संस्कृतीची आठवण झाली आहे. त्याआधी ते स्वतःला अरबांचे वारस मानत होते. मात्र, अरब देशात या नकली वारसांना काडीचीही किंमत नाही. मुळात पाकिस्तानची निर्मिती ही कोणत्याही मानवी मूल्यावर झाली नव्हती, ती दानवी महत्त्वाकांक्षेवर झाली होती. एखाद्या मुलाने वडिलांकडे हव्यासाने मालमत्तेतला हिस्सा मागावा, त्यासाठी आसुरी वृत्तीने रक्ताचे पाट वाहावे आणि हिस्सा बळकावल्यानंतर आपल्या रानटी स्वभावानुसार ती मालमत्ता त्या मुलाने रक्ताच्या पाटाप्रमाणे वाहून द्यावी. त्याचप्रमाणे पाकिस्तान मागणाऱ्यांनी आज पाकिस्तानचे आतंकीस्तान करून टाकले आहे. वाचकहो, तुम्हाला जॉन अब्राहमची प्रमुख भूमिका असलेला 'द डिप्लोमॅट' हा चित्रपट माहीत असेलच. उझमा अहमद नावाच्या एका भारतीय मुलीची सत्यकथा पडद्यावर मांडण्यात आली आहे. उझमा ही पाकिस्तानमध्ये अडकते आणि तिला जबरदस्तीने एका पाकिस्तानी व्यक्तीशी लग्न करण्यास भाग पाडले जाते. तिच्यावर भयंकर अत्याचार केले जातात. मग पुढे पाकिस्तानमध्ये अडकलेल्या उझमाची सुटका करण्यासाठी भारतीय दूतावासाने केलेले प्रयत्न, जॉन अब्राहमने साकारलेला 'डिप्लोमॅट' आणि त्यामागे असलेले भारताचे अखंड पाठबळ, हे सर्व काही आपल्याला या चित्रपटात पाहायला मिळते. भारत आपल्या लेकींना कधीही एकटे सोडत नाही. ही कथा पाकिस्तानमधील महिलांच्या स्थितीवर आणि त्यांना भोगाव्या लागणाऱ्या अत्याचारांवरही प्रकाश टाकते.

आता वळूया सीमा हैदरकडे. पाकिस्तानमधून भारतात आलेल्या सीमा हैदरने आपल्या चार मुलांसह सचिन मीना नावाच्या भारतीय तरुणाशी लग्न केले. पबजी गेम खेळताना सुरू झालेल्या या प्रेमकथेने दोन्ही देशांमध्ये मोठी खळबळ उडवून दिली. सीमा हैदरची भारतात येण्याची पद्धत कायदेशीर नसली, तरी तिने प्रेमासाठी घेतलेला हा धोका आणि त्यानंतर तिला भारतात मिळालेला स्वीकार, हे भारतीय समाजाच्या उदारमतवादी आणि प्रेमाला महत्त्व देणाऱ्या स्वभावाचे प्रतीक आहे. आज सीमा हैदर भारतात आनंदात राहत आहे, तिला भारतीय संस्कृतीने आणि समाजाने स्वीकारले आहे. काही लोकांचे म्हणणे आहे की, सीमा ही पाकी गुप्तहेर आहे. मात्र त्यावर लक्ष ठेवायला सरकारमधील संबंधित मंत्रालय आणि अधिकारी समर्थ आहेत. मी इथे प्रेम, विश्वास, आपुलकी, संस्कृती या मुद्यावर जोर देऊ पाहत आहे. एक भयंकर बातमी टीव्हीवर झळकतेय. ही बातमी आहे सेल्वी यास्मिना नावाच्या या फ्रेंच महिलेची. सेल्वी यास्मिना ही अतिशय सुंदर आणि सुशिक्षित तरुणी होती. २००३ मध्ये तिने ऑस्ट्रेलियात एका पाकिस्तानी माणसाशी लग्न केलं. तिला त्या पाकी माणसामध्ये आपलं प्रेम दिसलं, त्या माणसानेही तिला विश्वासात घेतलं. मुळात जिहादी संस्कृतीतले लोक समोरच्याला भुलवण्यामध्ये अत्यंत तरबेज असतात. तर झालं असं, या प्रेमात पडलेल्या महिलेने ऑस्ट्रेलियात काही वर्षे सुखाचा संसार केला. आतापर्यंत त्यांना दोन गोंडस मुलं झाली होती. सेल्वी यास्मिनाने २०१४ मध्ये आपल्या पतीसोबत पाकिस्तानात जाण्याचा निर्णय घेतला. पण या एका निर्णयाने तिचे सबंध आयुष्य डळमळीत झालं. हा निर्णय म्हणजे तिची सर्वात मोठी चूक... पाकिस्तानात पोहोचल्यावर तिला आणि तिच्या मुलांना तिच्या पतीने १२ वर्षे कैद करून ठेवले. तिला मारहाण केली, अत्याचार केले आणि तिच्या स्वातंत्र्यावर गदा आणली. तिला ज्या खोलीत ठेवले गेले ती खोली खूप लहान आणि गलिच्छ होती. विचार करा हा पाकी जिहादी तरुण इतकी वर्षे ऑस्ट्रेलियात राहिला तरी त्याची मूळ विकृत विचारसरणी गेली नाही. ती विचारसरणी त्याच्या मनातच होती, पण तो सभ्य असल्याचा अभिनय करीत राहिला. त्याच्या पापभूमीत पोहोचल्यावर त्याचा सभ्यपणा गायब झाला. तिच्या एका मुलाने धाडस केल्याने या महिलेची आता १२ वर्षांनंतर सुटका झाली आहे. यास्मिनाने तपास अधिकाऱ्यांना सांगितले की, पाकिस्तानात आल्यापासून ती मुक्तपणे जगू शकत नव्हती आणि तिचा बाह्य जगाशी संपर्क पूर्णपणे तुटला होता. पोलिसांच्या माहितीनुसार, तिला इतर लोकांना भेटण्याची परवानगी नव्हती तसेच कुटुंबातील दोन मोठ्या मुलांचे शिक्षणाची अनेक वर्षे वाया गेली. पाकिस्तानात जन्मलेल्या तीन लहान मुलांना तर कधीच शाळेत दाखल करण्यात आले नव्हते. स्थानिक प्रसारमाध्यमांनी प्रसिद्ध केलेल्या निवेदनात यास्मिना म्हणाली, 'मला वाटले की माझे भविष्य आधीच उद्ध्वस्त झाले आहे आणि मुलांचे भविष्यही उद्ध्वस्त होईल.' सुरक्षेच्या कारणास्तव यास्मिना आणि तिच्या मुलांना पेशावरमधील महिला निवारा केंद्रात हलवण्यात आले आहे. तिने फ्रान्सला परतण्याची इच्छा व्यक्त केली असून पाकिस्तानी अधिकारी तिच्या मायदेशी परतण्याबाबत संबंधित अधिकारी आणि फ्रेंच दूतावासाशी समन्वय साधत असल्याचे सांगत आहेत.

आता या दोन कथांची तुलना करा. एकीकडे सीमा हैदर, जी प्रेमासाठी विश्वासाने भारतात येते. भारतीय समाज तिचा स्वीकार करतो. तिच्या प्रेमाचा आदर केला गेला. तिच्यावर कोणतीही जबरदस्ती झाली नाही, तिला कैद केले गेले नाही की तिच्या स्वातंत्र्यावर गदा आणली नाही. उलट, तिला इथे एक नवीन आयुष्य, एक नवीन ओळख मिळाली. भारतीय संस्कृतीने तिला आपलेसे केले. कारण भारतीय समाज हा प्रेमाला आणि मानवी संबंधांना सर्वोच्च मानतो. इथे व्यक्तीच्या भावनांना, तिच्या निवडीला महत्त्व दिले जाते. दुसरीकडे, सेल्वी यास्मिना. प्रेमाच्या आशेने, विश्वासाने एका पाकिस्तानी व्यक्तीशी लग्न करून पाकिस्तानात जाते; पण तिथे तिला काय मिळते? १२ वर्षांची कैद, मारहाण, अत्याचार आणि स्वातंत्र्याचा पूर्ण अभाव. ज्या व्यक्तीवर तिने विश्वास ठेवला, ज्याच्यासोबत संसार थाटला, त्याच व्यक्तीने तिला आणि तिच्या मुलांना नरकयातना दिल्या. हा काही एका व्यक्तीचा क्रूरपणा नाही, हा क्रूरपणा व्यक्तिसापेक्ष नाही, तर ही एका विशिष्ट मानसिकतेची, एका विचारसरणीची स्वाभाविक वृत्ती आहे. या संस्कृतीत महिलांना केवळ वस्तू मानले जाते, त्यांच्यावर वर्चस्व गाजवले जाते आणि त्यांच्या भावनांना कवडीचीही किंमत दिली जात नाही.

भारताची 'रामायण संस्कृती' ही प्रेम, त्याग, सहिष्णुता, आदर आणि मानवी मूल्यांवर आधारित आहे. इथे स्त्रीला आदराने पाहिले जाते, तिला शक्तीचे रूप मानले जाते. भारतीय संस्कृती ही 'वसुधैव कुटुंबकम्' या तत्त्वावर चालते, जिथे संपूर्ण जगाला एक कुटुंब मानले जाते. इथे प्रेम हे पवित्र मानले जाते आणि ते कोणत्याही बंधनांच्या पलीकडचे असते. आपल्या संस्कृतीत 'अतिथी देवो भव' हे मूल्य जपले जाते. इथे आलेल्या पाहुण्याला देवाप्रमाणे मानले जाते. कारण भारताच्या अणू-रेणूत राम आहे. इथली गुन्हेगारी मानसिकता ही व्यक्तिसापेक्ष आहे, ती संस्कृतीचा भाग नाही. याउलट, सेल्वी यास्मिनाच्या कहाणीतून दिसणारी 'जिहादी मानसिकता' ही कट्टरता, द्वेष, फसवणूक आणि महिलांवरील अत्याचारावर आधारित आहे. ही मानसिकता केवळ वाळवंटातील रुक्ष संस्कृतीचे प्रतीक आहे. ही मानसिकता पराकोटीच्या प्रतिगामी विचारांमधूनही येते, जिथे महिलांना दुय्यम स्थान दिले जाते, त्यांच्या स्वातंत्र्यावर गदा आणली जाते आणि त्यांना केवळ उपभोगाची वस्तू मानले जाते. हिंदुस्थान आणि पाकिस्तानमधील हे अंतर केवळ भौगोलिक नाही तर ते वैचारिक आणि सांस्कृतिक आहे. एकीकडे प्रेमाला आणि मानवी मूल्यांना जपणारी 'रामायण संस्कृती' आहे, तर दुसरीकडे कट्टरता, द्वेष आणि अत्याचाराला खतपाणी घालणारी 'रुक्ष वाळवंटी मानसिकता' आहे. ■

writerjayeshmestry@gmail.com

## वेध

**अनिल उमाकांत फेकरीकर**

# एनसीसीत सहभागी व्हा अन् रोजगार मिळवा!

पदवीचे ओझे खांद्यावर घेऊन फिरतोय, रोजगाराच्या शोधात स्वतःलाच विसरतोय. अशाच स्वरूपाचे निराशाजनक भयावह चित्र आपल्याला सभोवताल दिसते. याकरिता कुठल्याही सुक्ष्मदर्शक यंत्राची गरज भासत नाही. पण मग आपण ही समस्या सतत चघळत ठेवत युवकांची माथी खराब करायची की यातून मार्ग शोधून यश मिळवायचे, हा निर्णय सर्वस्वी आपल्याच हाती आहे. असाच विचार एनसीसी महाराष्ट्र संचालनालयाचे अतिरिक्त महासंचालक मेजर जनरल विवेक त्यागी यांनी केला. त्यांना अशा भयावह स्थितीतही एक राजमार्ग सापडला अन् त्यांनी तो अनुसरून एनसीसीचा कोर्स पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी रोजगारासाठी आवश्यक कौशल्य मिळविण्याची संधीच भारत सरकारने सुरू केलेल्या पंतप्रधान इंटर्नशिप योजनेमार्फत उपलब्ध करून दिली आहे. त्यागी यांनी काही कंपन्यांशी बोलून राष्ट्रीय छात्र सेनेचा कोर्स पूर्ण करणाऱ्या शिस्तबद्ध विद्यार्थ्यांना पीएमआयएस योजनेत संधी मिळावी याकरिता प्रयत्न केले. हा पुढाकार म्हणजे रोजगार निर्मितीचा फफार मोठा फॉर्म्यूला मानायला हवा. पहिल्यांदाच अशा स्वरूपात मुला-मुलींसाठी एनसीसीने विचार करावा, ही नक्कीच अभिनंदनीय बाब म्हणावी लागेल.

'ध्येय असावे उंच, नजर असावी तीक्ष्ण, परिश्रम असावेत प्रामाणिक, यश मिळेल निश्चित' हा मंत्र ज्यांना उमगला त्यांना आयुष्यात यशोशिखर गाठण्यासाठी कुणीही रोखू शकत नाही. याकरिता एकता आणि शिस्त अनुसरावी लागते. जेव्हा ते गुण जो आत्मसात करतो तो नक्कीच रोजगार मिळवितो; नव्हे समजा हा फॉर्म्यूला सर्वांनी स्वीकारला तर नक्कीच देशातील बेरोजगारी चमत्कारिक पद्धतीने संपुष्टात येऊ शकते. अशा स्वरूपाची किमया प्रत्यक्षात व्हावी म्हणूनच एनसीसीने घेतलेला पुढाकार इतर संस्थांसाठी प्रेरणादायी ठरू शकतो. एनसीसी म्हणजे नॅशनल कॅडेट कॉर्प्स होय. तिला राष्ट्रीय छात्र सेना किंवा राष्ट्रीय विद्यार्थी सैनिक दल असेही संबोधले जाते. १५ जुलै १९४८ रोजी एनसीसी स्थापन झाली. ही भारतीय सशस्त्र दलाची एक युवा शाखा आहे. शाळा आणि महाविद्यालयातील विद्यार्थ्यांमध्ये देशभक्ती, शिस्त, नेतृत्वगुण आणि सेवेची भावना निर्माण करणे हे एनसीसीचे मुख्य ध्येय आहे. आता त्यात रोजगार निर्मिती हेही ध्येय समाविष्ट झाले आहे. लष्कर, नौदल आणि हवाई दल नेमके कसे कार्य करतात, याचा प्राथमिक अभ्यास यात मुला-मुलींना शिकविला जातो. एनसीसी आठव्या वर्गापासून सुरू होते तर पदवीपर्यंत त्यामार्फत विविध स्वरूपाचे प्रशिक्षण दिले जाते. यापोटी संबंधितांना ए, बी आणि सी प्रमाणपत्र मिळते. त्याचा नंतरच्या लष्करी करीअरमध्ये फार मोठा लाभ मिळत असतो. या एनसीसीचा लाभ शहरापासून गावखेड्यातील मुलांनाही झाला पाहिजे म्हणून भारतातील ७०० जिल्ह्यांमध्ये तिचा कार्यविस्तार करण्यात आला आहे. दरवर्षी सुमारे २० लाख कॅडेट्स एनसीसीत सहभागी होतात. त्यातील सुमारे ५ लाखांपेक्षा जास्त एनसीसी कॅडेट्स उत्तम दर्जाचे विविध स्वरूपातील प्रशिक्षण पूर्ण करून देशसेवेसाठी सज्ज होतात. एवढा हा विस्तार कुठल्याही इतर संघटनेचा नाही. दरम्यान, भारत सरकारची पंतप्रधान इंटर्नशिप योजना सुरू झाली आहे. त्यामार्फत सुमारे ५०० कंपन्यांमध्ये कामाचा प्रत्यक्ष अनुभव घेण्याची संधीही एनसीसीने आपल्या विद्यार्थ्यांसाठी अक्षरशः खेचून आणली आहे. याद्वारे तरुणांना कौशल्य विकासासोबत दरमहा ९ हजार विद्यावेतन मिळणार आहे. म्हणजे सर्वोत्तम कौशल्य आत्मसात करा; सोबत दररोज होणारा खर्चही भारत सरकारच्या योजनेतून मिळवा, अशी दुहेरी लाभ देणारी योजना नक्कीच चमत्कारिक आहे. पण माझ्याजवळ काम नाही असे म्हणत बोटं मोडणाऱ्या युवक-युवतींनी ही योजना समजून घ्यायला हवी. इच्छा असेल तर मार्ग मिळतो. मग एनसीसीने आपल्या शिस्तबद्ध विद्यार्थ्यांसाठी असा राजमार्ग मिळवून दिला तर नक्कीच त्याचा लाभ प्रत्येकाने मनापासून घ्यायलाच हवा. विशेष म्हणजे एनसीसीचे प्रमाणपत्र ज्यांना मिळते, त्यांच्याकरिता लष्करी सेवा, बीएसएफ, पोलिस दलात जाण्याचाही मार्ग मोकळा असतो. म्हणूनच आता विचार करा पक्का आणि एनसीसीचे प्रशिक्षण पूर्ण करून जीवनात चमत्कार घडवा..! असे सांगायची वेळ आलेली आहे. आज एनसीसीचे प्रशिक्षण ऐच्छिक आहे. पण जागतिक पातळीवर सुरू असलेल्या घडामोडी पाहता एनसीसी प्रशिक्षण कदाचित सरसकट सर्वांना लागू करावे लागेल. शेवटी, यश मिळविण्यासाठी कुठलीही लिफ्ट नसते. याकरिता कष्टाचा जिनाच चढावा लागतो, हे सदैव स्मरणात ठेवा. ■

९८८१७१७८५९

## मुंबई वार्तापत्र

# नियतीचा फेरा!

**नागेश दाचेवार**

काळ मोठा बलवान असतो, असे म्हणतात ते उगीच नाही. सत्तेचा अमरपट्टा घेऊन आल्याच्या थाटात वावरणाऱ्यांना काळ आणि नियती कशी जमिनीवर आणते, याचे मूर्तिमंत आणि जिवंत उदाहरण म्हणजे सध्याचे 'जनाब' उद्धव ठाकरे. शुक्रवारी त्यांनी एक पत्रकार परिषद घेतली. या पत्रकार परिषदेत उद्धव ठाकरेंनी एक घोषणा केली आणि संपूर्ण महाराष्ट्राला हसावे की संताप व्यक्त करावा, हेच कळेनासे झाले आहे. अयोध्येतील राम मंदिराच्या संदर्भात कथित गळती आणि चोरीच्या प्रकरणाचे भांडवल करत, आम्ही अयोध्येत जाऊन रामरक्षा आणि हनुमान चालीसा म्हणू, अशी वल्गना ठाकरेंनी केली. ही घोषणा ऐकताना महाराष्ट्रातील प्रत्येक नागरिकाच्या मनात एकच विचार आला असेल? हा तोच नेता आहे ना, ज्याने मुख्यमंत्री असताना याच हनुमान चालीसाला कडाडून विरोध केला होता... ज्याच्या काळात हनुमान चालीसा म्हणणे हा राजद्रोहाचा गुन्हा होता... हनुमान चालीसा म्हणणाऱ्यांवर गुन्हा दाखल करून ११ दिवस तुरुंगात डांबले होते.

राजकारणात सोयीनुसार भूमिका बदलणे नवीन नाही, पण उद्धव ठाकरेंनी मात्र यातही संधिसाधूपणाचा नीचांक गाठला आहे. अडीच वर्षे राज्याचे मुख्यमंत्री असताना याच उद्धव ठाकरेंनी सत्तेच्या हव्यासापोटी हिंदुत्वाला तिलांजली दिली होती. अजान स्पर्धा भरवली होती. ज्या काँग्रेस आणि राष्ट्रवादीला हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरेंनी जन्मभर विरोध केला, ज्यांच्या विचारांशी कधीही तडजोड केली नाही, त्याच काँग्रेसच्या मांडीला मांडी लावून बसताना उद्धव ठाकरेंना कधीही संकोच वाटला नाही. किंबहुना, 'सेक्युलर' बनण्याच्या आणि सोनिया गांधींना खूश करण्याच्या नादात, केवळ आपल्या वैयक्तिक, राजकीय स्वार्थासाठी, सत्तालालसेपोटी वारंवार हिंदुत्वाशी गद्दारी करणारे जनाब उद्धवांनी स्वतःच्याच पक्षाची आणि हिंदुत्वाची मूळ ओळख पुसून टाकली आहे; आणि आता रामरक्षा आणि हनुमान चालीसा म्हणण्याच्या वल्गना करीत आहेत.

आज अयोध्येत जाऊन हनुमान चालीसा म्हणण्याची भाषा करणाऱ्या ठाकरेंना त्यांचा स्वतःचा भूतकाळ एवढ्या लवकर कसा विसरता येतो? त्यावेळी खासदार असलेले नवनीत राणा आणि आमदार रवी राणा या दाम्पत्याने जेव्हा वांद्रे येथील 'मातोश्री' या उद्धव ठाकरेंच्या घराबाहेर केवळ हनुमान चालीसा म्हणण्याची इच्छा व्यक्त केली होती, तेव्हा याच उद्धव ठाकरे यांच्या अधिपत्याखाली असलेल्या महाविकास आघाडी सरकारने त्यांच्यावर राजद्रोहासारखे अत्यंत गंभीर गुन्हे दाखल केले होते. त्यांना ११ दिवस तुरुंगात डांबले होते. केवळ रामाचे आणि हनुमानाचे नाव घेणे, हे मविआ सरकारच्या काळात इतके मोठे पाप झाले होते की, त्यासाठी संपूर्ण राज्ययंत्रणेचा गैरवापर करण्यात आला. सत्तेचा माज तेव्हा त्यांच्या डोक्यात एवढा भिनला होता की, आमच्या नादाला लागाल तर याद राखा, अशी धमकीच जणू ते महाराष्ट्रातील तमाम हिंदूंना देत होते. त्यावेळी हिंदू सणांवर निर्बंध लादणारे आणि पालघरमध्ये हिंदू साधूंची निर्घृण हत्या झाली तरी मूग गिळून गप्प बसणारे हेच ठाकरे होते, अमरावतीत 'सर तन से जुदा'सारख्या प्रकरणात दरोड्याचं स्वरूप देण्याचं पाप... हे जनता विसरलेली नाही. पण, नियतीचा फेरा बघा कसा असतो... आज सत्तेतून पायउतार व्हावे लागल्यानंतर, पक्ष हातातून गेल्यानंतर आणि स्वतःचे राजकीय अस्तित्व टिकविण्याची वेळ आल्यानंतर त्यांना पुन्हा एकदा रामाची आणि हनुमानाची आठवण येऊ लागली आहे. अयोध्येत भव्य राम मंदिराच्या उभारणीसाठी ज्यांनी आयुष्य वेचले, राम जन्मभूमी आंदोलनात ज्यांनी रक्त सांडले, त्यांच्यावर टीका करताना यांना आता रामरक्षा आठवतेय. अयोध्येतील काही किरकोळ मुद्यांचे आणि कथित चोरीच्या प्रकरणाचे राजकीय भांडवल करण्यासाठी आता यांना त्याच हनुमान चालीसाचा आधार घ्यावा लागतोय, ज्याला त्यांनी मुंबईत बंदी घातली होती. हनुमान चालीसा म्हणू नका यासाठी हजारो कार्यकर्ते रस्त्यावर उतरले होते. याला निव्वळ ढोंगीपणा नाही तर दुसरे काय म्हणायचे?

हा उद्धव ठाकरेंच्या राजकीय अधःपतनाचा आणि वैचारिक दिवाळखोरीचा जिवंत पंचनामा आहे. जेव्हा सत्ता हवी होती, तेव्हा हिंदुत्व अडगळीत टाकले. स्वातंत्र्यवीर सावरकरांचा सातत्याने अपमान करणाऱ्या राहुल गांधींच्या गळ्यात गळे घालताना यांचा स्वाभिमान कधीही दुखावला गेला नाही. आणि आता, जेव्हा निवडणुका तोंडावर आहेत, जनाधार घसरत चालला आहे, तेव्हा पुन्हा एकदा हिंदुत्वाचा बुरखा पांघरण्याची केविलवाणी धडपड सुरू आहे. बाळासाहेबांची शिवसेना अशी दुटप्पी कधीच नव्हती, ती रोखठोक होती. पण उद्धव ठाकरेंची शिवसेना आता केवळ एक तडजोड करणारी खाजगी कंपनी म्हणून उरली आहे. ठाकरे एक विसरत आहेत की, महाराष्ट्रातील जनता दूधखुळी नाही. सत्तेसाठी सोयीचे हिंदुत्व आणि विरोधात असताना ढोंगी हिंदुत्व, हा त्यांचा खेळ आता उघडा पडला आहे. प्रभू श्रीराम आणि संकटमोचक हनुमान हे हिंदूंच्या आस्थेचे, श्रद्धेचे विषय आहेत, ते ठाकरेंच्या राजकीय सोयीचे खेळणे नाहीत. ज्यांनी सत्तेच्या धुंदीत रामभक्तांचा आणि हनुमानभक्तांचा छळ केला, त्यांना आता अयोध्येत जाऊन रामरक्षा म्हणण्याचा कोणताही नैतिक अधिकार उरलेला नाही.

आज उद्धव ठाकरेंची अवस्था 'ना घर का, ना घाट का' अशी झाली आहे. काँग्रेससोबत गेल्याने पारंपरिक आणि कट्टर हिंदू मतदार कायमचा दुरावला आणि आता पुन्हा हिंदुत्वाचा आव आणल्याने नवीन 'सेक्युलर' मित्रपक्षही साशंक आहेत. नियतीचा हाच तो फेरा आहे, जो प्रत्येकाला त्याच्या कर्माची फळे याच जन्मी देतो. राणा दाम्पत्याला तुरुंगात पाठविणारे हात आज त्याच हनुमान चालीसाच्या पानांवरून फिरत आहेत, यातच काळाचा सर्वात मोठा न्याय दडलेला आहे. खऱ्या अर्थाने, हा उद्धव ठाकरेंच्या नकली हिंदुत्वाचा आणि राजकीय दुटप्पीपणाचा झालेला सर्वात मोठा आणि सणसणीत पंचनामा आहे. यावेळी अभिनेत्री आणि आता खासदार असलेल्या कंगना राणावत यांचे 'उद्धव आज मेरा घर तुटा है, कल तेरा घमंड तुटेगा' या वाक्याची आठवण झाल्याशिवाय राहत नाही. यालाच नियतीचा फेरा किंवा थट्टा म्हणतात! ■

९२७०३३३८८६

## आळंदीच्या मंदिराचा कळस आणि वारी

महाराष्ट्राच्या आध्यात्मिक नकाशावर आषाढी वारी ही एक अशी घटना आहे, जिथे लाखोंच्या संख्येने भक्त विठुरायाच्या भेटीसाठी नतमस्तक होतात. या वारीची सुरुवात होते ती आळंदीच्या संजीवन समाधी मंदिरातून. संत ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखीचे प्रस्थान होताना जे वातावरण असते, ते केवळ शब्दबद्ध करण्यापलीकडचे असते. वारकरी परंपरेत अशी श्रद्धा आहे की, जोपर्यंत माउलींच्या मंदिराच्या कळसाचे दर्शन होत नाही, तोपर्यंत वारीची पूर्णतः होत नाही. ही केवळ एक धार्मिक रीत नसून ती माउलींच्या आशीर्वादाची साक्ष मानली जाते. अनेकांच्या मनात प्रश्न येतो की, कळस खरोखरच हलतो का? धार्मिक दृष्टिकोनातून पाहिल्यास, हे एक गूढ आणि श्रद्धेचे प्रतीक आहे. वारकऱ्यांची अशी दृढ भावना आहे की, जेव्हा पालखी सोहळा सुरू होतो, तेव्हा माइलींना निरोप देण्यासाठी आणि आपल्या भक्तजनांना आशीर्वाद देण्यासाठी खुद्द देवच कळसाच्या रूपाने उपस्थित राहतात. टाळ-मृदंगांचा गजर, ज्ञानोबा माउली तुकाराम या जयघोषाने निर्माण होणारी ऊर्जा आणि भक्तांची उत्कटता यामुळे हे दृश्य डोळ्यांसमोर साकारते. परंतु, वारकऱ्यांसाठी हा अनुभव वैज्ञानिक नसून तो 'अनुभूती'चा आहे. त्यांना तो कळस हलताना दिसणे, म्हणजे माउलींनी पुढील प्रवासासाठी दिलेली परवानगी आणि आशीर्वादच वाटतो. वारी म्हणजे केवळ पंढरपूरला जाणे नव्हे, तर 'मी' पणा विसरून 'विठ्ठलमय' होणे होय. जेव्हा आळंदीहून माउलींच्या पादुका पालखीत विराजमान होऊन प्रस्थान ठेवतात, त्या क्षणी मंदिराचा कळस हलतो अशी भाविकांची श्रद्धा आहे. हे दर्शन वारकऱ्यांच्या थकलेल्या पावलांना पुढील अनेक दिवसांचा प्रवास करण्याची अफाट शक्ती देते. आजही जेव्हा पालखी सोहळा सुरू होतो, तेव्हा आळंदीच्या आकाशात घुमणारा 'माउली'चा गजर हेच सांगून जातो की, भक्तीच्या प्रवासात तर्कापेक्षा श्रद्धेची ओढ केव्हाही श्रेष्ठ असते.

**वर्षा आवदे**/नागपूर

■■■

## अचानक वाढीव येतेय् वीज बिल

प्रिय ग्राहकांनो, आपल्या लक्षात आले आहे का? गेल्या दोन महिन्यापासून वीज बिल दुपटीपेक्षा जास्त येत आहे. वीज मंडळ उन्हाळ्याचा फायदा तर घेत नाही ना, अशी शंका येत आहे. एप्रिलपर्यंत दरमहा वीज बिल सरासरी ४००० रुपये येत होते. त्यात अचानक वाढ होऊन गेल्या दोन महिन्यांपासून १४५०० रुपयांपर्यंत आलेले आहे. घर तेच, घरातील विद्युत उपकरणे तीच, मग हे बिल एकदम का वाढले? हा संशोधनाचा विषय आहे. उन्हाळा असल्यामुळे पंखे, कुलर व एसी जास्त प्रमाणात चालू असतील हे जरी खरे असले, तरी पण वीज बिलातील वाढ ही अविश्वसनीय वाटते. सबब, महाराष्ट्र वीज मंडळास विनंती आहे की, त्यांनी याबाबत योग्य तपासणी करून बिलांमध्ये सुधारणा करावी.

**शशिकांत दलाल**/नागपूर. ९८२२३६५१९०

■■■

## वाचक पत्रे



## काळाची पावले आणि बदलणारे राजकीय रंग!

शिवसेना (उबाठा) प्रमुख उद्धव ठाकरे आणि मनसे प्रमुख राज ठाकरे यांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याबद्दल अचानक आलेला कळवळा पाहून मराठीतील 'खाण तशी माती आणि वेळेनुसार नाती' ही म्हण प्रकर्षाने आठवते. कालपर्यंत ज्या देवेंद्र फडणवीस यांच्यावर टोकाची टीका केली जात होती, अगदी वैयक्तिक पातळीवर जाऊन दूषणे दिली जात होती, आज त्याच नेत्याची 'री' ओढताना ही मंडळी दिसत आहेत. ही केवळ राजकीय सोयीपोटी दाखवलेली लवचीकता आहे की या दोन्ही पक्षांना मुंबई महापालिकेच्या निवडणुकीच्या निमित्ताने मुंबईतील आपल्या खया राजकीय ताकदीची जाणीव झाली असावी, हा मोठा प्रश्न आहे. कोणत्याही संघटनेला किंवा पक्षाला उतरती कळा का लागते, याची प्रमुख कारणे पाहिली तर त्यात काळासोबत बदल न स्वीकारणे, भावनिक मुद्यांचा अतिरेक, मूळ विचारसरणीला तिलांजली देणे, नेतृत्वाचे आत्मपरीक्षणाकडे दुर्लक्ष आणि भूराजकीय व देशांतर्गत घडामोडींचे भान नसणे ही प्रामुख्याने समोर येतात.

दुर्दैवाने या दोन्ही पक्षांच्या बदलत्या भूमिकेत हीच कारणे स्पष्टपणे दिसून येत आहेत. शिवसेना (उबाठा) ने प्रथम हे लक्षात घेतले पाहिजे की, केवळ 'बाळासाहेबांची पुण्याई' या भांडवलावर कायमस्वरूपी पक्ष चालवता येत नाही. जोपर्यंत ते हे वास्तव स्वीकारत नाहीत, तोपर्यंत या पक्षाला उज्ज्वल भवितव्य असणे कठीण आहे.

संघटनात्मक रचनेत आणि कार्यपद्धतीत काळाच्या गरजेनुसार आवश्यक ते बदल या पक्षाने केले नाहीत. उलट, सत्तेच्या समीकरणांसाठी आपल्या मूळ प्रखर हिंदुत्वाच्या विचारसरणीला तिलांजली देऊन आणि काँग्रेससोबत युती करून त्यांनी स्वतःचे सर्वात मोठे राजकीय नुकसान करून घेतले आहे. स्थानिक भावनिक मुद्यांचे राजकारण एका मर्यादेपलीकडे चालत नाही; त्यामुळे काळाची पावले ओळखून दिशा बदलणे, हेच या दोन्ही पक्षांच्या अस्तित्वासाठी आणि भविष्यासाठी अनिवार्य ठरणार आहे. ■

**अविनाश देशपांडे**/पुणे

## महत्वाचे...



## वालचंद महाविद्यालयात अकरावी प्रवेशोत्सव जल्लोषात

**सोलापूर, दि. ३ जुलै-**

वालचंद कॉलेज ऑफ आर्ट्स अँड सायन्स कनिष्ठ महाविद्यालयातील इयत्ता ११ वी विज्ञान व कला शाखेतील विद्यार्थ्यांच्या नवीन शैक्षणिक वर्ष २०२६-२७चा महाविद्यालयीन प्रवेशोत्सव महाविद्यालयाच्या प्रांगणात मान्यवरांच्या प्रवेशित विद्यार्थी पालक, शिक्षक यांच्या उपस्थितीत संपन्न झाला. याप्रसंगी प्राचार्य डॉ. संतोष कोटी, मुख्य अतिथी म्हणून उपस्थित असलेल्या शिक्षणाधिकारी योजना विभाग सुलभा वठारे, जेलरोड पोलीस स्टेशनच्या एपीआय ज्योत्स्ना भांबिस्टे, सय्यद, वरिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. मनोहर जोशी,डॉ. राजशेखर हिप्परगी, बायोटेक विभागाचे डॉ. राव, कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य अनुप म्हेत्रे, पर्यवेक्षक डॉ. जीवराज कस्तुरे उपस्थित होते. प्रास्ताविक उपप्राचार्य अनुप म्हेत्रे यांनी केले. याप्रसंगी, अकरावी प्रवेशित झालेल्या 'कला' व 'विज्ञान' शाखेतील गुणानुक्रमे प्रथम तीन क्रमांक प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. तसेच, विद्यार्थिनींना महाराष्ट्र शासनाच्या पुण्यश्लोक राजमाता अहिल्याबाई होळकर मोफत एसटी पास योजना उपक्रमांतर्गत २८ विद्यार्थिनींना मोफतपास वाटप योजना समन्वयक शैलेंद्र विठ्ठलदास यांच्या हस्ते करण्यात आले. सूत्रसंचालन चेतन तुपकर व प्रशांत पाटील यांनी केले.

## रोटरी क्लबचा उद्या पदग्रहण सोहळा

**सोलापूर, दि. ३ जुलै**





रोटरी क्लब ऑफ सोलापूरच्या मितेश पंचमिया यांची अध्यक्षपदी तरपार्थ दावडा सचिवपदी निवड झाली. वर्ष २०२६-२७ च्या या नवीन कार्यकारिणीचा पदग्रहण सोहळा रविवार ५ जुलै रोजी सायंकाळी ६ वाजता गुजराती मित्र मंडळ सभागृहात होणार आहे. या सोहळ्यास प्रमुख पाहुणे म्हणून प्रांत ३०६० धुळे चे रो.अशिष अजमेरा हे उपस्थित राहणार असून त्यांच्या हस्ते नूतन अध्यक्ष मितेश पंचमिया व नूतन सचिव रोटेरियन पार्थ दावडा यांच्यासह नवीन संचालक मंडळाचा पदग्रहण सोहळा पार पडणार आहे. यावेळी रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३२चे प्रांतपाल जयेश पटेल व प्रथम महिला पारुल पटेल, साहाय्यक प्रांतपाल चार्वाक बुरगुल यांची विशेष उपस्थिती लाभणार आहे. रोटरी क्लब ऑफ सोलापूर हा त्यांचा होम क्लब असल्याने हा सोहळा अधिक विशेष ठरणार आहे. याप्रसंगी मावळत्या अध्यक्षा धनश्री केळकर व मावळते सचिव निलेश फोफलिया हे नवीन कार्यकारिणीकडे पदभार सुपूर्द करतील. यावेळी पीडीजी राजीव प्रधान, पीडीजी झुबीन अमरिया उपस्थित असणार आहे.

# आषाढी वारीसाठी एसटीची जय्यत तयारी

### २३५ बसेस, चार तात्पुरती बसस्थानके आणि १२ तपासणी नाके सज्ज

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ३ जुलै-**

आषाढी वारी २०२६ निमित्त लाखो विठ्ठल भक्तांच्या सुरक्षित आणि सुकर प्रवासासाठी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या सोलापूर विभागाने व्यापक नियोजन हाती घेतले असून, यंदाच्या वारीसाठी तब्बल २३५ एसटी बसेस, चार तात्पुरती बसस्थानके आणि १२ तपासणी नाके कार्यरत ठेवण्यात येणार आहेत. वारकऱ्यांना कोणतीही अडचण येऊ नये, यासाठी सर्व यंत्रणा सज्ज करण्यात आली आहे.

या नियोजनाबाबत झालेल्या आढावा बैठकीस कृषी, पशुसंवर्धन व दुग्धशाळा समितीचे सभापती रामप्पा चिवडशेट्टी, जिल्हा परिषद सदस्य सिद्धराम शिवमूर्ती, गीतांजली साळुंखे, नंदकुमार काळे तसेच शनमुखी कोरके यांची प्रमुख उपस्थिती होती. विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी, कार्यकारी अभियंते, भूजल, जलसंधारण, कृषी, सामाजिक वनीकरण, महावितरण तसेच ग्रामीण पाणीपुरवठा व लघु पाटबंधारे विभागातील अधिकारी उपस्थित होते.



वारीदरम्यान भाविकांच्या सोयीसाठी चंद्रभागा, भीमा, पांडुरंग आणि विठ्ठल अशी चार तात्पुरती बसस्थानके उभारण्यात येणार आहेत. या स्थानकांवरून राज्यातील विविध जिल्ह्यांसाठी एसटी बसेसची सेवा उपलब्ध राहणार आहे. बसस्थानकांवर हिरकणी कक्ष, सुरक्षा व दक्षता कक्ष, आरक्षण सुविधा, प्रशस्त प्रतीक्षागृह, जनरेटर, क्रेन तसेच यांत्रिक कर्मचाऱ्यांची स्वतंत्र पथके तैनात करण्यात येणार आहेत.

याशिवाय पंढरपूर शहराबाहेर जाणाऱ्या प्रमुख मार्गांवर १२ तपासणी नाके आणि ब्रेकडाऊन पथके कार्यरत राहणार असून, आपत्कालीन परिस्थितीत तातडीने मदत उपलब्ध करून दिली जाणार आहे.

वारीसाठी सोलापूर विभागातील सोलापूर, पंढरपूर, बार्शी, अक्कलकोट, करमाळा, अकलूज, सांगोला, कुर्डुवाडी आणि मंगळवेढा आगारातून एकूण २३५ बसेस सेवेत दाखल करण्यात येणार आहेत. या सेवेसाठी विभागातील अधिकारी, पर्यवेक्षक, चालक, वाहक, यांत्रिक व प्रशासकीय कर्मचारी पूर्ण क्षमतेने कार्यरत राहतील.

महामंडळाने यंदाही अमृत ज्येष्ठ योजना, महिला सन्मान योजना, ज्येष्ठ नागरिक सवलत, दिव्यांग सवलत यांसह शासनाच्या सर्व प्रवासी सवलती लागू राहणार असल्याचे स्पष्ट केले आहे. त्यामुळे भाविकांनी सुरक्षित, किफायतशीर आणि विश्वासार्ह प्रवासासाठी एसटी बससेवेचाच लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## लोन योजना माफीसाठी १२ लाखांची फसवणूक

**सोलापूर, दि. ३ जुलै-**

ऊस तोडणी यंत्राचे थकीत गेलेले लोन योजनेमध्ये बसवून माफ करून देतो म्हणून १२ लाख रूपये घेऊन फसवणूकप्रकरणी दोघांविरुद्ध फौजदार चावडी पोलीसात फसवणुकीचा गुन्हा दाखल झाला आहे. कृष्णा शंकर दोड्डमणी (रा. आंबेगाव खुर्द, पुणे) आणि लक्ष्मण अण्णप्पा पुजारी (वय ४८, रा.आकुर्ली रोड हनुमान नगर मुंबई) अशी गुन्हा दाखल आरोपींची नावे असून याबाबत रियाज ईलाही शेख (वय-३३, रा. इंगळगी ता. दक्षिण सोलापूर) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी रियाज यांचे ऊस तोडणी यंत्राचे थकीत गेलेले लोन योजनेमध्ये बसवून माफ करून देतो असे वरील अरोपीनी फिर्यादीस वेळोवेळी सांगून फिर्यादीकडून दि १५ सप्टेंबर २०२५ रोजी ते दि २५ फेब्रुवारी २०२६ या कालावधीमध्ये टप्या-टप्याने १२ लाख रूपये घेतले सहाय्यक पोलीस निरीक्षक पाटील हे गुन्ह्याचा पुढील तपास करीत आहेत.

## मध्यरात्री मोटारकार अडवून बिदरच्या व्यापाऱ्याला लुटले

### रिक्षातून आलेल्या तिघा अज्ञातांवर गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ३ जुलै-**

लग्न लावून गावाकडे मोटार कार मधून निघालेल्या एका व्यापाऱ्याला गळ्याला चाकू लावून लुटल्याची घटना सोलापूर विजापूर महामार्गावर हॉटेल अंबर समोर गुरुवारी मध्यरात्री बारा वाजता घडली .दरम्यान याप्रकरणी रिक्षातून लुटमार करून निघून गेलेल्या तिघा अज्ञातांविरुद्ध विजापूर नाका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत मल्लिकार्जुन विश्वनाथ कोणी (वय-५५ वर्षे, रा- मु.पो. कनकट्टा ,ता.हुमनाबाद , जि बीदर ) यांनी फिर्याद दिली आहे.यातील फिर्यादी हे दि २ जुलै रोजी विजापूर येथील नातेवाईकाच्या लग्नाला जाऊन हुमनाबाद कडे आपल्या मोटार कार मधून नातेवाईकांसह निघाले होते . मध्यरात्री १२ वा चे सुमारास सोलापूर विजयपुर महामार्गावरील वडकबाळ ब्रीजखालून गाडी वळवून चव्हाण एच.पी. पेट्रोलपंपाकडे गाडीमध्ये डिझेल टाकण्यासाठी जात असताना अंबर हॉटेलसमोर एक रिक्षा फिर्यादीच्या गाडीच्या समोर येवून अचानक थांबली . फिर्यादीने मोटार कार थांबविताच त्या रिक्षामधून तीन इसम बाहेर आले व त्यांनी फिर्यादीचे पाहूणे शांतकुमार रेवणप्पा येडवे यांचे डोळ्यात चटणी टाकून गळ्याला चाकू लावला . त्यानंतर फिर्यादीच्या डोळ्यात चटणी टाकून फिर्यादीच्या उजव्या हातातील पावणे ३ लाख रुपये किमतीची सोन्याची अंगठी जबरदस्तीने काढून घेतली .व फिर्यादी व त्यांच्या पाहुण्याला मारहाण करून फिर्यादीच्या गाडीची चावी काढून घेवून निघून गेल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. सहाय्यक पोलीस निरीक्षक शितलकुमार गायकवाड हे गुन्ह्याचा पुढील तपास करीत आहेत .



## जैनस्को भवन हे ज्येष्ठांना स्वत:चे घर वाटावे

### माजी न्यायाधीश पुखराजजी बोरा; जैनस्कोचा पदग्रहण व शपथविधी समारंभ साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ जुलै -**

जैनस्कोचे स्वत:चे भवन असावे आणि ते ज्येष्ठांना स्वतःचे घर वाटावे. त्या घरात येऊन आनंदाने आपले उर्वरित आयुष्य घालवावे, असे विचार मुंबई हायकोर्टाचे निवृत्त न्यायाधीश पोखराज बोरा यांनी व्यक्त केले.

नूतन अध्यक्ष सुभाष लुणावत आणि विद्यमान अध्यक्ष डॉ. सरिता कोठाडिया यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित पदग्रहण व शपथविधी समारंभात प्रमुख अतिथी या नात्याने ५० वर्षांपूर्वी त्याचे वडील सोलापूर जिल्हा न्यायालयात न्यायाधीश होते. त्या वेळेस भारताचे माजी गृह मंत्री सुशीलकुमार शिंदे हे न्यायालयात पट्टे वाले म्हणून काम करत होते, त्यांच्यातील कौशल्य व टेजस्वीपणा ओळखून त्यांना वर उचलले, सुप्रीम कोर्ट जज अजित शहा व आशुतोष जमादार हे देखील सोलापूरचे सुपुत्र त्यांच्या सोबत सुद्धा मी काम केले असे ते बोलत होते.

कार्याध्यक्ष तथा शपथ प्रदान कर्ता केतन शहा यांनी नूतन पदाधिकारी व कार्यकारिणी सदस्यांना पदग्रहण समारंभा निमित्त शपथ दिली. त्यावेळी उमाजी बोरा यांची प्रमुख उपस्थिती होती. जयश्री लुणावत यांच्या णमोकार महामंत्राने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. प्राणिमित्र विलास शहा. ऐ.प.दि.जैन पाठशाळेचे विद्यमान अध्यक्ष अरविंद दोशी, नूतन उपाध्यक्ष श्रेणिक शहा, प्रमुख अतिथी यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले.


### खरेदीपूर्व जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेषतः कासारवाडी व बार्शी, ता बार्शी, जि. सोलापूर येथील आसपासचे परिसरातील लोकांना कळविण्यात येते कि, मिळकतीचे वर्णन डि. सोलापूर, सब. डि. व ता. बार्शी पैकी मौजे कासारवाडी येथील शेतजमीन याचा तपशील :- गट नं १९४ याचे एकूण क्षेत्रफळ ०३ हे २० आर आहे. याचा आकार १३ रु ०८ पैसे आहे यापैकी बागायत शेतजमीन याचे क्षेत्र ०१ हे ६० आर आहे यापैकी श्री संपत बाबू उर्फ बाबुराव अनभुले (खाते नं. १४२९) यांचे पश्चिम बाजूची बागायत शेतजमीन याचे क्षेत्र ०० हे ४० आर यासी आकार ०१ रु ६४ पैसे आहे. यासी चतुः सीमा पूर्वेस :- सदर गट नंबर पैकी रतन नागनाथ अनभुले यांची शेतजमीन, दक्षिणेस :- ओढा, पश्चिमेस :- सदर गट नंबर पैकी गुंड यांची शेतजमीन, उत्तरेस :- सदर गट नंबरमधील गुंड यांची शेतजमीन. अशी बागायत शेतजमीन.

सदर शेतजमीन श्री संपत बाबू उर्फ बाबुराव अनभुले यांच्या वडिलोपार्जीत मालकीची असून ७/१२ हक्कपत्रकी त्यांच्या नावाची नोंद असून सदर शेतजमीन प्रत्यक्ष कब्जे वाहिवाटीस आहे. सदरची शेतजमीन ते विक्री करू इच्छितात, शेतजमीन विक्री निघाले बाबत आमचे अशिलास समजलेने आमच्या अशिलाने योग्य ती किंमत देऊ केलेने श्री संपत बाबू उर्फ बाबुराव अनभुले (खाते नं. १४२९) यांनी सदरची शेतजमीन विक्री करणेबाबतचा करार आमच्या अशीलाशी केला. त्या व्यवहारापोटी आमच्या अशिलाकडून साक्षीदारासमक्ष इसार रक्कम स्वीकारली आहे, व खरेदीखत करून देण्याचा व्यवहार आमच्या अशील बरोबर ठरविला आहे. सदर शेतजमिनीवर कोणाचेही कसलेही हक्क, हितसंबंध, लीज, दान, गहाण, टाच, बोजा, अशाप्रकारे हक्क, हितसंबंध असल्यास सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून ०८ दिवसांचे आत अशिलातर्फे वकिल यांना खाली दिलेल्या पत्त्यावरती प्रत्यक्ष भेटून कागदोपत्री पुराव्यानिशी आपला हक्क शाबित करावा, अन्यथा मुदतीनंतर आमचे अशील कोणाची कसलीही हरकत नाही असे गृहीत धरून शेतजमीन बिनबोजाची, क्लिअर टायटल आहे असे गृहीत धरून सदर शेतजमीन खरेदी करतील. खरेदीनंतर कोणाची कसलेही हरकत आलेस आमचे अशीलाच्या हक्कावर व अधिकारावर ती बंधनकारक राहणार नाही.

कोणाचीही फसगत होऊ नये या करिता खरेदीपूर्व जाहीर नोटीस दिली.
दि. ०२/०७/२०२६.

सही/-
**ॲड. अमरदिप राजीव क्षीरसागर,**
**ऑफिस पत्ता : गाळा नं. २७, डॉ. बाबासाहेब आंबेडकर कॉम्प्लेक्स सुलाखे हायस्कूल रोड, बार्शी.**
**रा. बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर.**
**(अशिलातर्फे ॲडव्होकेट)**


# टेंडर मिळवून देतो म्हणून महिलेची ९ लाख ५० हजारांची फसवणूक

### राष्ट्रवादी युवक शहराध्यक्षावर गुन्हा

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ३ जुलै-**

माझे अजित दादाचे चांगले संबंध आहेत, ते मला व्यक्तीशा ओळखतात, मी तुम्हाला रस्त्याचे टेंडर मिळवून देतो म्हणून एका महिलेकडून ९ लाख ४२ हजार ५०० रुपये घेऊन फसवणूक केल्याप्रकरणी सोलापूर शहर राष्ट्रवादी युवक काँग्रेसचा अध्यक्ष तथा मुख्य प्रवक्ता विरुद्ध सदर बाजार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सुहास विजय कदम (रा. सोलापूर) असे गुन्हा दाखल करण्यात आलेल्या आरोपीचे नाव असून याबाबत सायराबानु शब्बीर शेख (रा. १२ सम्राट नगर, मजरेवाडी, सोलापूर) यांनी फिर्याद दिली आहे. यातील आरोपी सुहास कदम याने माझे अजित दादाचे चांगले संबंध आहेत, ते मला व्यक्तीशा ओळखतात, मी तुम्हाला रस्त्याचे मिळवून देतो असे म्हणून फिर्यादी कडुन दि. १ जानेवारी २०२४ ते दि.५ मे २०२४ या चार महिन्याच्या कालावधीत वेळोवेळी एकुण ९ लाख ४२ हजार ५०० रुपये घेतले.

रुपये घेऊन दोन वर्षाच्या वर कालावधी उलटला तरी आरोपीने सांगितल्याप्रमाणे रस्त्याचे टेंडर देखील मिळवून दिले नाही व घेतलेले पैसे परत मागितले असता टाळाटाळ केली व मला त्रास दिला तर तुम्हाला व तुमच्या मुलाला जिवे ठार मारेन अशी धमकी दिल्याचे फिर्यादीत म्हटले आहे . फौजदार पवार हे गुन्ह्याचा पुढील तपास करीत आहेत.

### वसूलदार आंदोलन करणाऱ्याविरुद्ध गुन्हा

राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे पदाधिकारी असलेले सुहास कदम हे शहरातील अवैध धंद्याबाबत वसुली करणाऱ्या काही पोलीस कर्मचाऱ्यांविरुद्ध मागील काही दिवसांपासून जिल्हा परिषद पुनम गेट येथे आंदोलनाला बसले आहेत. संबंधित वसूलदारांनी आजपर्यंत अवैध मार्गाने कमविलेल्या मालमत्तेची एसीबी व आयकर विभागाने चौकशी करून ती जप्त करावी अशी देखील त्यांनी आंदोलन स्थळी बॅनर लावून मागणी केलेली आहे. हे आंदोलन करताना त्यांच्यावर हा फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आल्याने शहरवासीयातून अनेक तर्कवितर्क लावले जातात आहेत.


### जाहीर नोटीस

विवाह अर्ज नं. ३३१/२०२४

**विटा येथील मे. सिव्हील जज्ज सिनियर डिव्हिजन सा़ो, यांचे कोर्टात**

**श्री मनोज उत्तम बाड - अर्जदार**
विरुध्द
**सौ. माहेस्वरी मनोज बाड - जाबदार**

प्रति
जाबदार सौ. माहेस्वरी मनोज बाड, रा. लक्ष्मीनगर (दंडाचीवाडी ) ता. सांगोला, जि. सोलापूर यांना ज्याअर्थी सदर कामी मे. कोर्ट मजकुर अर्जदार यांनी हिंदु मॅरेज ॲक्ट १९५५ नुसार कलम १३(१) (ia) (ib) नुसार विवाह विच्छेनादाचा अर्ज दाखल केला होता व आहे. सदरील अर्जाचे कामी जाबदार हिला समन्स बजावणेसाठी नि १ मध्ये पत्त्यावर पाठविले असुन सदरचे समन्स न बजावता परत आलेले आहे. तथापि तुम्हांस या जाहीर समन्स नोटीसीद्वारे सदरहु विवाह विच्छेदनाचे अर्जाचे कामी हजर राहणेबाबत तारीख ३१/०७/२०२६ रोजी मध्याने बोलविण्यात येत आहे. सदरहु विवाह विच्छेदन अर्जाचे कामी नेमले तारखेस अथवा हे जाहीर समन्स / नोटीन्स प्रसिध्द झालेपासून ३० दिवसांचे आत कोर्ट मजकुरी स्वतःहुन अथवा तुमचे मुखत्याराबाबत हजर राहणेस कसुर केलेस सदरहु विवाह विच्छेदन अर्जाचे कामी तुमचे विरुध्द विवाह विच्छेदनाचा अर्ज एकतर्फा चालविणेचा हुकूम केला जाईल. तसेच या जाहीर समन्स / नोटीसीद्वारे कळविणेत येते की, तुम्ही नेमले तारखे दिवशी व्यक्तीशः हजर राहून तुमचा पत्ता द्यावा अन्यथा तुमचा बचाव रद्द करणेत येईल. त्यानंतर तुमची कोणतीही तक्रार चालणार नाही. म्हणून आज रोजी माझी सही निशी व न्यायालयाच्या शिक्क्यानीशी दिली. दि. १०/०४/२०२६

सही/-
**एस.ए. मोटे**
**कनिष्ठ लिपीक**
**मे. दिवाणी न्यायालय व. स्तर, विटा**

कोर्टाचा शिक्का

सही/-
**के.एच. तौर**
**सहाय्यक अधीक्षक**
**मे. दिवाणी न्यायालय व. स्तर, विटा**


# प्रथम वर्ष इंजिनिअरिंग प्रवेशासाठी अर्ज नोंदणी १२ जुलैपर्यंत

### केंद्रीयकृत प्रवेश प्रक्रियेस डब्ल्यू.आय.टी. मध्ये प्रारंभ

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ जुलै -**

राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष (सीईटी सेल), महाराष्ट्र राज्य यांच्यामार्फत शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी प्रथम वर्ष अभियांत्रिकी व तंत्रज्ञान (बी.ई./बी. टेक. चार वर्षे) तसेच मास्टर ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी (एकात्मिक पाच वर्षे) अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेला सुरुवात झाली आहे. ही संपूर्ण प्रक्रिया केंद्रीकृत प्रवेश प्रक्रिया अंतर्गत राबविण्यात येत असून राज्यातील विद्यार्थ्यांसाठी ती अधिक पारदर्शक, सुलभ आणि विद्यार्थीकेंद्रित करण्यात आली आहे.

या प्रवेश प्रक्रियेदरम्यान विद्यार्थ्यांना मार्गदर्शन व आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी सोलापूर येथील वालचंद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी हे स्वायत्त महाविद्यालय प्रवेश नोंदणी केंद्र म्हणून कार्यरत आहे. येथे विद्यार्थ्यांना अर्ज भरणे, आवश्यक कागदपत्रे अपलोड करणे तसेच पडताळणी प्रक्रियेबाबत प्रत्यक्ष सहाय्य उपलब्ध करून दिले जात आहे, अशी माहिती प्र. प्राचार्य डॉ. सचिन गेंगजे यांनी दिली. ऑनलाइन अर्ज नोंदणी प्रक्रिया सुरू झाली असून १२ जुलै रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंत विद्यार्थ्यांना अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत आहे. महाराष्ट्र राज्यातील तसेच अखिल भारतीय, जम्मू-कश्मीर आणि लडाख केंद्रशासित प्रदेशातील स्थलांतरित उमेदवारांसाठी ही प्रक्रिया लागू आहे. विद्यार्थ्यांनी आवश्यक कागदपत्रांसह ऑनलाइन अर्ज भरून माहिती संकेतस्थळावर अपलोड करणे आवश्यक आहे.

प्रवेश प्रक्रियेतील पुढील टप्पा म्हणजे अर्ज पडताळणी व पुष्टीकरण प्रक्रिया, १३ जुलै २ सायंकाळी ५ वाजेपर्यंत सुरू राहणार आहे. या कालावधीत विद्यार्थ्यांच्या अर्जांची तपासणी करून त्यास मान्यता दिली जाणार आहे. यामध्ये ई-पडताळणी आणि प्रत्यक्ष पडताळणी असे दोन पर्याय उपलब्ध करून देण्यात आले आहेत. ई-पडताळणी निवडणाऱ्या विद्यार्थ्यांना सुविधा केंद्रावर प्रत्यक्ष जाण्याची गरज नाही. अर्जातील त्रुटी असल्यास त्या विद्यार्थ्यांच्या लॉगिनवर कळविण्यात येऊन दुरुस्ती करण्याची संधी दिली जाणार आहे.

तांत्रिक शिक्षण संचालनालय (डीटीई) यांच्या वेळापत्रकानुसार ही संपूर्ण प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येणार असून विद्यार्थ्यांनी व पालकांनी वेळेत अर्ज प्रक्रिया पूर्ण करून उपलब्ध सुविधा व मार्गदर्शनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्रवेश प्रक्रिया समन्वयक प्रा. संजय मठ यांनी केले आहे. केंद्रीकृत प्रवेश प्रक्रियेमुळे राज्यातील अभियांत्रिकी प्रवेश अधिक सोपा, पारदर्शक आणि विद्यार्थीहिताचा होणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.


### खरेदीपूर्व जाहीर नोटीस

तमाम लोकांस व विशेषतः ग्रामीण व शहर सोलापूर यांना कळविण्यात येते की, **मिळकतीचे वर्णन :-** डि. व सब डि. सोलापूर पैकी ता. उत्तर सोलापूर पैकी शहर सोलापूर महानगरपालिकेच्या हद्दवाढ भागातील मौजे बाळे येथील गट नं.८८/१ यापैकी पश्चिमेकडील क्षेत्र ०.१५.०० हे. आर.चौ.मी. यांसी आकार ० रू. ७५ पैसे इतके असून यापैकी २००० चौ. फुट अथवा १८५.८७ चौ.मी. इतकी खुली जागा असून त्यांसी चतुःसिमा :- पूर्वेस :- खरेदीखत देणार यांचे मालकीचे १५ आर. पैकी उर्वरित खुली जागा, पश्चिमेस :- सोनटक्के यांची जमीन, दक्षिणेस :- सोलापूर-पुणे हायवे (सर्व्हीस रोड), उत्तरेस :- खरेदीखत देणार यांचे मालकीचे १५ आर. पैकी उर्वरित खुली जागा, येणेप्रमाणे नमूद मिळकतीतील चतुःसिमेतील खुली जागा. यातील दगड, माती, वगैरे, इतर तद्ंगभूत वस्तूंसह व इजमेंटच्या सर्व हक्कांसह व वहिवाटीच्या रस्त्याच्या कायम वहिवाटीचे सर्व हक्कांसह.

वर नमूद मिळकत ही सौ. दिपा युवराज दळवी यांच्या मालकी व कब्जेवहिवाटीची असून सदर वर नमूद मिळकत त्यांनी आमचे अशिल नामे अजित नवनाथ राठोड व सचिन शरणप्पा वाडी यांना कायमस्वरुपी खुशखरेदी करून देण्याचे निश्चित करुन इसारा रक्कम स्विकारुन तशी इसारापावती केलेली आहे. वर नमूद मिळकत ही निर्वेध व निजोखमी असून त्यावर त्यांचेशिवाय इतर कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क व अधिकार नाही. तसेच सदरची मिळकत ही त्यांनी यापूर्वी कोणासही विक्री, ट्रान्सफर, गहाण, दान, टाच, लिज अथवा अन्य मार्गाने गुंतविलेला नाही अशी हमी व खात्री त्यांनी आमच्या अशिलांना दिलेली आहे.

तरी सदरहू मिळकतीवर जर कोणाचा मालकी हक्क, हितसंबंध, कब्जा, गहाण, दान, लिज, इजमेंट राईट कोर्टाची टाच, वित्त संस्थेचा बोजा अगर इतर बँकेचा बोजा वगैरे कांही असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिध्द झाले पासून ०७ (सात) दिवसांचे आत खालील दिलेल्या पत्त्यावर आपल्या हरकती, तक्रारी, लेखी स्वरुपात नोंदवाव्यात. जर वरील मुदतीत कोणाचीही हरकत व लेखी तक्रार नमूद पत्त्यावर न आल्यास सदरची वर वर्णन केलेली मिळकत ही निर्वेध व निजोखमी असल्याचे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील. तद्नंतर कोणाचीही कसल्याही प्रकारची तक्रार अगर हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक असणार नाही, याची नोंद घ्यावी. कोणाचीही फसगत होऊ नये म्हणून ही जाहीर नोटीस दिली.

ही जाहीर नोटीस दिली ता.०३/०७/२०२६.

सही/-
**संतोष आबासाहेब पाटील**
**बी.ए., एलएल.बी., एलएल.एम. ॲडव्होकेट**
**घर नं. क-३०५, पोतदार इंग्लिश शाळेसमोर, राजस्व नगर, विजापूर रोड, सोलापूर.**
**मो.नं.९९२२२१३२८६**
**अशिलातर्फे ॲडव्होकेट**



जा.क्र./नप/७८७/२०२६
नगरपंचायत कार्यालय माळशिरस.
दिनांक :- ०३/०७/२०२६

## माळशिरस नगरपंचायत, माळशिरस

### आरोग्य विभाग

### ई-निविदा सूचना

**Main Portal :- http://mahatendersgov.in**

माळशिरस नगरपंचायत माळशिरस आरोग्य विभागाकडून खालील नमुद तपशिलाप्रमाणे घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत कामकाज करणाऱ्या मक्तेदार यांचेकडून सन २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी शहरातील मोकाट कुत्र्यांचे निर्बीजीकरण व लसीकरण करणे या कामाची निविदा मागविण्यात येत आहे.

| अ. न. | कामाचे नाव | अंदाजित रक्कम रुपये | बयाणा रक्कम रुपये | निविदा फॉर्म फी |
|---|---|---|---|---|
| १ | घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत माळशिरस दैनंदिन शहरातील रस्ते सफाई करणे व मृत जनावरे उचलणे त्याची विल्हेवाट लावणे, दैनंदिन शहरातील गटार सफाई करणे, दैनंदिन शहरातील घर ते घर कचरा संकलन करणे त्याचे विलगीकरण करणे व कचरा डेपो येथे वाहतूक करुन नेणे, सार्वजनिक शौचालय व मुताऱ्या साफ करणे, शहरामध्ये आवश्यकतेनुसार धुर (फॉगींग) फवारणी करणे. | र.रु. १,०३,२०,८६२/- | १,०३,२०८/- | १०,०००/- |

**निविदा बाबत अटी व शर्ती -**

१) निविदा ऑनलाईन दि.०४/०७/२०२६ ते दि.१०/०७/२०२६ रोजीपर्यंत उपलब्ध होतील. निविदा स्विकारण्याची अंतिम दिनांक १०/०७/२०२६ दु. ०४.०० वा. पर्यंत राहील.
२) निविदा मधील तांत्रिक लिफाफा क्र. १ चा लिफाफा हा दि. १३/०७/२०२६ रोजी व दिनांक १४/०७/२०२६ रोजी (शक्य झाल्यास) आर्थिक लिफाफा क्र.२ चा लिफाफा उघडण्यात येईल.
३) निविदा भरणेसाठी दोन लिफाफा पध्दतीचा वापर करण्यात यावा लिफाफा क्र. १ मध्ये ठेक्यासंबंधी कागदपत्र विषयी माहिती व लिफाफा क्र.२ मध्ये निविदा दर नमुद करावेत.

शिक्का

सही/-
**मुख्याधिकारी**
**नगरपंचायत माळशिरस**



# पोर्तुगालने क्रोएशियाला स्पर्धेतून बाहेर काढले



टोरंटो येथे क्रोएशियाविरुद्धच्या अंतिम-३२ संघांच्या फेरीतील सामन्यादरम्यान हेडरद्वारे गोल करताना पोर्तुगालचा गोंसालो रामोस (९)



क्रोएशियाविरुद्ध पहिला गोल केल्यावर आनंद साजरा करताना ख्रिस्तियानो रोनाल्डो

**टोरोंटो, ३ जुलै**

फिफा विश्वचषक फुटबॉल स्पर्धेत नाट्यमय अखेरच्या क्षणी घेतलेल्या वार निर्णयामुळे पोर्तुगालने क्रोएशियाला स्पर्धेतून बाहेर काढले. येथे खेळल्या गेलेल्या अंतिम -३२ संघांच्या फेरीतील रोमांचक सामन्यात पोर्तुगालने क्रोएशियाला २-१ ने हरवले. या सामन्यात गोन्कालो रामोसने अतिरिक्त वेळेत हेडरद्वारे विजयी गोल केला, तर जोस्को ग्वार्डिओलचा बरोबरी साधणारा गोल वादग्रस्तपणे रद्द करण्यात आला.

या सामन्यात इव्हान पेरिसिचने केलेला पहिला गोल ख्रिस्तियानो रोनाल्डोच्या विश्वचषकातील पहिल्या नॉकआऊट गोलने सामना बरोबरीत आणला होता. या सामन्यात ४१ वर्षीय रोनाल्डोचे चार गोल ऑफसाईडमुळे रद्द करण्यात आले, ज्यात स्पर्धेतील सर्वोत्तम गोलचा दावेदार ठरू शकणाऱ्या गोलचाही समावेश होता.

पूर्वार्धात पोर्तुगालचे वर्चस्व होते आणि चौथ्या मिनिटालाच राफेल लिओने ब्रुनो फर्नांडिसला पास दिल्यावर त्यांना आघाडी घेण्याची संधी होती, परंतु दोनदा त्यांना रोखण्यात आले- प्रथम डॉमिनिक लिवाकोविचने केलेल्या बचावामुळे आणि नंतर बचावपटूंनी केलेल्या अथक प्रयत्नांमुळे. ख्रिस्तियानो रोनाल्डोने विश्वचषकाच्या बाद फेरीतील आपला पहिला गोल केल्यानंतर, गोंकालो रामोसने ९४व्या मिनिटाला निर्णायक गोल करून पोर्तुगालला पिछाडीवरून क्रोएशियावर मात करण्यास मदत केली आणि अंतिम १६ संघांमध्ये प्रवेश केला.

उत्तरार्धात बदली खेळाडू म्हणून आलेल्या रामोसने, राफेल लिओच्या अप्रतिम क्रॉसवर क्रोएशियाच्या दोन बचावपटूंना मागे टाकत हेडरद्वारे गोल केला, ज्यामुळे हा रोमांचक सामना अतिरिक्त वेळेकडे जात असल्याचे दिसत होते.

जोस्को ग्वार्डिओलला वाटले की त्याने स्टॉपेज टाइमच्या १३व्या मिनिटाला गोल करून क्रोएशियाला वाचवले आहे, परंतु व्हिडिओ असिस्टंट रेफरीने हस्तक्षेप केला आणि तो गोल ऑफसाइड ठरवून रद्द करण्यात आला. अंतिम सोळा संघांच्या फेरीत पोर्तुगालचा सामना युरोपियन विजेत्या स्पेनशी टेक्सास येथील डॅलास स्टेडियमवर सोमवारी होईल. ◂(वृत्तसंस्था)

# स्पेन उप-उपांत्यपूर्व फेरीत

## ऑस्ट्रियावर ३-० ने विजय

**लॉस एंजेलिस, ३ जुलै**

फिफा विश्वचषक फुटबॉल स्पर्धेत अंतिम-३२ फेरीच्या सामन्यात स्पेनने प्रभावी कामगिरी करत ऑस्ट्रियावर सरळ ३-० ने विजय नोंदविला. मिकेल ओयारझाबल आणि पेड्रो पोरो हे स्पेनच्या विजयाचे शिल्पकार ठरले. या विजयाबरोबरच स्पेनने अंतिम सोळामध्ये आपले स्थान निश्चित केले असून आता त्यांचा उप-उपांत्यपूर्व सामना पोर्तुगालविरुद्ध होईल.

ओयारझाबलने सामन्याच्या ३६ व्या मिनिटाला आणि सामन्याच्या अखेरीस ८९ व्या मिनिटाला असे दोन गोल केले, तर यादरम्यान ६६ व्या मिनिटाला पेड्रो पोरो याने एका गोलची भर घातली. पेड्रो पोरोचा हा देशासाठीचा पहिला गोल ठरला.

२०१० मध्ये दक्षिण आफ्रिकेत मिळवलेल्या विजयानंतर विश्वचषकाच्या बाद फेरीत स्पेनचा हा पहिलाच विजय ठरला. या विजयाचे बक्षीस म्हणून त्यांना ६ जुलै रोजी डॅलस येथे पोर्तुगालविरुद्ध अंतिम सोळा फेरीचा सामना खेळावा लागणार आहे.

सामन्याच्या पहिल्याच मिनिटाला गोलवर शॉट मारून लॅमिन यामलने आक्रमक सुरुवात केली आणि जसा खेळ पुढे सरकला तसा युरोपियन चॅम्पियन्सचा धोका वाढत गेला. कॉर्नर किकवर मार्क कुकुरेलाने स्पेनला आघाडी मिळवून दिली असे वाटले होते, परंतु गोलरक्षक अलेक्झांडर श्लागरविरुद्ध फाऊल झाल्यामुळे तो गोल अमान्य करण्यात आला. ३६ व्या मिनिटाला ओयारझाबलने गोलची कोंडी फोडली; कुकुरेलाने डावीकडून जमिनीलगतचा पास दिला आणि बास्क फॉरवर्ड खेळाडूने फटका मारत चेंडू कोपऱ्यात धाडला. या स्पर्धेतील त्याचा हा तिसरा गोल ठरला. ◂(वृत्तसंस्था)

### आजचे उप-उपांत्यपूर्व फेरीचे सामने

**कॅनडा वि. मोरोक्को**
**वेळ :** रात्री १०.३० वाजतापासून
**स्थळ :** ह्युस्टन स्टेडियम, ह्युस्टन

**पॅराग्वे वि. फ्रान्स**
**वेळ :** रात्री २.३० वाजतापासून
**स्थळ :** फिलाडेल्फिया स्टेडियम, फिलाडेल्फिया
**थेट प्रसारण :** युनाईट८ (झी५)



लॉस एंजेलिस येथे ऑस्ट्रियाविरुद्धच्या सामन्यादरम्यान दुसरा गोल करताना स्पेनचा पेड्रो पोरो (१२)

# पॉवर मॉम संघास विजेतेपद

## आयएमएस महिला पॅरेंट्स क्रिकेट लीग: अस्मिता अंबुरे सामनावीर व मालिकावीर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ जुलै -**




इंडियन मॉडेल इंटरनॅशनल स्कूलतर्फे महिला पालकांसाठी आयोजित करण्यात आलेल्या इंडियन मॉडेल महिला पॅरेंट्स बॉक्स क्रिकेट लीग सीझन २स्पर्धेत पॉवर मॉम संघाने रायझिंग स्टार मॉम संघावर १२ धावांनी मात करून विजेतेपद पटकावले.

अंतिम सामन्यात प्रथम फलंदाजी करताना आयएमएस पॉवर मॉम संघाने ७ षटकांत २ बाद ५० धावा केल्या. प्रत्युत्तरादाखल आयएमएस रायझिंग स्टार मॉम संघाला ७ षटकांत २ बाद ३८ धावांपर्यंतच मजल मारता आली. त्यामुळे आयएमएस पॉवर मॉम संघाने १२ धावांनी शानदार विजय मिळविला.

या स्पर्धेत अस्मिता अंबुरे यांनी सामनावीर आणि मालिकावीर हे दोन्ही महत्त्वाचे पुरस्कार पटकावले. याशिवाय उत्कृष्ट फलंदाज म्हणून पायल कोठारी, उत्कृष्ट गोलंदाज म्हणून जयश्री रुग्गे आणि उत्कृष्ट क्षेत्ररक्षक म्हणून अश्विनी देगावकर यांना सन्मानित करण्यात आले.

स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ शाळेचे सचिव अमोल जोशी, श्री साई महिला प्रतिष्ठानच्या सचिव सायली जोशी, महानगरपालिका अतिरिक्त आयुक्त वीणा पवार, एस.के. डेव्हलपर्सचे संजय कुलकर्णी व अमृता कुलकर्णी, मुख्याध्यापिका अपर्णा कुलकर्णी तसेच मानसी जोशी, ममता बसवंती, आदिती कुलकर्णी, सुजाता बुट्टे, रुही काझी, अचला राचर्ला आणि अक्षय्या कुलकर्णी यांच्या प्रमुख उपस्थितीत झाला.

या स्पर्धेचे पंच म्हणून अजय चाबुकस्वार आणि राजकुमार माने यांनी काम पाहिले. सूत्रसंचालन आरती काजळे यांनी केले, तर आभार प्रदर्शन अक्षय माने यांनी केले. स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी क्रीडाशिक्षक सचिन ढवाण, अक्षय माने, राजकुमार माने, अजय चाबुकस्वार, वैष्णवी गडदे तसेच आयएमएस शाळेतील सर्व कर्मचारी आणि पालकांचे सहकार्य लाभले.



# एन.एस.अंकुश इलेव्हन संघ विजेता

## पिलीव प्रिमीअर लीग

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि ३ जुलै-**

एन.एस.अंकुश इलेव्हन संघाने पिलीव प्रिमीअर लीग क्रिकेट स्पर्धे चे विजेतेपद पटकाविले.

माळशिरस तालुक्यातील पिलीव येथे अँड मानसिह जहागिरदार मैदानावर आयोजित केलेल्या या हाफ पिच क्रिकेट स्पर्धेत दहा संघ सहभागी झाले होते. अंतीम सामन्यात एन.एस अंकुश इलेव्हन संघाने स्वराज्य इलेव्हनचा३४ धावांनी पराभव केला. अंकुश इलेव्हन संघाने ५७ धावा केल्या होत्या. मात्र स्वराज्य इलेव्हनचा संघ २३ धावाताच गारद झाला.तिसऱ्या क्रमांकाचे बक्षीस विशाल इलेव्हन व इरफान इलेव्हन या संघाला विभागून देण्यात आले.

विजेत्या व उपविजेत्या संघास २१ व ११ हजार रुपये ट्रॉफी अँड मानसिह जहागिरदार, समरजितसिह जहागिरदार, शहाजी शेठ महाडिक, उमेशभाऊ सरवदे, मोहन करांडे, दामोदर लोखंडे, प्रकाश जाधव, जुबेर पठाण, नानासाहेब मदने, सचिनदादा मदने, जुबेर पठाण, समशेरसिंग रजपूत, यांच्यासह अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत विजेत्या देण्यात आली.

# डॉ. देशपांडे आणि श्रीनिवास शिवाळ संघांचे दणदणीत विजय

## लिटिल चॅम्प १२ वर्षांखालील क्रिकेट : दक्ष मोरे, प्रणव शिंदे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ जुलै-**

लिटिल चॅम्प १२ वर्षांखालील क्रिकेट स्पर्धेत डॉ. देशपांडे संघ आणि श्रीनिवास शिवाळ संघाने आपापल्या सामन्यात ८ विकेट्स राखून दणदणीत विजय मिळवले. दोन्ही संघांनी उत्कृष्ट गोलंदाजीच्या जोरावर प्रतिस्पर्ध्यांना नमवून स्पर्धेत आगेकूच केली आहे.

जुळे सोलापुरातील भंडारी मैदानावर सुरू असलेल्या या स्पर्धेत पहिल्या सामन्यात हेमंत हबीब संघाने प्रथम फलंदाजी करताना १६.५ षटकांत ९ बाद ६३ धावा अशी धावसंख्या उभारली. प्रत्युत्तरात डॉ. देशपांडे संघाने अवघ्या ८.५ षटकांत २ गड्यांच्या मोबदल्यात ६४ धावा करत विजय सुकर केला. या सामन्यात डॉ. देशपांडे संघाच्या दक्ष मोरे याने प्रभावी गोलंदाजी केली. त्याने ३ षटकांत अवघ्या ५ धावा देऊन २ बळी घेतले. त्याच्या या उत्कृष्ट कामगिरीबद्दल त्याला सामनावीर पुरस्काराने गौरविण्यात आले. या सामन्यासाठी पंच म्हणून सोम्या अडकी व चंदू मंजेली यांनी काम पाहिले.



दक्ष मोरे



प्रणव शिंदे

दुसऱ्या एका सामन्यात खुद्दुस खान संघाने प्रथम फलंदाजी करताना २९.५ षटकांत सर्वबाद ९८ धावा केल्या. विजयासाठी मिळालेले ९९ धावांचे आव्हान श्रीनिवास शिवाळ संघाने अवघ्या १२.१ षटकांत २ गडी गमावून १०१ धावा करत सहज पार केले. श्रीनिवास शिवाळ संघाच्या प्रणव शिंदे याने अष्टपैलू कामगिरी बजावत संघाच्या विजयात मोलाचे योगदान दिले. त्याने ८ षटकांत १९ धावा देऊन ४ बळी घेतले, तसेच फलंदाजीत १२ चेंडूंत नाबाद ४ धावा केल्या. त्याला या सामन्याचा सामनावीर म्हणून घोषित करण्यात आले. या सामन्यात अशोक डोंबाळे व मोहसिन मुल्ला यांनी पंच म्हणून, तर शुभम मुतूर यांनी स्कोरर म्हणून जबाबदारी सांभाळली.

# आशा कार्तिकेयन, शैलजा कुमार, उमेश बडगेर, आदित्य भावे यांची आगेकूच

## वरिष्ठांची जागतिक मानांकन लॉन टेनिस स्पर्धा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, ३ जुलै -**

सोलापूर जिल्हा लॉन टेनिस संघटनेने अखिल भारतीय लॉन टेनिस संघटना व महाराष्ट्र राज्य लॉन टेनिस संघटनेच्या मान्यतेखाली आयोजित केलेल्या वरिष्ठांच्या पाचव्या जागतिक मानांकन लॉन टेनिस स्पर्धेत आशा कार्तिकेयन, शैलजा कुमार, उमेश बाडगर, आदित्य भावे यांनी आपापल्या गटातील प्रतिस्पर्धी खेळाडूंचा पराभव करून आगेकूच केली.

एमएसएलटीए टेनिस सेंटर, जिल्हा क्रीडा संकुल आणि इलिझियम क्लबच्या मैदानावर शुक्रवारपासून सुरू झालेल्या या स्पर्धेत देशभरातून एकूण १३५ खेळाडू सहभागी झाले आहेत.

स्पर्धेत ३० वर्षांवरील पुरुष गटात उमेश बाडगरने आदित्य गडियाचा ६-२, ६-१ असा तर, चौथ्या मानांकित हातिम मोडने विकास कुकरेजाचा ६-१, ६-३ असा पराभव केला. चुरशीच्या लढतीत आदित्य भावे याने गौरव राववर ७-५, ४-६, १०-७ असा विजय मिळवला. याच महिला गटात उपांत्यपूर्व फेरीत आशा कार्तिकेयन हिने शैली त्रिवेदीला ६-४, ६-३ असे पराभूत केले. तर, शैलजा कुमारने तब्बसुम शेखचा ६-१,




६-१ असा सहज पराभव करून उपांत्य फेरी गाठली.

याआधी स्पर्धेचे उदघाटन सोलापूरचे जिल्हा क्रीडा अधिकारी प्रकाश मोहरे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी शंकर कांबळे, मा.जिल्हाधिकाऱ्यांचे स्वीय सहाय्यक, स्पर्धा संचालक डोसा रामाराव, एमएसएलटीएचे सह सचिव राजीव देसाई तसेच आंतरराष्ट्रीय टेनिस पटू संध्याराणी बंडगर, आयटीएफ सुपरवायझर वैशाली शेकटकर, शंकर कांबळे, कुलदीप सोनावणे, स्वाती पुलगम, श्वेतांबरी चव्हाण, पारुल सिक्रोरिया, कुमार रव्वा,



विकास सोनी , व खेळाडू आदी मान्यवर उपस्थित होते. ही मानांकन स्पर्धा ३ ते ९ जुलै या कालावधीत सकाळी ९ ते रात्री १० या वेळेत खेळवली जाणार आहे.

या स्पर्धेत ३० ते ७५ वर्षां पुढील पुरुष, तर ३० ते ५० वर्षां पुढील महिला खेळाडू सहभागी झाले असून यामध्ये पुरुषांच्या व महिलांच्या एकेरी, दुहेरी आणि मिश्र दुहेरी अशा लढती पाहायला मिळतील. या स्पर्धेतील कामगिरीमुळे खेळाडूंना आंतरराष्ट्रीय गुण मिळणार असून, त्यांना जागतिक क्रमवारीत पुढे जाण्यासाठी मोठी मदत होणार आहे. प्रत्येक वयोगटातील सर्वाधिक गुण मिळवणारे पहिले ४ खेळाडू जानेवारी २०२७ मध्ये पोर्तुगाल येथे होणाऱ्या जागतिक मास्टर्स स्पर्धेसाठी भारतीय संघात निवडले जाणार आहेत. जानेवारी ते जुलै २०२६ या कालावधीत देशात अशा एकूण ११ जागतिक मानांकन स्पर्धांचे यशस्वी आयोजन करण्यात आले असून या स्पर्धेची लोकप्रियता दिवसेंदिवस वाढत आहे.

**निकाल: पहिली फेरी: ३० वर्षांवरील पुरुष:** उमेश बाडगर(भारत) वि.वि.आदित्य गडिया(भारत)६-२, ६-१; आदित्य भावे(भारत)वि.वि. गौरव राव(भारत)७-५, ४-६, १०-७; हातिम मोड(भारत)४वि.वि.विकास कुकरेजा(भारत) ६-१, ६-३; नयन पानगंटी(भारत) वि.वि.सत्येंद्र कुमार(भारत) ६-१, ६-१; बालाजी परी(भारत) वि.वि.समर खान(भारत) ४-६, ६-३, १०-६. **महिला:** उपांत्यपूर्व फेरी: आशा कार्तिकेयन(भारत) वि.वि.शैली त्रिवेदी(भारत) ६-४, ६-३; शैलजा कुमार(भारत) वि.वि.तब्बसुम शेख(भारत) ६-१, ६-१.

**३५ वर्षांवरील पुरुष:** प्रसनजीत पॉल(भारत) वि.वि.उत्कर्ष फिरके(भारत) ६-१ ,६-२; उमाकांत कुलकर्णी(भारत) वि.वि.रोहन आजमनी(भारत) ६-२, ६-१.

**४० वर्षांवरील पुरुष:** पहिली फेरी:शशीधर रेड्डी पूछकायाला(भारत)वि.वि. ऋषिकेश क्षीरसागर(भारत)६-१, ६-०; भरत पॉल सिंग(भारत)वि.वि.जयनारायण केआर(भारत) ४-६, ७-५, १०-६; अनमोल शर्मा(भारत)वि.वि.राजेश अद्दाला(भारत) ६-२, ४-६, १०-७.

**४५ वर्षांवरील पुरुष:** अपूर्व यतेंद्र(भारत) वि.वि.रवी तेज उमथला (भारत) ६-४, ६-४; सेल्वम के(भारत) वि.वि.देवानंद महापती(भारत)६-३, ७-६(६); नरेंद्र सिंग चौधरी(भारत) वि.वि.अरिंदम देब(भारत) ६-३, ६-१; आशुतोष शर्मा(भारत) वि.वि.रजनीकांत कुलकर्णी(भारत) ६-०, ६-१; चंद्रशेखर व्ही(भारत)४ वि.वि. मनिष पांडे(भारत) ६-२, ६-०; सुमेश नायर(भारत) वि.वि.सुदीप्ती साहू(भारत) ६-०, ६-०; संदीप बेडेकर(भारत)३वि. वि.वेंकटेश श्रीदेवी(भारत) ६-०, ६-२.



# शारीरिक शिक्षण विषयाच्या तासिका पुर्ववत ठेवा

## महाराष्ट्र क्रीडा व शारीरिक शिक्षण शिक्षक महासंघाच्या सोलापूर शाखेची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि ३ जुलै-**

महाराष्ट्र शासनाने यावर्षी प्राथमिक शाळेतील शारिरीक शिक्षण विषयाच्या तासिका कमी केल्याने क्रीडा शिक्षकांवर व विशेषतः खेळाडूवर वर्कलोड बाबत अन्याय होणार आहे. त्यामुळे शारीरिक शिक्षण विषयाच्या तासिका पुर्ववत ठेवण्याची मागणी महाराष्ट्र राज्य क्रीडा व शारीरिक शिक्षण शिक्षक महासंघाच्या सोलापूर जिल्हा शाखेने केली आहे.

क्रीडा शिक्षकांच्या शिष्टमंडळाने सोलापूर महानगरपालिका प्रशासनाधिकारी मल्हारी माने यांची भेट घेऊन शारीरिक शिक्षणाच्या तासिका कमी न करण्याबाबत निवेदन दिले. प्रशासन अधिकाऱ्यांनी दि. २३ जून रोजी परिपत्रकाद्वारे इयत्ता पहिली ते आठवीच्या वर्गाच्या शारीरिक शिक्षणाचे दोन तास कमी करुन ते मुल्य संवर्धन विषयाला देण्यात यावे, असे आदेश सर्व शाळाना दिले होते. या आदेशामुळे शारीरिक शिक्षणाचा ५०% वर्कलोड कमी होणार आहे. तसे झाले तर अनेक क्रीडा शिक्षकांच्या कार्यभारावर परिणाम होणार होणार आहे. यावर प्रशासन अधिकाऱ्यांसोबत सकारात्मक चर्चा झाली. सदर पत्रक रद्द करण्याचे आश्वासन दिल्यामुळे या संदर्भात होणारे अंदोलन स्थगीत करण्यात आले. यावेळी जिल्हाध्यक्ष दशरथ गुरव, शहराध्यक्ष विठ्ठल कुंभार, संतोष जाधव, प्रा. राहुल हजारे, प्रा. प्रमोद संगे, प्रा. सागर गायकवाड, डॉ. उज्वल मलजी, संजय पंडित, प्रसन्न काटकर, शितल शिंदे, पप्पू मैत्री आदी क्रीडा शिक्षक उपस्थित होते.

## महत्वाचे...



### महाराष्ट्र विद्यालयात विद्यार्थ्यांचे स्वागत

**बार्शी दि. ३ जुलै -**

श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित महाराष्ट्र उच्च माध्यमिक विद्यालय, बार्शी येथे इयत्ता अकरावीच्या नवीन प्रवेशित विद्यार्थ्यांचे स्वागत झाले. सकाळी शाळेच्या प्रांगणात प्राचार्य कविता धावणे व सर्व शिक्षकांच्याहस्ते नवागत विद्यार्थ्यांना गुलाब पुष्प दिले. प्राचार्य व सर्व शिक्षकांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज व कर्मवीर डॉ.मामासाहेब जगदाळे यांच्या प्रतिमांचे पूजन केले. प्रास्ताविक कला विभाग प्रमुख प्रा. संजय बागल यांनी केले. शिक्षकांची ओळख विद्यार्थ्यांना करुन दिली. प्राचार्य कविता धावणे यांनी विद्यार्थ्यांना गुणवत्ता व शिस्त यांचे पालन करावे, मोठी स्वप्न उराशी बाळगून सतत यशासाठी प्रयत्नशील राहावे, असे सांगितले. सूत्रसंचालन प्रा.ज्योती डमरे (रेवडकर) यांनी केले. आभार प्रा. हरिश्चंद्र बेडकुते यांनी मानले.



### चैतन्य कुटी येथील रक्तदान शिबीरात ५५ जणांचा सहभाग

**श्रीपूर, दि ३ जुलै -**

दुरणे वस्ती (माळीनगर) येथील चैतन्य कुटीत नारायण ढेकणे महाराज यांच्या जन्म शताब्दीनिमित्त आयोजित रक्तदान शिबीरात ५५ जणांनी सहभाग नोंदवला.चैतन्य कुटीचे प्रमुख श्रीपाद तीर्थस्वामींच्या हस्ते शिबीराचे उदघाटन झाले. त्यांनी रक्तदान शिबीर आयोजनाची भुमिका सांगितली. अकलुज येथील स.म. शंकरराव मोहिते पाटील ब्लड बँकेतर्फे रक्त संकलन केले. यावेळी डॉ. अजित गांधी, सुमन धेंडे, अजित लोखंडे, विद्या काळे, पल्लवी क्षीरसागर, अभिजीत पाटील, राजू दोरकर, ब्रिमा सागरचे अधिकारी धनंजय कुलकर्णी, अभिजित आहेरसिंग, डॉ. प्रकाश शिंदे उपस्थित होते. शिबिरासाठी गोरख काटकर, लक्ष्मण लोखंडे, अक्षय राऊत, संतोष सटाणे, अभिषेक कोळी, तुषार नाळे यांनी परिश्रम घेतले.



### आपुलकीला महिनाभरात ३६ हजार रुपयांचा निधी देणगी स्वरुपात प्राप्त

**सांगोला, दि. ३ जुलै -**

आपुलकी प्रतिष्ठान, सांगोला या सामाजिक संघटनेला देणगीदारांकडून मोठा पाठिंबा मिळाला आहे. दि.३१ मे ते ३० जून कालावधीत संस्थेला देणगी स्वरूपात ३५ हजार ९६५ रुपये निधी तसेच शैक्षणिक साहित्य आणि २ नवीन, २४ जुन्या सायकल देखील देणगी म्हणून दिल्या आहेत. गरजू विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी आणि त्यांच्या प्रगतीसाठी ही मदत अत्यंत मोलाची ठरणार आहे. देणगीदारांमध्ये प्रा.कमलाकर महामुनी, वसंत माने, प्रदीप बनसोडे, अनिल इंगवले, न्या.तेजवंत सिंग संधू, राजेंद्र बिरगे, श्रीकांत देशपांडे, कुमार कांबळे, अमोल बाबर, प्रा. महादेव उपलाने, अनामिक तसेच शैक्षणिक साहित्य देणाऱ्यांमध्ये राकेश ढाणके, स्वरूप अरबळी, राजकुमार बनसोडे, विलास नलवडे, बापूसाहेब ठोकळे, रविंद खंडागळे, काकासाहेब चन्ने यांचा समावेश आहे. अण्णासो इंगवले यांनी २ नवीन सायकल भेट दिल्या. पोपट नलावडे यांच्या स्मरणार्थ आकाश नलावडे यांच्याकडून रुग्णांच्या सेवेसाठी १ हॉस्पीटल बेड भेट मिळाला आहे. जुन्या २४ सायकल देणगीदारांनी दिल्या असून त्या दुरुस्त करून गरजू विद्यार्थ्यांना वाटप केल्या जात आहेत. आपुलकी प्रतिष्ठानने (संपर्क ९०११७०७०८०) नागरिकांना आगामी काळातही असेच सहकार्य कण्याचे आवाहन केले आहे.

## निधन वृत्त...

### वसंत कोटा



**सोलापूर, दि. ३ जुलै -**

सृष्टीनगर येथील वसंत नागनाथ कोटा यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. मृत्युसमयी ते ७१ वर्षाचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, एक मुलगी, सुन, जावई, नातवंडे असा परिवार आहे. त्यांची अंत्ययात्रा शनिवारी (दि. ४) रोजी सकाळी ९ वाजता अक्कलकोट रोडवरील सृष्टीनगर येथील राहत्या घरापासून निघणार आहे.

### मारुती कटकधोंड



**सोलापूर, दि. ३ जुलै-**

रविवार पेठ येथील रहिवासी मारुती (बाळू) नरसिंग कटकधोंड (वय ५०)यांचे निधन झाले आहे. त्यांच्या पश्चात पत्नी व दोन मुलं आणि वडील असा परिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर अंत्ययात्रा शनिवारी दुपारी १२ वाजता रूपाभवानी मंदिर येथील स्मशानभूमीमध्ये अंत्यसंस्कार होतील.

# जिल्ह्यात ग्रामीण पर्यटनाला मिळणार चालना

## जिल्हा पर्यटन अधिकारी लक्ष्मण कसेकर; पर्यटन गावे, कृषी पर्यटन केंद्रांवर भर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि. ३ जुलै-**

जिल्ह्यात ग्रामीण पर्यटनाला चालना देणे, स्थानिक स्तरावर रोजगाराच्या संधी निर्माण करणे तसेच जिल्ह्याच्या पर्यटन क्षमतेचा सर्वांगीण विकास साधणे या उद्देशाने विविध विशेष घटक आधारित पर्यटन गावे तसेच कृषी पर्यटन केंद्रे विकसित करण्यात येत असल्याची माहिती उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा पर्यटन अधिकारी लक्ष्मण कसेकर यांनी दिली.

उपक्रमांतर्गत पर्यटकांना ग्रामीण भागातील स्थानिक संस्कृती, इतिहास, कृषी परंपरा, पर्यावरण, जैवविविधता, ग्रामीण जीवनशैली, लोककला तसेच स्थानिक उत्पादनांचे वैशिष्ट्य प्रभावीपणे अनुभवता यावे, यासाठी विविध पर्यटन आकर्षणे विकसित करणार आहे. यामुळे ग्रामीण भागातील पर्यटन व्यवसायाला चालना मिळण्याबरोबरच स्थानिक नागरिकांना स्वयंरोजगार व उत्पन्नवाढीच्या नव्या संधी उपलब्ध होणार आहेत.

पर्यटन विकास उपक्रमांतर्गत विशेष घटक आधारित आकर्षण म्हणून जिल्ह्यातील ७ गावांचा विकास करण्यात येणार आहे.

विकास करणाऱ्या पर्यटन गावांमध्ये स्थानिक नैसर्गिक, सांस्कृतिक व कृषी वैशिष्ट्यांचा समन्वय साधून पर्यटकांसाठी आकर्षक सुविधा निर्माण करण्यात येणार आहेत. ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी देण्यासह जिल्ह्याची पर्यटन क्षेत्रातील स्वतंत्र ओळख निर्माण करण्यासाठी हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरणार आहे. जिल्ह्यातील नागरिक, ग्रामस्थ, शेतकरी तसेच पर्यटनाशी संबंधित उद्योजकांनी या उपक्रमात सक्रिय सहभाग घेऊन ग्रामीण पर्यटनाच्या विकासासाठी सहकार्य करावे, असे आवाहनही लक्ष्मण कसेकर यांनी केले आहे.



### या गावांचा होणार विकास

भालेवाडी (ता. मंगळवेढा), कोळे (ता. सांगोला), निमगाव मगर (ता. माळशिरस), लोंढेवाडी (ता. माढा), कात्रज (ता. करमाळा), कामती खुर्द (ता. मोहोळ) तसेच पिलीव (ता. माळशिरस) या गावांचा विकास करण्यात येत आहे.



# सुयश विद्यालय, बार्शीचे राज्य गुणवत्ता यादीत ८ विद्यार्थी

## शिष्यवृत्ती परीक्षा; ११८ विद्यार्थी शिष्यवृत्तीधारक

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि.३ जुलै-**

शिष्यवृत्ती परीक्षा २०२५-२६ मध्ये सुयश विद्यालय, बार्शीने राज्यात यश संपादन केले. पाचवी व आठवी या दोन्ही गटांत विद्यार्थ्यांनी विद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला.

पाचवीच्या श्रुती साठेने ९०.६६ टक्के गुणांसह गुणवत्ता यादीत राज्यात १५ वा क्रमांक पटकावला. ५८ विद्यार्थी शिष्यवृत्तीधारक ठरले. आठवीच्या राज्य गुणवत्ता यादीत ७ विद्यार्थ्यांनी स्थान मिळविले. उर्वीच दराडे व शौर्य गवळी दोघांनाही ९६% गुण, राज्यात तिसरा क्रमांक, सर्वज्ञ खराडे ९४% गुण- राज्यात आठवा, आर्या गणेश कुरुंद व तेजस जाधवर दोघांनाही ९२% गुण, राज्यात बारावा, अक्षरात ठोंगे व श्रेया तांबडे दोघांनाही ९१.३३% गुण, राज्यात चौदावा. आठवीतील ६० विद्यार्थी शिष्यवृत्तीधारक ठरले. इयत्ता पाचवी व आठवी मिळून विद्यालयाचे एकूण ११८ विद्यार्थी शिष्यवृत्तीधारक ठरले. इयत्ता पाचवीसाठी रेश्मा बोधले, अर्चना घोलप, सोनाली बोंगाळे आणि वैशाली गाडे यांनी मार्गदर्शन केले. इयत्ता आठवीसाठी विजयालक्ष्मी सुरवसे, अर्चना माने, सोनाली बोंगाळे आणि सुनिता शेटे यांनी मार्गदर्शन केले.

विद्यार्थ्यांचे मुख्याध्यापिका अलका जगताप, उपमुख्याध्यापक संदीप येवले, संस्थापक शिवदास नलवडे यांनी अभिनंदन केले. विद्यार्थ्यांच्या सत्कार समारंभास अध्यक्ष म्हणून पत्रकार संतोष सूर्यवंशी उपस्थित होते. शिवदास नलावडे, प्रमुख पाहुण्या म्हणून संस्थेच्या मार्गदर्शिका प्रतिभा नलवडे, संस्थेच्या मार्गदर्शिका माधुरी घोलप उपस्थित होत्या.



### 'एसकेएन सिंहगड'मध्ये डिझाईन तंत्रज्ञानविषयी कार्यशाळा

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि. ३ जुलै -**

एसकेएन सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालयात 'मॉडर्न सिमॉस डिझाईन फ्रॉम प्रोसेस टेक्नॉलॉजी टू डिजिटल बिल्डिंग ब्लॉक्स' या विषयावर कार्यशाळा झाल्याची प्राचार्य डॉ.कैलाश करांडे यांनी सांगितले.

इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन अभियांत्रिकी विभाग आणि आयईटीई स्टुडंट्स फोरम यांच्या संयुक्त विद्यमाने ही कार्यशाळा झाली. कार्यशाळेसाठी डॉ. धर्मेंद्र गणगे,पुणे हे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते. त्यांनी सिमॉस फॅब्रिकेशन प्रक्रिया, मॉस लेयर्स, स्टिक डायग्राम, लॅम्ब्डा-आधारित डिझाईन, सिमॉस प्रोसेस फ्लो तसेच डिजिटल बिल्डिंग ब्लॉक्स या विषयांवर मार्गदर्शन केले. उद्योगातील आधुनिक तंत्रज्ञान, सेमीकंडक्टर क्षेत्रातील करिअरच्या संधी आणि व्हीएलएसआय डिझाईनमधील नव्या प्रवाहांची माहिती दिली.

कार्यशाळेत तृतीय वर्ष व अंतिम वर्ष इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन अभियांत्रिकी विभागातील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. प्रश्नोत्तरांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी विविध तांत्रिक शंकांचे निरसन करून घेतले. कार्यक्रमाचे आयोजन कार्यशाळा समन्वयक डॉ. अंजली पिसे यांनी केले. कार्यक्रमासाठी डॉ. अल्ताफ मुलाणी (विभागप्रमुख), डॉ. स्वानंद कुलकर्णी (उपप्राचार्य) आणि डॉ. कैलाश करांडे (प्राचार्य) यांचे मार्गदर्शन लाभले. सूत्रसंचालन वैष्णवी पवार आणि निलोफर शेख यांनी केले. डॉ. कैलाश करांडे यांनी विद्यार्थ्यांनी अशा कार्यशाळांचा लाभ घेऊन आधुनिक तंत्रज्ञान आत्मसात करण्याचे आवाहन केले.

# शिक्षकांच्या आंदोलनाला डॉ.बी.पी रोंगे यांचा पाठिंबा

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.३ जुलै -**

खाजगी प्राथमिक व माध्यमिक शिक्षकांच्या प्रलंबित प्रश्नांसाठी राज्य शिक्षक समन्वय संघातर्फे मुंबईच्या आझाद मैदानावर धरणे आंदोलन सुरु आहे. आंदोलनाला गोपाळपूर (ता. पंढरपूर) येथील स्वेरीज कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ.बी. पी.रोंगे यांनी भेट दिली. शिक्षकांचे प्रश्न जाणून घेत आंदोलनाला पाठिंबा दिला.

आंदोलनात प्रामुख्याने २० टक्के, ४० टक्के, ६० टक्के अनुदान घेत असलेल्या प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा व वर्ग तुकड्यांना सरसकट हा शब्द वगळून यापुढील वाढीव टप्पे संच मान्यतेनुसार १ जून २०२६ पासून मिळावेत, त्रुटी पूर्तता केलेल्या शाळांना २५ ऑगस्ट २०२५ च्या शासन निर्णयानुसार समान टप्प्यावर अनुदान देण्यासाठी आदेश व्हावे. २०२२-२३ मध्ये शेवटच्या वर्गांची कमी पटसंख्येमुळे अपात्र केलेल्या शाळांना संचमान्यता २०२३-२४ किंवा २०२४-२५ च्या संच मान्यतेमधील पदे ग्राह्य धरण्यात येऊन अनुदान देण्यात यावे. तसे शुध्दीपत्रक काढण्यात यावे. पुणे स्तरावर अघोषित असणाऱ्या शाळा व वर्ग तुकड्या अनुदानासह घोषित करण्यात याव्यात, अंशतः अनुदानित शाळेतील शिक्षक/ शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना वैद्यकीय प्रतिपुर्ती योजना लागू करावी, अंशतः अनुदानित शाळेतील शिक्षकांची वयोमर्यादा ५८ वरून ६० वर्षे करणे आदी मागण्यांसाठी आंदोलन केले आहे.




आंदोलनाला पुणे विभाग शिक्षक मतदारसंघ निवडणूकीसाठी अग्रेसर असलेले उमेदवार व तज्ञ अभ्यासक प्राचार्य डॉ.रोंगे यांनी प्रत्यक्ष भेट दिली. आंदोलन प्रमुख खंडेराय जगदाळे यांच्याकडून नेमक्या काय मागण्या आहेत, त्या जाणून घेतल्या व त्यांच्या आंदोलनाला पाठिंबा दिला. यावेळी त्यांच्यासमवेत विविध पदाधिकारी व शिक्षक तसेच महाराष्ट्र राज्य शिक्षक समन्वय संघाचे पदाधिकारी उपस्थित होते.

### 'माता बालक'तर्फे राष्ट्रीय दिन साजरे

**सांगोला,दि.३ जुलै -**

सांगोल्यातील माता बालक उत्कर्ष प्रतिष्ठानतर्फे डॉक्टर, कृषी आणि चार्टर्ड अकाउंटंट दिन साजरे करण्यात आले. डॉ.नेहा पाटील, डॉ.केतकी देशपांडे, डॉ.स्मिता गव्हाणे, माधुरी कुलकर्णी, शालन गयाळी, उषा दहिवडकर, सीमा शिंदे यांचा सन्मान करण्यात आला. व्यासपीठावर संस्थेच्या अध्यक्षा निलिमा कुलकर्णी, कोषाध्यक्षा शालिनी कुलकर्णी, सचिव वसुंधरा कुलकर्णी, सहसचिव डॉ.केतकी देशपांडे उपस्थित होत्या. नियोजन निलिमा कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली नीता पोफळे, सुनिता नकाते, शकीला खतीब, अश्विनी कुलकर्णी, प्राजक्ता घोंगडे, शीतल भिंगे यांनी केले.

# अभियांत्रिकी, एमबीए व एमसीए प्रवेशासाठी 'फॅसिलिटेशन सेंटर'चे उद्घाटन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ जुलै -**

स्वामी विवेकानंद शिक्षण व ग्रामीण विकास संस्था, पंढरपूर संचलित व प्राचार्य डॉ. बी. पी. रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यरत स्वामी विवेकानंद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (एसव्हीआयटी), खेड-सोलापूर येथे महाराष्ट्र राज्य सामायिक प्रवेश परीक्षा सेल, मुंबई यांनी अभियांत्रिकी पदवी, एमबीए व एमसीए प्रवेश प्रक्रियेसाठी अधिकृत फॅसिलिटेशन सेंटर मंजूर केले आहे. या सुविधा केंद्राचे उद्घाटन संस्थेचे प्राचार्य डॉ. सुतार यांच्या हस्ते व कॅम्पस संचालिका कीर्ती भोसले यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले.

याप्रसंगी प्राचार्य डॉ. सुतार यांनी विद्यार्थ्यांनी फॅसिलिटेशन सेंटरचा



लाभ घ्यावा, असे आवाहन केले. कॅम्पस संचालिका कीर्ती भोसले यांनी अभियांत्रिकी पदवी, एमबीए व एमसीए अभ्यासक्रमांना इच्छुकांना सेंटर उपलब्ध असून, विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी केंद्र रविवारीदेखील सुरू राहणार आहे. ऑनलाइन अर्ज भरणे, नोंदणी, कागदपत्र पडताळणी, पर्याय भरणे तसेच प्रवेश प्रक्रियेसंदर्भातील सर्व आवश्यक मार्गदर्शन केंद्रामार्फत विनामूल्य उपलब्ध करून दिले जाणार आहे. संस्थेने सर्व इच्छुक विद्यार्थी व पालकांना प्रवेश प्रक्रियेचा लाभ घेण्यासाठी एसव्हीआयटी, खेड-सोलापूर येथील अधिकृत फॅसिलिटेशन सेंटरला भेट देण्याचे आवाहन केले आहे.

# कल्याण स्वामींची समाधी असलेले डोमगाव

***मराठवाड्याच्या धाराशिव जिल्ह्यातल्या परांडा तालुक्यात डोमगाव नामक खेडेगाव आहे. हे गाव सीना नदीकाठी आहे. या गावात समर्थ रामदास स्वामी यांचे पट्ट शिष्य कल्याण स्वामींची समाधी आहे. शाहू महाराजांच्या पत्नी बाई यांनी त्या समाधीसाठी टुमदार मंदिर बांधले आहे. मंदिराचे बांधकाम वैशिष्ट्यपूर्ण आहे. गावच्या मध्यभागी हे मंदिर, समाधी मठ आहे. या मंदिरात श्री राम पंचायत मूर्तीही प्रतिष्ठित आहेत. मंदिर गावातच असल्यामुळे गावकऱ्यांना दर्शनास येणे सोयीचे होते.***

काही वर्षांपूर्वी शेतीला पाण्याची सोय व्हावी या साठी या गावच्या खालच्या बाजूला सीना नदीवर धरण बांधले आहे. या धरणाच्या पाण्यामुळे डोमगाव बाधित झाले. समाधी मंदिराभोवती मातीचा भराव घालून मंदिरात धरणाचे पाणी येणार नाही अशी सोय केली आहे. परंतु या मंदिराचा आणि पुनर्वसित गावाचा धरणाच्या पाण्यामुळे संपर्क तुटला आहे. मंदिराच्या पूजा अर्चेसाठी मठपतीला एकट्याला मंदिराजवळ निवास करणे भाग आहे. या साठी पुनर्वसित गाव ठाण्यातून मंदिरात जाण्यासाठी धरणाच्या पाण्यात १०-१२ फूट रुंदीचा पूल बांधणे आवश्यक आहे.

कोळेगांव धरणापूर्वीच्या कल्याण स्वामींचा मठ गावातच असल्यासारखा होता. यामुळे मठपतीचे निवासस्थान मठाला लागूनच होते. मठात सहकुटुंब सहपरिवार तेथे राहत होते. समाधीचा व तिच्या पिछाडीस असलेल्या रामपंचायतनची पूजा अर्चा नैवेद्य इत्यादी सोपस्कार नित्य नेमाने होत असत. धरण झाल्यापासून समाधीमठ धरणाच्या पाण्याने वेढला गेला आहे. मठपतीला वास्तव्यासाठी जुजबी व्यवस्था आहे. मठपतीशिवाय इतर कोणाच्या वास्तव्याची सोय नसल्यामुळे मठपतींना एकट्यानेच तेथे वात्सव्य करावे लागत आहे. गावाशी त्यांचा संपर्क रहात नाही. विद्यमान मठपतीची पत्नी एकटेपणास कंटाळून माहेरी निघून गेली. एकटा मठपती पूजा-अर्चा नैवेद्य व स्वतःचा स्वयंपाक करून उदर भरण करत आहे. मठाच्या परिसराभोवती माती-मुरुमाचा बांध घालून मठाचे संरक्षण केले आहे. मठपतीचा पुनर्वसित गावाशी संपर्क राहिला नाही, गावच्या लोकांनाही मठात येणे आणि संपर्क ठेवणे शक्य नाही. धरणाच्या पाण्यातून साप-सरपटणारे प्राणी मठात सहज पोहोचू शकतात. त्यांच्यापासूनही मठपतीस धोका संभावतो. यातून मार्ग काढण्यासाठी पुर्नवसीत डोमगावपासून मठापर्यंत जाण्यासाठी जलाशय पार करण्यासाठी पूल बांधणे आवश्यक आहे. असा पूल उजनी धरणाच्या पाण्यात बांधणे सुरु आहे. इंदापूर तालुक्यातील तसेच धरणाच्या पलीकडील करमाळा तालुक्यातील गावकऱ्यांना फार मोठे अंतर पार करुन येणे-जाणे करावे लागत आहे. हा पूल झाल्यानंतर धरणाचे पाणी ओलांडून दुसऱ्या काठावर जाणे-येणे सोपे होणार आहे. कर्नाटकातील कृष्णा नदीवर फार मोठे धरण आहे. त्या धरणाच्या पाण्यात महादेव मंदीर बुडाले आहे. त्या मंदिराभोवती मोठ्या विहिरीसारखे बांधकाम केले आहे. विहिरीत महादेवाची पिंड सुरक्षित केली आहे. विहिरीचा माथा धरणाच्या पाण्याच्या वर असून, पाणी विहिरीत जाणार याची काळजी घेतली आहे. विहिरीत उतरण्यासाठी दोन बाजुंनी पायऱ्या केल्या आहे. त्यामुळे पिंडीच्या दर्शनासाठी भाविकांची गर्दी असेल त्या वेळी भाविक विहिरीत चढण्या-उतरण्यासाठी स्वतंत्र रांग लावतात. पिंडीजवळ एक स्वामी बसलेले असतात. ते भाविकांना प्रसाद म्हणून रुद्राक्ष देतात. मुख्य रस्त्यापासून विहिरीपर्यंत जाण्यासाठी भराव टाकून वाट (रस्ता) केली आहे.

अशी सोय डोमगावच्या पुनर्वसित गावठाणापासून कल्याण स्वामींच्या मठापर्यंत जाण्यासाठी पुल बांधणे आवश्यक आहे. समाधीच्या दर्शनासाठी जाणाऱ्या भाविकांची सोय होईल. मंदिराशी सतत संपर्क ठेवला जाईल. मठपतींनाही सहज गावात ये-जा करता येईल. व त्यांना एकटेपणा जाणवणार नाही. परंडा, बार्शी पासून भाविक दर्शनासाठी येतील. त्यांची वर्दळ वाढेल व मठाचे उत्तपन्न वाढेल. सोनारी कडून मठापर्यंत रस्ता केला आहे. परंतु तो पुर्नवसित गावकऱ्यासाठी फार गैरसोयीचा आहे.

पुलाचे आरेखन व अंदाजपत्रक महाराष्ट्र शासनाच्या बांधकाम खात्याकडून करुन घेऊन पुलाच्या बांधकामासाठी पुरेसा निधी महाराष्ट्र शासनाने देऊन पुलाचे बांधकाम करुन घ्यावे, अशी गावकऱ्यांची व परिसरातील जनतेची इच्छा आहे. सुदैवाने विद्यमान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तथा देवा भाऊ देव भक्त आहेत. ते सदर पुलाच्या कामात लक्ष घालून काम लवकरात लवकर करुन देतील, अशी खात्री आहे. सदर मठामध्ये रामनवमी, दास नवमी, कल्याण स्वामी पुण्यतिथी असे अनेक उत्सव होत असतात. रामनवमीला मोठी यात्रा भरते. देवदर्शनास येणाऱ्या भाविकांना महाप्रसाद दिला जातो. हा पुल झाल्यास यात्रेकरूंचीही फार मोठी सोय होईल. मुख्यमंत्री पुलाचे काम लवकरात लवकर करुन देतील अशी खात्री आहे.

**- समाधान वाघमारे**

## महत्वाचे...






### सोहम माळवदकर याची निवड

**सोलापूर, दि.३ जुलै-**

येथील सोहम सुनील माळवदकर याची दिल्ली येथील Indian Institute of Technology च्या एम.टेक कॉम्प्युटर सायन्स ॲन्ड इंजिनिअरिंग शाखेत प्रवेशासाठी निवड झाली आहे. सातत्यपूर्ण अभ्यास, मेहनत आणि जिद्दीच्या जोरावर त्याने हे यश मिळवले आहे. उच्च दर्जाचे तांत्रिक शिक्षण घेऊन संशोधन व आधुनिक तंत्रज्ञान क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करण्याचा मानस आहे, असे सोहम माळवदकर याने सांगितले.

### प्रेमप्रकरणातून तरुणीस लाकडाने, लाथाबुक्क्याने मारहाण

**सोलापूर, दि.३ जुलै-**

प्रेम प्रकरणातून एका तरुणीला लाकडाने व लाथा बुक्क्याने मारहाण करण्यात आल्याची घटना मोहोळ तालुक्यातील कामती खुर्द येथे घडली. रविकांत संपत दुधाळ, रोहिणी रविकांत दुधाळ इतर चार जणांनी मिळून मारहाण केली. यात तिच्या डोळ्याजवळ जखम व सर्व अंगाला मुकामार लागल्याने कामती येथील आरोग्य केंद्रात प्राथमिक उपचार करुन सोलीपुरातील शासकीय रुग्णालयात पुढील उपचारासाठी दाखल करण्यात आले.

### कुत्रा आडवा आल्याने दुचाकी स्लिप, तिघे तरुण जखमी

**सोलापूर, दि.३ जुलै-**

कुत्रा आडवा आल्याने दुचाकी घसरुन झालेल्या अपघातात दुचाकीवरील तिघे तरुण जखमी झाल्याची घटना दोड्डी गावाजवळ घडली. पिंटू यादव (वय-२६), दत्तात्रय रत्नाकर गुड्डे (वय-२३), आकाश तुळजाराम गुड्डे (वय-२१, तिघेही रा.नंदगाव, ता.तुळजापूर) असे जखमी तरुणांची नावे आहेत. ते तिघे



नंदगावकडून सोलापूरकडे दुचाकीवरून ट्रिपल सीट बसून येत असताना वाटेत दोड्डी गावाजवळ दुचाकी समोर कुत्रा आडवा आल्याने दुचाकी स्लीप झाली. ते सर्वजण उपचारासाठी येथील शासकीय रुग्णालयात स्वतः दाखल झाले.

### रिक्षाचालकाला जीवे मारण्याची धमकी; ४ अज्ञाताविरुध्द गुन्हा दाखल

**सोलापूर, दि. ३ जुलै-**

रिक्षा थांबवल्याच्या कारणावरून महादेव चौकात एका रिक्षाचालकावर आणि त्यांच्या काकांवर चौघांनी लाथाबुक्क्यांनी मारहाण केल्याची घटना घडली. याप्रकरणी सदर बझार पोलिस ठाण्यात अज्ञात चार जणांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला.




यातील फिर्यादी तनवीर मिस्कीन पटेल (रा.महादेव चौक, शास्त्री नगर, सोलापूर) हे दि.१ जुलै २०२६ रोजी आपली रिक्षा घेऊन महादेव चौकात थांबले होते. यावेळी एम.एच.१३ एफ.डी.३३१९ या क्रमांकाचा टेम्पोमधून चारजण येऊन फिर्यादी आणि त्यांच्या काकांना बेदम मारहाण केली. आरोपींपैकी एकाने आपल्या हातातील कड्याने फिर्यादीच्या डाव्या कानावर मारले, ज्यामुळे ते जखमी झाले. आरोपींनी शिवीगाळ करत फिर्यादीला जीवे मारण्याची धमकी दिल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.

# सोलापुरातील एलिव्हेटेड कॉरीडॉरमुळे औद्योगिक विकासाला मिळणार चालना

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ जुलै-**

राज्यातील महत्त्वाच्या पायाभूत सुविधा प्रकल्पांना गती देण्याच्या राज्य शासनाच्या धोरणामुळे सोलापूर शहराच्या वाहतूक व्यवस्थेत आमुलाग्र बदल घडणार आहे. १,०२०.५० कोटी रुपयांच्या चार पदरी एलिव्हेटेड कॉरिडॉर या महत्त्वाकांक्षी प्रकल्पामुळे सोलापूर शहरातील वाहतूक कोंडी मोठ्या प्रमाणात कमी होऊन सोलापूर शहराच्या आर्थिक आणि औद्योगिक विकासाला चालना मिळणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.सोलापूर शहरातील राष्ट्रीय



महामार्ग प्राधिकरणाच्या प्रस्तावित दोन उड्डाणपुलांसंदर्भात मुंबई येथे आयोजित बैठकीत ते बोलत होते. जुना पुणे नाका ते बोरामणी नाका या राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६५ वरील सुमारे ९.६६० कि.मी. लांबीचा राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणामार्फत राबविण्यात येणारा हा प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर सोलापूर शहराभोवती प्रभावी वाहतूक वर्तुळ तयार होईल. सहा प्रवेश आणि निर्गमन मार्गांमुळे राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६५, ५२, १६६ आणि १५० यांच्यात अखंड संपर्क प्रस्थापित होईल. त्यामुळे शहरातील वाहतूक सुरळीत होण्याबरोबरच प्रादेशिक संपर्कक्षमता वाढून सोलापूरचे धोरणात्मक वाहतूक केंद्र म्हणून महत्त्व अधिक बळकट होणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

### उर्वरित १०.५१ हेक्टर जमिनीचे भूसंपादन वेगात

सध्या प्रकल्पासाठी आवश्यक ३२.०२ हेक्टरपैकी २१.५१ हेक्टर जमीन उपलब्ध झाली असून उर्वरित १०.५१ हेक्टर जमीन उपलब्ध करून देण्यासाठी प्रक्रिया वेगाने सुरू आहे. सरकारी विभागांच्या ना-हरकत प्रमाणपत्रांची पूर्तता, खासगी जमिनींचे संपादन, तसेच आवश्यक वनपरवानग्या आणि इतर प्रशासकीय मंजुरी प्राधान्याने पूर्ण करण्यासाठी संबंधित यंत्रणा कार्यरत असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

## शेतकऱ्यांसाठी कर्जमुक्ती, प्रोत्साहनाचा नवा आराखडा तयार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ जुलै-**

नैसर्गिक आपत्तींमुळे कर्जबाजारी झालेल्या शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी व वित्तीय शिस्त रुजवण्यासाठी सन २०२६-२७ च्या अर्थसंकल्पात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना, २०२६ जाहीर करण्यात आली. योजनेचा उद्देश थकबाकीदारांना कर्जमुक्त करणे व नियमित परतफेड करणाऱ्यांना प्रोत्साहन देणे हा आहे. या योजनेतून राज्यातील ५६ लाखापेक्षा अधिक शेतकऱ्यांना ३६ हजार ५८५ कोटी कोटीची कर्जमुक्ती मिळणार आहे. यामुळे या शेतकऱ्यांसाठी कर्जमुक्ती व प्रोत्साहनाचा नवा आराखडा तयार करण्यात आला आहे.

यासाठी १ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२५ दरम्यान घेतलेल्या अल्पमुदत पीक कर्जासाठी, ३० सप्टेंबर २०२५ रोजी थकीत व ३१ मार्च २०२६ अखेर परतफेड न झालेल्या कर्जावर प्रति शेतकरी २ लाखांपर्यंत कर्जमुक्ती मिळेल. महात्मा फुले योजनेच्या लाभार्थींना ५० हजारांपर्यंत लाभ मिळणार. २ लाखांपेक्षा जास्त थकबाकी असल्यास अतिरिक्त रक्कम भरल्यानंतर २ लाखांचा लाभ मिळेल. NP खात्यांसाठी बँकांशी वाटाघाटी करून




सुट निश्चित होईल. नियमित परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांनी २०२२-२३, २०२३-२४, २०२४-२५ पैकी कोणत्याही दोन वर्षांत वेळेत परतफेड केल्यास ५० हजारांपर्यंत लाभ मिळेल. कर्ज रक्कम कमी असल्यास परतफेड केलेली रक्कम किंवा किमान ५ हजार, यापैकी जास्त रक्कम लाभ म्हणून मिळेल. ही योजना पूर्णपणे ऑनलाईन राबवली जाणार असून आधार प्रमाणीकरण व ॲग्रीस्टॅक नोंदणी अनिवार्य आहे. मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली उपसमिती गठीत करून अंमलबजावणीवर नियंत्रण ठेवले जाईल. ही योजना थकबाकीदारांना थेट दिलासा, नियमित परतफेड करणाऱ्यांना प्रोत्साहन व बँकिंग यंत्रणेला बळ देईल. पारदर्शक अंमलबजावणी झाल्यास शेतकऱ्यांचा आत्मविश्वास वाढून ग्रामीण अर्थव्यवस्था स्थिर होण्यास मदत होईल.

## बँकेने सील केलेली मालमत्ता बेकायदेशीरपणे घेतली ताब्यात; प्लॉटधारकाविरुध्द गुन्हा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ जुलै-**

घेतलेले कर्ज फेडले नसल्यामुळे बँकेने कायदेशीर प्रक्रिया करून सील केलेली मालमत्ता, सील तोडून बेकायदेशीररीत्या ताब्यात घेतल्याप्रकरणी विजापूर नाका पोलीस ठाण्यात एका प्लॉट धारकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जैनोद्दीन इस्माईल नदाफ (रा. मदिना नगर, मिल्लत नगर, सोलापूर) असे गुन्हा दाखल करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. बँकेचे मॅनेजर मलयगिरी चंद्रशागिरी गोस्वामी यांनी फिर्याद दिली.




मजरेवाडी येथील मिल्लत नगरमधील जुना सर्व्हे क्रमांक ३२६/१ (नवीन सर्व्हे क्रमांक ११८/१) मधील प्लॉट क्रमांक २८ (क्षेत्र १३९ चौमी) या मालमत्तेचे बँकेचे कर्ज थकले होते. यामुळे बँक ऑफ बडोदाच्या वतीने कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करत, प्रत्यक्ष पंचनामा करून सदर मालमत्ता सील करण्यात आली होती आणि तिचा ताबा बँकेने घेतला होता. मात्र, २० मे २०२६ रोजी आरोपी जैनोद्दीन इस्माईल नदाफ याने बँकेचे सील तोडले. त्यानंतर त्याने कोणतीही परवानगी नसताना संबंधित मालमत्तेवर अतिक्रमण करून अनधिकृतपणे ताबा मिळवला आणि मालमत्तेच्या आत प्रवेश केल्याचे आढळून आल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.

### विवाहितेचा गळा दाबून मारण्याचा प्रयत्न; पतीसह चौघांवर गुन्हा दाखल

**सोलापूर :** माहेरहून ८ लाख रुपये आणण्यासाठी एका विवाहितेचा शारीरिक व मानसिक छळ केल्याप्रकरणी पतीसह सासरच्या चौघांविरुध्द एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. पती गणेश शिंदे, सासरे मधुकर शिंदे, सासू जगदेवी शिंदे, दीर सागर शिंदे (सर्वजण रा.संगमेश्वर नगर, सोलापूर) अशी गुन्हा दाखल करण्यात आलेल्यांची नावे आहेत.

याबाबत गायत्री गणेश शिंदे (रा. उत्तर कसबा, बाळीवेस, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, दि.१ ऑगस्ट २०२४ ते १५ एप्रिल २०२६ दरम्यान सासरी नांदत असताना आरोपींनी लग्नात मानपान केला नाही, घर घेण्याकरिता माहेरहून ८ लाख रुपये आणले नाहीत, असे म्हणत वारंवार मारहाण व शिवीगाळ केली. तसेच गळा दाबून तिला जीवे मारण्याचा प्रयत्न केला. पोनि ओव्हळ हे पुढील तपास करीत आहेत.



## वंचित बहुजन युवा आघाडीतर्फे सोलापुरात सभासद नोंदणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ जुलै-**

वंचित बहुजन युवा आघाडी, सोलापूर शहराच्या वतीने सभासद नोंदणी अभियानाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून व प्रतिमापूजनाने करण्यात आली. यावेळी शहर महासचिव अनिरुद्ध वाघमारे, संजय हरिजन व मल्लिकार्जुन हिरेमठ यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. या प्रसंगी युवा शहर अध्यक्ष महेश जाधव, महासचिव नरेंद्र शिंदे, चंद्रकांत सुरवसे, रोहित लालसरे, गौतम थापटे, रितेश दुपारगुडे, सौरभ चवरे, शुभम कसबे, विनोद जाधव, अमित बनसोडे, सचिन गायकवाड, अमित मस्के, सिद्धू शिवशरण यांच्यासह मोठ्या संख्येने पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

वंचित बहुजन युवा आघाडीच्या माध्यमातून तरुणांना संघटित करून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांवर आधारित समाजनिर्मितीसाठी हे सभासद नोंदणी अभियान राबविण्यात येत असल्याचे पदाधिकाऱ्यांनी सांगितले.

## एका फोनवर धावून आली माणुसकी

### शिखर पहारिया यांनी भरले रुग्णालयाचे संपूर्ण बिल

**तभा वृत्तसेवा,**
**पुणे, दि. ३ जुलै-**

आर्थिक अडचणीत सापडलेल्या बाराते कुटुंबाला मोठा दिलासा देत आरोग्यदूत म्हणून परिचित असलेल्या शिखर पहारिया यांनी दीनानाथ मंगेशकर रुग्णालयातील उपचाराचे संपूर्ण बिल भरून माणुसकीचा आदर्श घालून दिला. त्यांच्या या मदतीमुळे रुग्णाच्या उपचारात कोणताही अडथळा आला नाही.



आकाश वशिष्ठ बाराते यांचे वडील वशिष्ठ शिवाजी बाराते यांच्यावर दोन-तीन महिन्यांपूर्वी हृदयाची बायपास शस्त्रक्रिया झाली होती. प्रकृती सुधारत असतानाच त्यांना पुन्हा श्वास घेण्यास त्रास सुरू झाल्याने दीनानाथ मंगेशकर रुग्णालयात दाखल करण्यात आले. तपासणीत उच्च रक्तातील साखरेमुळे हृदयाभोवती पाणी साचल्याचे तसेच त्याचा परिणाम यकृतावर झाल्याचे निदान झाले. त्यामुळे तातडीने उपचार सुरू करण्यात आले. या मदतीबद्दल श्रीतेश कोठवाले आणि आकाश वशिष्ठ बाराते यांनी शिखर पहारिया यांचे आभार मानले. संकटाच्या काळात केवळ सहानुभूती नव्हे, तर प्रत्यक्ष कृतीतून मदत करणारे शिखर पहारिया आमच्यासाठी देवदूत ठरले, अशी भावना त्यांनी व्यक्त केली.

# संघर्षाच्या अग्नीतून तावून-सुलाखून निघालेलं नेतृत्व लोकनेते अनंत (नेता) जाधव

***वादळं आली म्हणून पर्वत कधी ढासळत नाहीत,***
***आव्हानं आली म्हणून ध्येयवेडी माणसं थांबत नाहीत.***
***ज्यांच्या मनात समाजसेवेचा दीप प्रज्ज्वलित असतो,***
***त्यांच्या वाटेतील अंधारही त्यांना रोखू शकत नाही***

राजकारण हा केवळ सत्तेचा खेळ नसतो; तो जनतेच्या विश्वासाचा, संघर्षाचा आणि सेवाभावाचा प्रवास असतो. अनेकांना घराण्याचा वारसा लाभतो, तर काही जण स्वतःच्या कर्तृत्वावर इतिहास घडवतात. अशाच कर्तृत्ववान नेतृत्वाचं नाव म्हणजे नगरसेवक अनंत (नेता) जाधव. कोणताही राजकीय वारसा नसताना, केवळ वयाच्या विसाव्या वर्षी त्यांनी समाजकारण आणि राजकारणात पाऊल ठेवलं. माजी खासदार स्व.लिंगराज वल्याळ यांच्या नेतृत्वाखाली भारतीय जनता पक्षाचे कार्य करताना त्यांनी राजकारणातील संस्कार, जनसेवा आणि संघटनात्मक बांधिलकी शिकली. मराठा वस्ती आणि समाजातील दुर्लक्षित घटकांना न्याय मिळावा, त्यांचे प्रश्न शासनदरबारी पोहोचावेत; या ध्येयाने त्यांनी आपले संपूर्ण तारुण्य झोकून दिले. वार्ड अध्यक्ष म्हणून सुरुवात करून पक्ष संघटना मजबूत करण्यासाठी अनेक जबाबदाऱ्या त्यांनी यशस्वीपणे पार पाडल्या.

'थेंबे थेंबे तळे साचे, कष्टाने यशाचे महाल उभे राहतात'. या तत्त्वावर त्यांनी कार्यकर्त्यांची फळी उभी केली. प्रत्येक कार्यकर्त्याच्या सुख-दुःखात सहभागी होऊन त्यांनी केवळ राजकारण केलं नाही, तर माणसं जोडली, विश्वास जपला आणि नात्यांची श्रीमंती कमावली. जनतेने त्यांच्या निष्ठावान कार्याची दखल घेत त्यांना प्रथमच नगरसेवक म्हणून निवडून दिलं. नगरसेवक झाल्यानंतर त्यांनी विकासकामांचा वेग वाढवला. रस्ते, पाणी, मूलभूत सुविधा आणि सामान्य माणसाच्या अडचणी सोडविण्यासाठी त्यांनी दिवस-रात्र एक केली. मात्र, प्रत्येक सूर्याला ग्रहण लागतेच. त्यांच्या राजकीय प्रवासातही संकटाचे ढग दाटून आले. काही विरोधकांनी त्यांना कथित खोट्या प्रकरणात अडकवून त्यांचं राजकीय अस्तित्व संपवण्याचा प्रयत्न केल्याची भावना त्यांच्या समर्थकांमध्ये होती. त्या काळात अनेक कार्यकर्त्यांच्या मनात भीती आणि अस्वस्थता निर्माण झाली.



एका प्रकरणात न्यायालयीन प्रक्रियेनंतर त्यांची निर्दोष सुटका झाली आणि नव्या जोमाने त्यांनी जनतेची सेवा करण्याचा संकल्प अधिक दृढ केला. त्या काळात संसाराची घडी, कार्यकर्त्यांच्या अपेक्षा आणि सामाजिक जबाबदाऱ्या यांचा विचार त्यांच्या मनाला सतावत राहिला. पण खरा नेता तोच असतो, जो स्वतःच्या वेदना बाजूला ठेवून आपल्या माणसांच्या अश्रूंना पुसतो. त्यांनी एक नवा संकल्प केला; आता उर्वरित आयुष्य हे माझ्यावर विश्वास ठेवणाऱ्या प्रत्येक माणसासाठी, प्रत्येक कार्यकर्त्यासाठी आणि समाजासाठी समर्पित असेल. ही भावना केवळ शब्दांत नाही, तर त्यांच्या कृतीतून दिसून येते. त्यांनी पुन्हा नव्या उमेदीने कामाला सुरुवात केली. जुन्या जखमा विसरून, नव्या स्वप्नांसह जनतेच्या सेवेसाठी स्वतःला झोकून दिलं. सन २०२५ च्या निवडणुकीत जनतेने त्यांच्यावर पुन्हा एकदा विश्वास व्यक्त केला आणि प्रचंड मताधिक्याने त्यांना विजयी केलं. हा विजय एका व्यक्तीचा नव्हता, तर संघर्ष, संयम, विश्वास आणि जनसेवेच्या मूल्यांचा विजय होता.

आजही अनंत (नेता) जाधव आपल्या प्रत्येक कार्यकर्त्याला कुटुंबातील सदस्य मानतात. प्रत्येक घर माझं आहे, प्रत्येक कुटुंबाची जबाबदारी माझी आहे, या भावनेतून ते कार्य करतात. त्यांच्या नेतृत्वाखाली अनेक युवकांना नवी दिशा, नवा आत्मविश्वास आणि समाजसेवेची प्रेरणा मिळत आहे. संकटात धावून जाणारा, गरजवंताच्या पाठीशी उभा राहणारा आणि कार्यकर्त्यांच्या सुख-दुःखात सहभागी होणारा नेता म्हणून त्यांची ओळख निर्माण झाली आहे. साधेपणा, विनम्रता आणि कार्यकर्त्यांप्रती असलेली आत्मीयता कधीही सोडली नाही. आज त्यांचा वाढदिवस. यानिमित्त एक चारोळी खालीलप्रमाणे;

***संघर्षाच्या वाटेवरती ज्याने धैर्याची ज्योत पेटविली,***
***विश्वासाच्या नात्यांना ज्याने माणुसकीची ऊब दिली।***
***जनसेवेलाच जीवन मानून जो अविरत पुढे चालला,***
***अशा लोकनेत्याला उदंड आयुष्य लाभो, हीच***
***ईश्वरचरणी प्रार्थना।।***

**-सचिन बापू साळुंके**

## १७ पोलिस निरीक्षकांच्या करण्यात आल्या अंतर्गत बदल्या

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ जुलै-**

सोलापूर शहर पोलिस दलात प्रशासकीय फेरफार करण्यात आली असून, पोलीस आयुक्त एम. राजकुमार यांनी शहरातील १७ पोलीस निरीक्षकांच्या अंतर्गत बदल्यांचे आदेश जारी केले आहेत. यात विजापूर नाका, सदर बझार, जेलरोड, एमआयडीसी आणि सलगर वस्ती यांसह विविध विभागांतील अधिकाऱ्यांचा समावेश आहे.

सुहास चव्हाण आणि विकास देशमुख या दोन निरीक्षकांच्या विनंतीनुसार त्यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत. विजापूर नाका पोलिस ठाणे येथील वरिष्ठ पोलीस निरीक्षक दादा सोमनाथ गायकवाड यांची आर्थिक गुन्हे शाखेत बदली करण्यात आली असून, त्यांच्या जागी नियंत्रण कक्षातून सुहास भाऊराव चव्हाण यांची नियुक्ती करण्यात आली.

सदर बझार येथील भालचंद्र सुभाष ढवळे यांची सायबर सेलमध्ये बदली झाली असून, आर्थिक गुन्हे शाखेचे अजित शंकर लकडे आता सदर बझार पोलीस ठाण्याची धुरा सांभाळतील. जेलरोडचे भाऊराव श्रीधर बिराजदार यांची एमआयडीसी पोलीस ठाण्यात बदली करण्यात आली. जेलरोड पोलीस ठाण्याचा प्रभार आता उदयनसिंह शामराव पाटील आणि नियंत्रण कक्षातील जयदीप हनुमंत कळेकर यांच्याकडे सोपवण्यात आला आहे.

सलगर वस्ती येथील उमाकांत आनंद शिंदे यांची विशेष शाखेत बदली झाली असून, सायबर सेलचे श्रीशैल सिदरामप्पा गजा हे आता सलगर वस्ती पोलीस ठाण्याचे नवीन प्रमुख असतील. विकास दगडोबा देशमुख यांची फौजदार चावडी पोलीस ठाण्यात (गुन्हे) नियुक्ती करण्यात आली आहे.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी**. ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे**.● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi** - Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

CMYK

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT



**महत्वाचे...**




## मोबाईल दिला नाही म्हणून गोचीड मारण्याचे औषध पिले

**सोलापूर, दि.३ जुलै-**

घरच्यांनी गेम खेळायला मोबाईल दिला नाही म्हणून एका १५ वर्षाच्या मुलाने गोचीड मारण्याचे औषध पिल्याची घटना मोहोळ तालुक्यातील मलिकपेठ येथे घडली. कार्तिक प्रवीण जगताप असे त्या मुलाचे नाव आहे. घरच्यांनी गेम खेळण्यास मोबाईल दिला नाही म्हणून गुरुवारी त्याने गोचीड मारण्याचे औषधे पिले. त्याचे वडील प्रवीण जगताप यांनी मोहोळच्या आरोग्य केंद्रात प्राथमिक उपचार करुन पुढील उपचारासाठी सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल केले.

## मुलाला घेऊन जाण्याच्या कारणावरुन महिलेस मारहाण

**सोलापूर, दि.३ जुलै-**

मुलाला घेऊन जाण्याच्या कारणावरुन एका महिलेला लाथाबुक्क्याने मारहाण करण्यात आल्याची घटना मोहोळ तालुक्यातील परमेश्वर पिंपरी येथे घडली. रोहिणी रविकांत दुधाळ (वय-३५, रा.परमेश्वर पिंपरी, ता.मोहोळ) असे त्या महिलेचे नाव आहे. गुरुवारी दुपारी राहत्या घरासमोर मुलाला घेऊन जाण्याच्या कारणावरुन त्यांना स्वप्नाली धनाजी बनकर यांनी मारहाण केली. पती रविकांत दुधाळ यांनी येथील आरोग्य केंद्रात प्राथमिक उपचार करुन पुढील उपचारासाठी सोलापूर येथील शासकीय रुग्णालयात दाखल केले.

## शेतीच्या वादातून मारहाण, आई व मुलगा जखमी

**सोलापूर, दि.३ जुलै-**

शेतीच्या वादातून लोखंडी रॉड, कोयता व लाथाबुक्याने मारहाण करुन आई व मुलाला जखमी करण्यात आल्याची घटना मोहोळ तालुक्यातील देगाव वाळूज येथे घडली. पार्वती आप्पासाहेब शिंदे (वय-४५), ओंकार आप्पासाहेब शिंदे (वय-२५, दोघेही रा.देगाव वाळूज) असे त्यांचे नाव आहे. गुरुवारी सायंकाळी ते दोघे स्वतःच्या शेतात असताना शेतीच्या वादातून विजयकुमार दिगंबर पोद्दार, रत्नमाला पोद्दार इतर दोन जणांनी मिळून मारहाण केली. मोहोळ येथील आरोग्य केंद्रात प्राथमिक उपचार करुन सोलापुरातील शासकीय रुग्णालयात पुढील उपचारासाठी दाखल करण्यात आले.

## चुलत पुतण्याला उठविल्याच्या कारणावरुन महिलेला मारहाण

**सोलापूर, दि. ३ जुलै-**

दारु पिऊन झोपलेल्या चुलत पुतण्याला उठविल्याच्या कारणावरुन एका महिलेस काही जणांनी मिळून काचेची बाटली व चाकुने मारुन जखमी केल्याची घटना दक्षिण सोलापूर तालुक्यातील हणमगाव येथे घडली. लैलाबाई संजीव पवार (वय-४०)असे जखमी महिलेचे नाव आहे. गुरुवारी सायंकाळी त्यांच्या राहत्या घरासमोर चुलत पुतण्या दारु पिऊन झोपला होता. त्याला उठविण्यास गेल्या असता राहुल शंकर पवार, शंकर पवार व इतर चार जणांनी मिळून मारहाण केली. त्यांना उपचाराकरिता पती संजीव पवार यांनी सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल केले.

# उड्डाणपूल, पाणीपुरवठा, आयटी पार्क, विमानसेवेचा विषय लागला मार्गी

### मनपाच्या रोजंदारी आणि वाहन चालकांचा प्रश्नही सुटणार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ जुलै-**

विधिमंडळ अधिवेशनादरम्यान आयोजित एका बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोलापुरातील विविध विषयांबाबत आढावा घेतला. सोलापूर शहरातील दोन उड्डाणपूल, पाणीपुरवठा, आयटी पार्क, विमानसेवेचा विषय त्यांनी मार्गी लावला आहे. मनपाच्या रोजंदारी आणि वाहन चालकांचा प्रश्नही लवकरच सुटणार आहे, अशी माहिती पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी दिली.



दोन उड्डाणपूल बांधण्यासाठी आवश्यक असलेल्या पोस्ट आणि रेल्वे खात्याच्या तसेच राज्य शासनाच्या जागा १५ दिवसात ताब्यात घेऊन ऑगस्टपूर्वी वर्क ऑर्डर देणे. पाणीपुरवठ्यासाठी मंजूर झालेल्या १ हजार ४०० कोटींच्या पाणीपुरवठा योजनेच्या कामाची निविदा दि. १५ सप्टेंबरपर्यंत प्रकाशित करुन दि.३० नोव्हेंबरच्या आत वर्क ऑर्डर काढण्यात यावे, अशा सूचनाही मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिल्या.



दि.१५ ऑगस्टपर्यत ई-बसेस् उपलब्ध करुन देणे आणि बोरामणी येथील विमानतळबाबतही माहिती घेतली. उड्डाणपुलासंदर्भात शासनाच्या जमिनी मोफत देण्यासाठी मंत्रिमंडळाकडे प्रस्ताव पाठवावे. विमानसेवा पूर्ववत करण्यासंदर्भात संबंधित कंपनीला नोटीस द्यावी, अशा सूचनाही मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिल्याचे पालकमंत्री गोरे यांनी सांगितले.

### बैठकीस यांची होती उपस्थिती

मुंबई येथे झालेल्या बैठकीस सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले, आमदार देवेंद्र कोठे, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आर्थिक सल्लागार प्रवीणसिंह परदेशी, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर, गृह विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिव मनिषा म्हैसकर, विमान प्राधिकरणाचे दीपक कपूर, वरिष्ठ अधिकारी श्रीकर परदेशी, नगर विकास विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव डॉ. के.एच. गोविंदराज आदी उपस्थित होते.

### आमदार देवेंद्र कोठे यांच्याकडून सातत्याने प्रयत्न



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतलेली बैठक आणि निर्णय म्हणजे सोलापूर शहराच्या विकासाच्या प्रवासातील मैलाचा दगड ठरणारे आहेत. उड्डाणपूल, पाणीपुरवठा, विमानसेवा, आयटी पार्क अशा अनेक विषयात आमदार देवेंद्र कोठे यांनी केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश आले आहे. त्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आभार आणि आमदार देवेंद्र कोठे यांचे अभिनंदन, असेही पालकमंत्री जयकुमार गोरे म्हणाले.





**रस्ता रुंदीकरण; वाहतूक कोंडी**

सोलापूर : शहरातील होटगी रोडवर रस्ता रुंदीकरणाचे काम युध्दपातळीवर सुरु आहे. त्यामुळे पर्यायी मार्ग देण्यात आला असून या भागात मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत आहे. शुक्रवारी टिपलेले छायाचित्र.

## वनपाझर तलावाची गळती न थांबवल्यास बेमुदत आंदोलन

### भोसरे ग्रामस्थांचा इशारा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३ जुलै-**

माढा तालुक्यातील भोसरे येथील बळीराजा वनपाझर तलावाच्या बांधाला गेल्या १५ वर्षांपासून लागलेली गळती तातडीने दुरुस्त न केल्यास ९ जुलैपासून बेमुदत अन्नत्याग आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा बळीराजा वनपाझर तलाव समन्वय समितीचे प्रमुख हर्षल बागल यांनी पत्रकार परिषदेत दिला.

वनविभागाच्या हद्दीतील या तलावाची गळती रोखण्यासाठी जलसंधारण विभागाकडून तांत्रिक मंजुरी घेऊन प्रस्ताव सादर करणे आवश्यक असताना वनविभागाकडून अनेक वर्षे विलंब होत असल्याचा आरोप त्यांनी केला. याबाबत वारंवार निवेदने देऊनही कोणतीही ठोस कारवाई झालेली नसल्याने ग्रामस्थांनी आंदोलनाचा निर्णय घेतला आहे.

१९७२ च्या दुष्काळात रोजगार हमी योजनेतून उभारण्यात आलेल्या या तलावाची ५३ वर्षांनंतरही दुरुस्ती न झाल्याने मोठ्या प्रमाणात पाण्याची गळती होत आहे. त्यामुळे वर्षातील बहुतांश काळ तलाव कोरडा राहत असून वन्यजीव, जनावरे तसेच परिसरातील शेतकऱ्यांना त्याचा लाभ मिळत नाही.

तलावाची दुरुस्ती झाल्यास ३०० ते ४०० हेक्टर क्षेत्र ओलिताखाली येण्याबरोबरच भूजल पातळीही वाढण्यास मदत होईल, असा दावा त्यांनी केला. यावेळी संदीपान बागल, अशोक बागल, विजयकुमार बागल आणि सिध्देश्वर बागल उपस्थित होते.

## महापालिका कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांबाबत अधिकाऱ्यांची बैठक घ्यावी : चंदनशिवे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३ जुलै-**

सोलापूर महानगरपालिकेतील विविध विभागांतील कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित प्रश्नांबाबत विधानसभेत अधिकाऱ्यांची बैठक घ्यावी, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश उपाध्यक्ष आनंद चंदनशिवे यांनी विधानसभेचे उपाध्यक्ष अण्णासाहेब बनसोडे यांच्याकडे एका निवेदनाद्वारे केली आहे.



सफाई कामगारांच्या शैक्षणिक पात्रतेनुसार सरळसेवा भरतीऐवजी लाड-पागे समितीच्या माध्यमातून नियुक्त्या द्याव्यात. बुधवार पेठ येथील विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सफाई कामगार वसाहत आणि सात रस्ता परिसरातील धोकादायक झालेल्या निवासस्थानांच्या जागी डॉ.बाबासाहेब आंबेडकर श्रमसाफल्य योजनेअंतर्गत नवीन घरे उभारण्यात यावीत. प्रशासन काळात मोठ्या पदांवर झालेल्या नियुक्त्यांचा अहवाल जाहीर करावा, सफाई कामगारांच्या दैनंदिन कामकाजाची नियमावली उपलब्ध करून द्यावी, महानगरपालिकेच्या विविध विभागांत कंत्राटी पद्धतीने कार्यरत कर्मचाऱ्यांची व संबंधित मक्तेदारांची संपूर्ण माहिती जाहिर करावी, असेही या निवेदनात म्हटले आहे.

## गोशाळांसाठी चारा उत्पादनसंदर्भात लोकचळवळ उभारण्याची गरज : शहा



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३ जुलै-**

सोलापूर जिल्ह्यातील गोशाळांमध्ये वाढती चाऱ्याची टंचाई, चाऱ्याचे वाढते दर आणि वाहतुकीचा वाढता खर्च लक्षात घेता प्रत्येक तालुक्यात स्थानिक पातळीवर हिरव्या चाऱ्याचे उत्पादन करणारे प्रकल्पांद्वारे लोकचळवळ उभारण्याची गरज आहे, असे प्राणीमित्र विलास शहा यांनी पत्रपरिषदेत सांगितले.

बार्शी येथील मानद पशुकल्याण अधिकारी धन्यकुमार पटवा यांनी लीजवर घेतलेल्या शेतजमिनीत हिरवा चारा पिकवून त्याची कुट्टी करून तब्बल ३२ टन चारा कटेव्वादेवी, श्रीकृष्ण, गोकुळेश, अहिंसा, संतोषी माता, गोधन विकास आदी गोशाळांना मोफत स्वरुपात दिला.

गोसेवेबाबत केवळ चर्चा न करता प्रत्यक्ष कृतीतून समाजासमोर आदर्श उभा करणारे धन्यकुमार पटवा गेली २५ ते ३० वर्षे गोरक्षण, प्राणी संरक्षण आणि पशुकल्याण क्षेत्रात कार्यरत असल्याचे सांगून त्यांच्या कार्यातून प्रेरणा घ्यावी.

सुपीक जमीन, सिंचन सुविधा, उद्योगपती, सेवाभावी संस्था, दानशूर नागरिक यांच्या सहकार्याने प्रत्येक तालुक्यात चारा उत्पादन केंद्र उभारल्यास वाहतूक खर्च कमी होऊन गोशाळांना वर्षभर चारा उपलब्ध होऊ शकतो, असे त्यांनी सांगितले. यावेळी महेश भंडारी, केतन शहा, धन्यकुमार पटवा उपस्थित होते.

## धनगर समाजातील विद्यार्थ्यांचा २ ऑगस्ट रोजी सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३ जुलै-**

कमांडो परिवार संचलित यशवंत शैक्षणिक समितीच्या वतीने मार्च २०२६ च्या दहावी व बारावी बोर्ड परीक्षेत ७५ टक्के व त्यापेक्षा अधिक गुण मिळविणाऱ्या धनगर समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार रविवार, २ ऑगस्ट रोजी सकाळी १०.३० वाजता हिराचंद नेमचंद वाचनालय येथे करण्यात येणार असल्याची माहिती समितीचे अध्यक्ष प्रा.उत्तमराव हुंडेकर यांनी पत्रकार परिषदेत दिली.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.प्रकाश महानवर, मनोरमा परिवाराचे प्रमुख श्रीकांत मोरे यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. यावेळी राज्यात द्वितीय क्रमांक मिळविणारा अथर्व धुळप्पा माशाळे याचा विशेष सत्कार करण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांनी शाळा सोडल्याचा दाखला व गुणपत्रिकेची प्रत १५ जुलैपर्यंत समितीने दिलेल्या समन्वयकांच्या व्हॉट्सॲप क्रमांकावर पाठवून नोंदणी करावी, असे आवाहनही त्यांनी केले. यावेळी शंकर कोळेकर, प्रा.डॉ. नागनाथ धायगोडे, बाळकृष्ण वाघमोडे उपस्थित होते.




## अधिकाऱ्यांनी लोकहिताला प्राधान्य द्यावे : महापौर कोंड्याल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३ जुलै-**

अधिकाऱ्यांनी लोकाभिमुख प्रशासन, प्रामाणिकपणा, पारदर्शकता आणि लोकहिताला प्राधान्य देत नागरिकांना वेळेत व दर्जेदार सेवा उपलब्ध करुन दिले पाहिजे, असे प्रतिपादन महापौर विनायक कोंड्याल यांनी केले.

धर्मवीर शहर व हद्दवाढ कर्मचारी संघटनेच्या वतीने महापालिकेचे सहायक आयुक्तद्वय युवराज गाडेकर, विनोद कुलकर्णी, उपायुक्त गिरीश पंडित, जिल्हाधिकारी कार्यालयातील सहायक आयुक्त आशिष लोकरे यांचा गौरव करण्यात आला. यावेळी ते बोलत होते.व्यासपीठावर उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर, सभागृह नेते नरेंद्र काळे, आयुक्त डॉ.सचिन ओम्बासे, उपायुक्त सोनाली यादव, सामान्य प्रशासन विभागाचे अधीक्षक रजाक पेंढारी, गुरुशांत धुत्तरगावंकर उपस्थित होते.मल्लिकार्जुन हुणजे व विशाल माने यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. राहुल कुलकर्णी यांनी प्रास्ताविक तर गुरुलिंग पुजारी यांनी सूत्रसंचालन केले.

# महापालिकेच्या विषय समित्यांवरील सातही सभापतींच्या बिनविरोध निवडीवर शिक्कामोर्तब

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३ जुलै-**

सोलापूर महानगरपालिकेच्या कारभारात महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या सात विषय समित्यांच्या सभापतीपदांच्या बिनविरोध निवडीवर शुक्रवारी झालेल्या सभेत शिक्कामोर्तब करण्यात आला. अपर जिल्हाधिकारी तथा पिठासीन अधिकारी गणेश निऱ्हाळी हे सभेच्या अध्यक्षस्थानी होते.

मुंबई प्रांतिक महापालिका अधिनियमातील तरतुदीनुसार ही निवडणूक प्रक्रिया राबविण्यात आली. याकामी महापालिकेचे नगरसचिव प्रवीण दंतकाळे यांनी सहाय्य केले. लिपिक नितीन गायकवाड, शेखर सकट यांच्यासह कर्मचाऱ्यांनी त्यांना सहकार्य केले.

सातही विषय समित्यांमध्ये भाजपाचे आठ आणि एमआयएमचा एक सदस्य असा पक्षीय बलाबल आहे. काँग्रेस व शिवसेनेचा एकही सदस्य या समित्यांमध्ये नाहीत. त्यामुळे या समित्यांच्या सभापतीपदासाठी झालेल्या निवडणुकीत कोणतीही चुरस निर्माण झाली नाही.



महापौर विनायक कोंड्याल यांच्या हस्ते सातही सभापतींचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर, सभागृह नेते नरेंद्र काळे, भाजप शहराध्यक्षा तथा नगरसेविका रोहिणी तडवळकर, माजी महापौर श्रीकांचना यन्नम उपस्थित होते. या निवडीत विधानसभा मतदारसंघांचा समतोल राखण्याचा प्रयत्न झाल्याचे दिसून आले. शहर उत्तर मतदारसंघाला सर्वाधिक तीन सभापतीपदे मिळाली असून शहर मध्य आणि दक्षिण सोलापूर या दोन्ही मतदारसंघांना प्रत्येकी दोन सभापतीपदांचा मान मिळाला.

### शहराच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबध्द

बिनविरोध निवड झाल्यानंतर सातही विषय समितीच्या सभापतींनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना म्हणाले, पालकमंत्री जयकुमार गोरे, आ. विजय देशमुख, आ.सुभाष देशमुख, आ. देवेंद्र कोठे, आ. सचिन कल्याणशेट्टी यांच्यासह पक्षश्रेष्ठींनी आमच्यावर विश्वास दाखवून दिलेली जबाबदारी व्यवस्थित पार पाडू. शहराच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबध्द राहू.

### विषय समितीनिहाय सभापती याप्रमाणे

स्थापत्य समिती-विजय चिप्पा, विधी समिती-सत्यजित वाघमोडे, वैद्यकीय सहाय्य व आरोग्य समिती-सुनील खटके, शहर सुधारणा समिती-स्वाती बडगू, मंडई व उद्यान समिती-राजशेखर पाटील, कामगार व समाजकल्याण समिती-श्रध्दा पवार, महिला व बालकल्याण समिती-निर्मला जंगम.

### महापुरुषांच्या जयघोषाने दणाणला परिसर

या निवडीच्या निमित्ताने भारतीय जनता पार्टीने सामाजिक समतोल साधण्याचा प्रयत्न केला. निवडीनंतर सर्व सभापतींसह पदाधिकारी, कार्यकर्ते यांनी कौन्सिल हॉल समोर जल्लोष केला. यावेळी विविध महापुरुषांच्या जयघोष आणि हलगीच्या कडकडाटाने परिसर दणाणून सोडण्यात आला होता.

### तडवळकर यांनी जंगम यांना गाडीत बसविले

भारतीय जनता पार्टीच्या शहराध्यक्षा तथा नगरसेविका रोहिणी तडवळकर यांनी महिला व बालकल्याण समितीच्या नूतन सभापती निर्मला जंगम यांना सभापतींच्या सजवलेल्या गाडीत बसवून शुभेच्छा दिल्या.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## ज्ञानामृत आनंदलहरी - १४९१

**ऐसेनि मातें जाणिजे । ते अव्यभिचारी भक्ति म्हणिजे ।**
**येथ भेदु कांहीं देखिजे । तरी व्यभिचारु तो ।।**

आत्मज्ञानी व्यक्ति त्रिगुणांना ताब्यात कसे ठेऊ शकतो? अर्जुनाच्या या प्रश्नावर भगवंत मार्गदर्शन करीत आहेत. आत्मज्ञानी हा अव्यभिचार भावे भगवंताचे सेवन करतो, त्यामुळे तो गुणांना ताब्यात ठेवु शकतो. ईश्वराला सर्व देही पाहणे, हा अव्यभिचार भक्तीचा आधारस्तंभ आहे. पातळपणा म्हणजे पाणी, अवकाश म्हणजे आकाश, गोडी म्हणजे साखर, अग्नी म्हणजे जाळ, पाकळया म्हणजेच कमळ, फांदया, पाने,फळे म्हणजे वृक्ष होय. गोठून एकत्र झालेला बर्फ म्हणजे हिमालय, विरजलेले दुध म्हणजेच दही होय. अगदी या प्रमाणे विविध प्राणीमात्रांनी विस्तारलेले हे



विश्व म्हणजेच ईश्वर होय. तुपाचा घटपणा न मोडता ते घटपणासह मूळात तूपच असते. कंकण, दागिणे न आटविताही ते सोनेच असते, वस्त्राचे धागे न उकलता ते वस्त्र म्हणजे दोराच असतो. मातीची घागर न विरघळताही ती घागर मातीच असते. अगदी त्या प्रमाणे हे विश्व, सर्व चराचर म्हणजेच भगवंत आहे, असे समजून केलेली भक्ति म्हणजे अव्यभिचारी भक्ती होय. व्यभिचारी व अव्यभिचारी भक्तिबद्यल बोलतांना भगवंत म्हणाले,

**ऐसेनि मातें जाणिजे । ते अव्यभिचारी भक्ति म्हणिजे ।**
**येथ भेदु कांहीं देखिजे । तरी व्यभिचारु तो ।।**

अभेदयरुपाने विश्वाला, ईश्वराला पाहाणे, हाच ज्ञानी भक्तीचा पाया आहे. हा पायाच जर कच्चा राहिला तर ब्रम्हरुपाची इमारत बांधणे अशक्य होते. मी ला या विश्वात मिसळून टाकावे. स्वत:कडे मी ला अजिबात ठेवू नये. समता पाहण्याच्या विकसित दृष्टीलाच ज्ञानाचा चांगलेपणा म्हटले जाते. घ्यानासाठी,आत्मज्ञासाठी हीच दृष्टी सर्वस्वी असते. आपली भक्ति ही अव्यभिचारी आहे की, व्यभिचारी आहे, हे ज्याने त्याने शोधावे. आपण जर जीवा-जीवांत भेद पाहत असू, लहान-मोठा , श्रीमंत-गरीब, स्त्री-पुरुष असा भेद करीत असू, आणि ईश्वराच्या प्राप्तीसाठी भक्ति करीत असू, तर आपली भक्ति ही व्यभिचारी भक्ति होईल. व्यभिचारी भक्ति करणा-यांचे प्रमाण वाढले असले तरीही आपली गणना व्यभिचारी भक्तात होता कामा नये. सर्व प्राणीमात्र समान असून, या सर्वामध्ये एक ब्रम्हच भरुन उरले असल्याचे मानून आपण भक्ति करीत असू तर आपली भक्ति अव्यभिचारी भक्ति होईल.अव्यभिचारी भक्तिच भगवंताला आवडते. भक्तिमध्ये व्यवहार, भेद आणने हा एक प्रकारचा व्यभिचार आहे, असेही माऊलींना या ठिकाणी सांगावयाचे आहे. आपण माऊलींचे शिष्य असल्याने आपल्याकडून व्यभिचारी भक्ति होणारच नाही. अर्थात, आपण प्राणीमाऋात भेद पाहणारच नाहीत. आपली भक्ति ही अव्यभिचारीच असेल असेच वर्तन आपल्याकडून होईल, अशी अपेक्षा आजच्या ओवी प्रसंगी करणे संयुक्तीक होईल. अव्यभिचारी भक्ति हाच समता, बंधुता, प्रेमाचा आधारस्तंभ आहे हे ध्यानात ठेवावे. जय जय राम कृष्ण हरी।

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

**वार : शनिवार,**
**दि. ४ जुलै २०२६**
**विक्रम संवत् २०८३ ।**
**शके -१९४८**
**संवत्सर - पराभव**
**मास - ज्येष्ठ कृ. चतुर्थी**
**ऋतु - ग्रीष्म ।**
**नक्षत्र- धनिष्ठा (१३.४३)**
**योग - प्रीती (१७.००)**
**करण - कौलव (२५.०८)**
**राहू काल : शनिवार**
**दु. ०९.०० ते १०.३०**

**दिनविशेष :**
**१७७६: अमेरिकेने स्वत:ला इंग्लंडपासून स्वतंत्र घोषित केले. हा दिवस अमेरिकेत स्वातंत्र्यदिन म्हणून मोठ्या साजरा केला जातो.**
**१९११: स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या अंदमान येथील एकांतवासाला प्रारंभ झाला.**
**१९०२: भारतीय तत्त्वज्ञानाचा जगभर प्रसार करणारे महान संन्यासी आणि विचारवंत स्वामी विवेकानंद यांची पुण्यतिथी**

# पंढरपुरात श्री व्यंकटेश, महालक्ष्मीसह चार मंदिरात आज व उद्या मुर्तींची प्राणप्रतिष्ठा

### विकास आराखड्यांतर्गत जीर्णोध्दार पूर्ण

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर दि.३ जुलै-**

श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर व परिवार देवता मंदिर जतन व संवर्धन विकास आराखड्यांतर्गत जीर्णोद्धार व संवर्धनाची कामे पूर्ण झालेल्या श्री व्यंकटेश मंदिर, श्री महालक्ष्मी मंदिर, श्री काशी अन्नपूर्णा मंदिर तसेच कचेरीजवळील श्री मारुती मंदिर येथील मूर्तींची प्राणप्रतिष्ठा दि. ४ व ५ जुलै रोजी विधीपूर्वक संपन्न होणार असल्याची माहिती मंदिर समितीचे सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी दिली.

सदरची सर्व कामे पुरातत्व विभागाच्या मार्गदर्शनाखाली करण्यात येत आहेत. श्री व्यंकटेश मंदिर हे हेमाडपंथी शैलीतील या मंदिराच्या बाहेरील भिंतींना तडे गेले होते तसेच भिंती बाहेरच्या दिशेने फुगल्या होत्या. त्यामुळे जीर्णोद्धारामध्ये मंदिराची संपूर्ण मोजमापासह नोंद करण्यात आली. प्रत्येक दगडाला क्रमांक देऊन त्याची स्वतंत्र नोंद घेण्यात आली. त्यानंतर स्वाईल बॅग सपोर्ट या तंत्राच्या सहाय्याने दगड काळजीपूर्वक उतरविण्यात आले. चुन्याच्या कॉंक्रीटचा व दगडांचा मजबूत पाया घालून मूळ दगडांचा वापर करत मंदिराची पूर्ववत पुनर्बांधणी करण्यात आली. पूर्णतः खराब झालेल्या दगडांच्या जागी त्याच शैलीतील नवीन दगड बसविण्यात आले. विटा व चुन्याच्या दाट पेस्टम ध्ये नवीन शिखर उभारून त्यास पर्यावरणपूरक रंग देण्यात आले असून पाणी झिरपू नये म्हणून संरक्षक थर देण्यात आला आहे.

श्री महालक्ष्मी मंदिर या मंदिराच्या मूळ दगडी वास्तूवर आतून टाईल्सचे आवरण व बाहेरील बाजूस रंग देण्यात आल्यामुळे बेसॉल्ट दगडाची नैसर्गिक श्वसनक्षमता (कमी झाली होती. त्यामुळे जीर्णोद्धारामध्ये टाईल्स काढून, एअर ॲब्रेशन तंत्राद्वारे दगडावरील रंग स्वच्छ करण्यात आला. जुनी फरशी काढून नवीन दगडी फरशी बसविण्यात आली. बाजीराव पडसाळ या परिसरातील तात्पुरते पत्र्याचे छत काढून नैसर्गिक हवा व प्रकाशाचा पुरेपूर वापर होईल तसेच भाविकांना विश्रांतीसाठी आच्छादित जागा उपलब्ध होईल, अशा प्रकारे कायमस्वरूपी हेरिटेज स्वरूपाचे शेड उभारण्यात आले आहे. यासोबत एअर अम्ब्रेशन, लाईम पॉईटींग नवीन दगडी फ्लोअरिंग तसेच संरक्षक कोटिंगची कामे पूर्ण करण्यात आली आहेत. कचेरीजवळील श्री मारुती मंदिरालाही जवळील झाडाच्या मुळांमुळे भिंतींना तडे गेले होते व त्या बाहेरच्या बाजूस फुगल्या होत्या. या मंदिराची काळ्या बेसॉल्ट दगडाचा व चुन्याच्या मोर्टारचा वापर करून पुनर्बांधणी करण्यात आली. विटा व चुन्याच्या मोर्टारमधील नवीन शिखर उभारून



श्री कचेरी मारुती मंदिर

त्यास पर्यावरणपूरक रंग देण्यात आला. तसेच पावसाचे पाणी झिरपू नये म्हणून संरक्षक दगडी थर देण्यात येणार असल्याचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी सांगीतले.



# जोडबसवण्णा चौकातील अतिक्रमणांवर कारवाई

### १३ अनधिकृत फलक हटविले, राजस्व मंगल कार्यालय सील

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ जुलै-**

शहरातील अतिक्रमणांवर सोलापूर महानगरपालिकेच्या अतिक्रमण प्रतिबंधक विभागाने पुन्हा एकदा धडक कारवाई करत जोडबसवण्णा चौक व परिसरातील फळ विक्रेत्यांचे अतिक्रमण हटविले. तसेच १३ अनधिकृत नामफलक आणि एक अनधिकृत पत्राशेड निष्कासित करण्यात आले.

आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्या आदेशानुसार महापालिकेचे अतिक्रमण नियंत्रण अधिकारी नीलकंठ मठपती यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहीम राबविण्यात आली. अतिक्रमण हटविण्याबरोबरच नगररचना विभागाच्या संयुक्त कारवाईत राजस्व नगर येथील नियमबाह्य राजस्व मंगल कार्यालयावर कारवाई करून ते सील करण्यात आले. या कारवाईमुळे अनधिकृत बांधकामे व अतिक्रमणांवर महापालिका प्रशासनाने कठोर भूमिका घेतली आहे. शहरातील सार्वजनिक रस्ते, पदपथ आणि शासकीय जागांवरील अतिक्रमणे हटविण्याची मोहीम यापुढेही सुरू राहणार असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले.

या कारवाईवेळी अतिक्रमण विभागाचे कनिष्ठ अभियंता दीपक कुंभार तसेच पोलीस कर्मचारी उपस्थित होते.

# डॉ. किरण देशमुख यांच्या हस्ते शालेय साहित्य वाटप

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ जुलै-**



समाधान धर्म व बाल संस्कार केंद्राच्या वतीने रेवणसिद्धेश्वर मंगल कार्यालय येथे शालेय साहित्याचे वाटप आणि गुणवंत विद्यार्थी सत्कार नगरसेवक डॉ. किरण देशमुख यांच्या हस्ते करण्यात आला.

यावेळी व्यासपीठावर उद्योजक लक्ष्मीकांत चाटला, महांतेश गुळगी, सामाजिक कार्यकर्ते वीरेंद्र हिंगमिरे, चंद्रकांत मुंडे, दत्तात्रय बडगू, मल्लिकार्जुन सोन्ना यांची उपस्थिती होती. भवानी पेठ परिसरातील इंदिरा वसाहत, भाजी मार्केट, घोंगडे वस्ती, मडडी वस्ती, जोडभावी पेठ येथील ५०० विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. सामाजिक कार्यकर्ते आणि उद्योजक वीरेंद्र हिंगमिरे यांनी यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. केंद्राचे संस्थापक सुभाष कलशेट्टी यांनी प्रास्ताविक केले. ओंकार मुंडे यांनी सूत्रसंचालन केले. केदार खोबरे यांनी आभार मानले.

# हिराचंद नेमचंद कॉमर्स महाविद्यालयात अकरावीच्या विद्यार्थ्यांचे स्वागत

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ जुलै-**



हिराचंद नेमचंद कॉलेज ऑफ कॉमर्स (स्वायत्त महाविद्यालय), अशोक चौक येथे शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मधील इयत्ता अकरावीच्या नवप्रवेशित विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले. हेड क्वार्टर केंद्राचे मुख्याध्यापक प्रदीप भगवानसिंग ठाकूर प्रमुख पाहुणे तर प्राचार्य डॉ. सत्यजित शहा अध्यक्षस्थानी होते. मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांचे गुलाबपुष्प देऊन स्वागत करण्यात आले.

कार्यक्रमास मॅनेजमेंट विभागाचे प्रमुख प्रीतम कोठारी, उपप्राचार्य भीमगोंडा पाटील, समन्वयक प्रा. अजित देवसाळे उपस्थित होते.



# गजानन महाराज पालखीतील वारकऱ्यांना १८ जुलैला महाप्रसाद

**सोलापूर, दि. ३ जुलै-**

श्री शेगांव गजानन महाराज पालखी शनिवार १८ जुलै रोजी कुचन हायस्कूल येथे मुक्कामी राहणार आहे. दरवर्षी प्रमाणे यंदाही या पालखीतील वारकऱ्याना महाप्रसाद देण्याचे अधिकार पत्र श्री शेगांव गजानन महाराज सोलापूर जिल्हा समिती प्रमुख सुनील फाळके व सुनील कुलकर्णी यांनी हरि ओम विणकर बाग बहुद्देशीय संस्थेचे अध्यक्ष बालाजी जंगम यांच्याकडे सुपूर्त केले. यावेळी संस्थेचे पदाधिकारी लक्ष्मीकांत दंडी, हिरालाल धुळम, इराण्णा चानशेट्टी, अशोक यज्जा, रुक्मण्सा दौलताबाद, गणेश सिद्धम, जगदीश बोंबड्याळ उपस्थित होते. हे पत्र संस्थेला मिळाल्यानंतर संस्थेचे अध्यक्ष जंगम यांनी समिती प्रमुखांचे आभार मानले.



# सलगर वस्ती भागात मध्यरात्री दुचाकी अडवून मोबाईल पळविला

**सोलापूर, दि. ३ जुलै-**

सलगरवस्ती भागात मध्यरात्री एका दुचाकी स्वाराला अडवून त्याच्या खिशातील मोबाईल जबरदस्तीने काढून पळवून नेल्याची घटना बुधवारी रात्री साडेअकरा वाजता घडली. दरम्यान याप्रकरणी सलगर वस्ती पोलीस ठाण्यात अज्ञाताविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत प्रशांत सिद्राम चलवादी ( वय-२८ वर्षे, रा- घरनं ९० मोठी इरण्णा वस्ती सिध्दारूढ मठाजवळ सोलापूर ) यांनी फिर्याद दिली आहे. यातील फिर्यादी हा बुधवार रोजी रात्री ११.३० वा चे दरम्यान बाबासाहेब तालीम जवळ मोठी इरण्णा वस्ती येथून दुचाकी वरून जात असताना अचानक एक इसम समोर येवून फिर्यादीस आडवून तुझ्याकडे असलेले पैसे व मोबाईल मला दे तेव्हा फिर्यादीने त्यास माझ्याकडे पैसे नाहीत असे म्हटले असता त्याने फिर्यादीला शर्टाच्या कॉलरला पकडून खाली पाडले व फिर्यादीच्या पॅन्टच्या खिश्यात ठेवलेला विवो कंपनीचा ५ हजार रुपये किमतीचा मोबाईल जबरदस्ती ने काढून नेल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.पोलीस हवालदार उडाणशिव हे गुन्ह्याचा पुढील तपास करीत आहेत .



# सावित्री रत्न पुरस्कार सोहळ्यात विविध क्षेत्रातील मान्यवरांचा गौरव

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ जुलै-**

जुळे सोलापूर येथील द्वारकाधीश मंदिरात सावित्रीबाई फुले शिक्षण व बहुउद्देशीय संस्था, मंगरूळ आणि साप्ताहिक श्रीसंकेत यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'सावित्री रत्न पुरस्कार' सोहळा पार पडला. समाजातील विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्ती व संस्थांचा यावेळी गौरव करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अशोक भांजे होते तर एम. के. फाउंडेशनचे संस्थापक महादेव कोगनुरे यांच्या हस्ते पुरस्कारांचे वितरण झाले. दत्तात्रय पाठक, आण्णा टक्कळकी, जयंत सावकार आणि प्रकाश राठोड हे प्रमुख पाहुणे उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेच्या पूजनाने झाली. संस्थेचे अध्यक्ष महादेव जंबगी यांनी प्रास्ताविक केले. कार्यक्रमास नाना कुलकर्णी, अकबर मुजावर, भीमाशंकर विजापूरे, गुरु बिरादार, सिद्धाराम करपे, सुधीर जोशी, बाबुराव कुंभार, विभुते, रमेश कोर्सेगाव, नितीन तळवार, गंगाधर शिवशरण, रमेश माशाळे, विठ्ठल जाधव, काशिनाथ भातगुणकी, बनसिद्ध गुरव, जमदाडे उपस्थित होते. सूत्रसंचालन सिद्धाराम करपे यांनी केले.

### यांचा झाला सन्मान

बाळासाहेब पाटील (योग शिक्षक), डॉ. संतोष राठोड (वैद्यकीय सेवा), भास्कर कानवटे (ग्रामपंचायत अधिकारी), प्रतिक वाघमोडे (सहाय्यक कृषी अधिकारी), अविनाश भैरुणगी (सहशिक्षक), आस्था फाउंडेशन (सामाजिक संस्था), वैशाली कोळी (सरपंच), गीता राजकुमार पवार (शैक्षणिक क्षेत्र), सीमा डोके (परिचारिका), श्रीमती अंबिका गुरव (बचत गट) आणि अश्विनी जाधवर (महिला पोलिस) यांना 'सावित्री रत्न पुरस्कार' प्रदान करून सन्मानित करण्यात आले.

# 'एनआयआरएफ रँकिंग'च्या पहिल्या शंभरात सोलापूर विद्यापीठ का नाही?

नॅशनल इन्स्टिट्युशनल रँकिंग फ्रेमवर्क (एनआयआरएफ) ही भारत सरकारच्या शिक्षण मंत्रालयाद्वारे देशातील उच्च शिक्षण संस्थांचे मूल्यमापन आणि मानांकन करण्यासाठी सप्टेंबर २०१५ मध्ये सुरू केलेली एक अधिकृत प्रणाली आहे. यांच्यामार्फत दरवर्षी देशातील विद्यापीठे, कॉलेज आणि विविध व्यावसायिक संस्थांची 'इंडिया रँकिंग' जाहीर केली जाते, ज्याला शैक्षणिक क्षेत्रात अत्यंत प्रतिष्ठेचे मानले जाते. यामध्ये स्थान मिळवणे किंवा त्यात सहभागी होणे हे कोणत्याही विद्यापीठासाठी अत्यंत महत्त्वाचे मानले जाते. केंद्र सरकारच्या शिक्षण मंत्रालयामार्फत जाहीर केल्या जाणाऱ्या या रँकिंगमुळे विद्यापीठाला अनेक प्रकारचे थेट आणि अप्रत्यक्ष फायदे होतात.

या रँकिंगमुळे विद्यापीठाची शैक्षणिक गुणवत्ता आणि विश्वासार्हता मोठ्या प्रमाणात वाढते. चांगली रँक मिळाल्यास विद्यापीठाची राष्ट्रीय पातळीवर एक वेगळी ओळख निर्माण होते, ज्यामुळे शिक्षण क्षेत्रात आणि समाजात विद्यापीठाची पत वाढते. जेव्हा विद्यापीठ क्रम वारीत वरच्या स्थानावर असते, तेव्हा देशभरातील गुणवंत विद्यार्थी त्या विद्यापीठाकडे आकर्षित होतात. प्रवेश प्रक्रियेदरम्यान विद्यार्थी या रँकिंगला प्राधान्य देतात, ज्यामुळे विद्यापीठाला चांगल्या दर्जाचे विद्यार्थी मिळतात. याशिवाय, चांगले रँकिंग असलेल्या विद्यापीठांना केंद्र सरकार, युजीसी, डीएसटी आणि इतर संशोधन संस्थांकडून मोठ्या प्रमाणावर संशोधन निधी आणि इतर शैक्षणिक अनुदान मिळण्याची शक्यता वाढते. पायाभूत सुविधांचा विकास करण्यासाठी हा निधी अत्यंत उपयुक्त ठरतो. उत्कृष्ट प्राध्यापकांची उपलब्धता हा देखील याचा एक मोठा फायदा आहे. गुणवंत आणि अनुभवी प्राध्यापक व संशोधक नेहमीच नामांकित विद्यापीठांमध्ये काम करण्यास प्राधान्य देतात. चांगल्या रँकिंगमुळे विद्यापीठाला देशातील सर्वोत्तम शिक्षक आणि मार्गदर्शक आपल्याकडे आकर्षित करता येतात, ज्याचा थेट फायदा विद्यार्थ्यांना होतो. देश-विदेशातील मोठ्या कंपन्या कॅम्पस प्लेसमेंटसाठी विद्यापीठांची निवड करताना या रँकिंगचा आधार घेतात. त्यामुळे उच्च रँकिंग असलेल्या विद्यापीठांमधील विद्यार्थ्यांना रोजगाराच्या दर्जेदार आणि मोठ्या संधी सहज उपलब्ध होतात. आंतरराष्ट्रीय स्तरावर ओळख आणि सहयोग मिळवणे यामुळे सोपे होते. यामुळे परदेशी विद्यापीठांसोबत शैक्षणिक करार करणे, विद्यार्थी आणि प्राध्यापकांचे आदानप्रदान करणे आणि संयुक्त संशोधन प्रकल्प राबवणे सोपे होते. तसेच, या रँकिंगमुळे विद्यापीठाला आपले नेमके कोणते क्षेत्र मजबूत आहे आणि कोणत्या क्षेत्रात सुधारणेची गरज आहे, याचे अचूक आत्मपरीक्षण करता येते.

### महाराष्ट्रातील २०२५च्या प्रथम शंभरी शिक्षण संस्था

महाराष्ट्रातील अनेक प्रमुख केंद्रीय, राज्य सार्वजनिक आणि अभिमत विद्यापीठांनी या रँकिंग प्रक्रियेत सहभाग घेतला आहे. राष्ट्रीय पातळीवर पहिल्या १०० विद्यापीठांमध्ये महाराष्ट्रातील काही विद्यापीठांनी मानाचे स्थान मिळवले आहे. या अंतर्गत संस्थांना समग्र (ओव्हरऑल), विद्यापीठे, महाविद्यालये, अभियांत्रिकी, व्यवस्थापन, फार्मसी, वैद्यकीय, वास्तुकला, कायदा, कृषी आणि संलग्न क्षेत्रे या वेगवेगळ्या गटांत विभागून क्रमवारी दिली जाते. महाराष्ट्रातील प्रमुख संस्थांचे २०२५चे ओव्हर ऑल रँकिंग पाहिले तर आयआयटी मुंबई (३), होमी भाभा राष्ट्रीय संस्था मुंबई (२०), सिम्बॉयसिस इंटरनॅशनल पुणे (४१), इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स एज्युकेशन अँड रिसर्च पुणे (५५), इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी मुंबई (६४), डॉ. डी वाय पाटील विद्यापीठ पुणे (७१), दत्ता मेघे इन्स्टिट्यूट ऑफ हायर एज्युकेशन अँड रिसर्च वर्धा (८४), विश्वेश्वरय्या नॅशनल इन्स्टिट्यूट टेक्नॉलॉजी नागपूर (८६), सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे (९१), मुंबई विद्यापीठ मुंबई (९२)आणि एसव्हीकेएम नरसी मोंजी इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज मुंबई (९५) असे रँकिंग आहे.







**विद्यापीठातून...**
**अजितकुमार संगवे**
**मो. 9881133103**

### क्रमवारीचे निकष, महत्व व फायदे

एनआयआरएफ याचे मूल्यमापन मुख्यत्वे ५ प्रमुख निकषांच्या आधारे करते, ज्यामध्ये प्रत्येक निकषाला ठराविक गुण असतात. पहिल्या निकषात संस्थेतील प्राध्यापकांची संख्या, त्यांचा दर्जा, शैक्षणिक सुविधा आणि संसाधने; दुसऱ्यात संस्थेमध्ये होणारे संशोधन, प्रसिद्ध झालेले शोधनिबंध आणि पेटंट्स; तिसऱ्यात परीक्षांचे निकाल आणि उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या नोकऱ्या किंवा पुढील उच्च शिक्षणाच्या संधी; चौथ्यात इतर राज्यांतील व देशांतील विद्यार्थी, महिला, आणि आर्थिक किंवा सामाजिकदृष्ट्या मागासलेल्या व दिव्यांग विद्यार्थ्यांचे प्रमाण तर पाचव्या निकषात शैक्षणिक क्षेत्र आणि उद्योग जगतामध्ये त्या संस्थेची पत किंवा नाव कसे आहे, याचा विचार केला जातो. या रँकिंगचे महत्त्व सर्वच स्तरांवर आहे. विद्यार्थ्यांसाठी प्रवेश घेताना कोणती संस्था शिक्षण आणि करिअरच्या दृष्टीने उत्तम आहे, हे समजण्यासाठी याचा मोठा फायदा होतो. संस्थांसाठी राष्ट्रीय पातळीवर आपली कामगिरी कुठे कमी पडतेय हे ओळखून स्वतःचा दर्जा सुधारण्याची संधी मिळते, तर निधीसाठी अनेकदा सरकारी अनुदान किंवा निधी मिळवण्यासाठी या रँकिंगचा सकारात्मक फायदा होतो.

### सोलापूर विद्यापीठासमोर आव्हाने

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ २०१९पासून दरवर्षी आपला शैक्षणिक आणि प्रशासकीय डेटा एनआयआरएफकडे ओव्हर ऑल रँकिंग या गटात मूल्यांकनासाठी पाठवित आहे. परंतु सोलापूर विद्यापीठाला पहिल्या शंभरात अद्यापपर्यंत स्थान मिळालेले नाही, कारण विद्यापीठासमोर काही मोठी आव्हाने आहेत. रँकिंगमध्ये सर्वाधिक गुण संशोधन आणि व्यावसायिक सराव या निकषाला असतात. प्राध्यापक आणि संशोधकांचे आंतरराष्ट्रीय स्तरावरील शोधनिबंध आणि पेटंट्सचे प्रमाण खूप जास्त असावे लागते. तसेच, पुणे किंवा मुंबई विद्यापीठाच्या तुलनेत पायाभूत सुविधा आणि निधीच्या बाबतीत मोठ्या विद्यापीठांशी स्पर्धा करणे आव्हानात्मक ठरते. यात परराज्यातील विद्यार्थ्यांचे प्रमाणही पाहिले जाते, परंतु सोलापूर विद्यापीठात प्रामुख्याने स्थानिक आणि ग्रामीण भागातील विद्यार्थी जास्त आहेत. असे असले तरी, राष्ट्रीय स्तरावरील या स्पर्धेत सहभाग नोंदवणे आणि स्वतःचे स्वयं-मूल्यांकन करणे हे सोलापूर विद्यापीठाच्या भविष्यातील शैक्षणिक प्रगतीसाठी आणि उणिवा सुधारण्यासाठी अत्यंत महत्त्वाचे पाऊल मानले जाते. थोडक्यात सांगायचे तर, एनआयआरएफ रँकिंग हे केवळ एक मानांकन नसून विद्यापीठाच्या सर्वांगीण विकासाचे, आर्थिक सक्षमतेचे आणि शैक्षणिक प्रगतीचे एक मोठे माध्यम आहे. त्यासाठी सोलापूर विद्यापीठाने पहिल्या शंभरमध्ये येण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/


## महत्वाचे...



### ए. जी. पाटील इन्स्टिट्यूटच्या विद्यार्थ्यांची डिजिटल किमया

**सोलापूर, दि. ३ जुलै-**
मानसिक आरोग्याशी संबंधित वाढत्या समस्यांवर तंत्रज्ञानाच्या माध्यमातून प्रभावी उपाय उपलब्ध करून देण्यासाठी ए. जी. पाटील इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, सोलापूर येथील संगणक अभियांत्रिकी विभागातील अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांनी डिजिटल मानसिक आरोग्य व मानसशास्त्रीय सहाय्य प्रणाली हा अभिनव प्रकल्प विकसित केला आहे. सदाफुले मृदुला, कविता चिम्मण, शिफा कोटी आणि समर्थ हत्ते या विद्यार्थ्यांनी हा प्रकल्प यशस्वीरित्या पूर्ण केला. कृत्रिम बुद्धिमत्ता, मशीन लर्निंग आणि वेब तंत्रज्ञानाचा वापर करून विकसित करण्यात आलेली ही प्रणाली वापरकर्त्यांच्या मानसिक आरोग्याचे प्राथमिक मूल्यमापन करून त्यांना आवश्यक मार्गदर्शन उपलब्ध करून देते. या प्रणालीमध्ये मानसिक तणाव, चिंता, नैराश्य आणि भावनिक समस्यांचे विश्लेषण करण्यासाठी विविध मानसशास्त्रीय चाचण्या व प्रश्नावलींचा समावेश करण्यात आला आहे. हा प्रकल्प प्रा. आरती वळसंग यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण करण्यात आला. तसेच विभागप्रमुख प्रा. श्रीपाद कुलकर्णी यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. विद्यार्थ्यांच्या या संशोधनबद्दल संस्थेचे अध्यक्ष एस. ए. पाटील, सचिव एस. एस. पाटील, डॉ. एम. ए. चौगुले, प्राचार्य डॉ. व्ही. व्ही. पोतदार यांनी त्यांचे अभिनंदन केले.



### राजर्षी शाहू महाविद्यालयाच्या दोन माजी विद्यार्थिनींची जिल्हा न्यायाधीशपदी निवड

**बार्शी, दि. ३ जुलै-**
येथील राजर्षी शाहू विधी महाविद्यालयाच्या दोन माजी विद्यार्थिनींची जिल्हा न्यायाधीशपदी निवड झाली आहे. या निवडीमध्ये महाविद्यालयाच्या २००७-२००८ च्या बॅचमधील विद्यार्थिनी सत्यवती शेषेराव रेंगे-डोके यांचा समावेश आहे. तसेच२०१५-२०१६ च्या बॅचमधील वैशाली जगदाळे यांचीही जिल्हा न्यायाधीश म्हणून निवड झाली आहे. या दोन निवडीआधी २०११-२०१२च्या बॅचचे सुदर्शन शिंदे यांचीही जिल्हा न्यायाधीश म्हणून निवड झाली होती. महाविद्यालयाच्या आजपर्यंतच्या इतिहासात २८ विद्यार्थ्यांची प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी म्हणून निवड झाली आहे. त्यातील अनेक विद्यार्थी पदोन्नती मिळवून सध्या जिल्हा न्यायाधीश म्हणून सेवा बजावत आहेत. यासोबतच, महाविद्यालयाचे १०० पेक्षा जास्त माजी विद्यार्थी सध्या सरकारी वकील म्हणून कार्यरत आहेत, अशी माहिती महाविद्यालयाकडून देण्यात आली आहे. या निवडीबद्दल प्राचार्य डॉ. रत्नदीप सोनकांबळे यांनी नवनिर्वाचित न्यायाधीशांचे अभिनंदन केले आहे. तसेच संस्थेचे अध्यक्ष डॉ. बी. वाय. यादव, उपाध्यक्ष नंदन जगदाळे, सचिव पी. टी. पाटील, सहसचिव ए. पी. देबडवार, खजिनदार जयकुमार शितोळे आणि डॉ. प्रकाश बुरगुटे यांनीही यशस्वी विद्यार्थिनींचे अभिनंदन केले.

### मानधन सन्मान योजनेंतर्गत ३१ जुलैपर्यंत ऑनलाईन अर्ज करा

**माळशिरस, दि. ३ जुलै-**
ज्येष्ठ साहित्यिक व कलाकारांना महाराष्ट्र शासन प्रतिमहा ५ हजार रूपये मानधन देते. राजर्षी शाहू महाराज ज्येष्ठ साहित्यिक व कलावंत मानधन सन्मान योजनेंतर्गत सन २०२६-२७ मध्ये पात्र लाभार्थ्यांनी या योजनेचा लाभ घेण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या आपले सरकार या पोर्टलवर http://aaplesarkar. mahaonline.gov.in संकेतस्थळावर दि. ३१ जुलै पर्यंत मुळ दस्ताऐवजासह ऑनलाईन अर्ज भरावेत, असे आवाहन माळशिरस पंचायत समितीचे गटविकास अधिकारी रघुनाथ पांढरे यांनी केले. यावेळी विस्तार अधिकारी ए.एम सरवदे उपस्थित होते. वय ५० पेक्षा जास्त, दिव्यांगांना वयाची अट १० वर्षाने शिथिल. कला व साहित्य क्षेत्रातील योगदान कमीत कमी १५ वर्षे, कलाक्षेत्रात सातत्यपूर्ण, दर्जेदार व मोलाची भर घातल, ज्येष्ठ, विधवा/परितक्त्या दिव्यांग कलाकारांना प्राधान्य राहील. कलाकाराचे सर्व मार्गानी कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न ६० हजार रुपयांपेक्षा जास्त नसावे, ज्या कलाकारांची उपजीविका फक्त कलेवरच अवलंबून आहे असे कलाकार, केंद्र किंवा राज्य शासनाच्या महामंडळे इतर कोणत्याही नियमित मासिक पेन्शन योजनेत अंतर्भूत नसलेले पात्र कलाकार यांनी अर्ज करावेत. ते महाराष्ट्राचा रहिवासी असणे बंधनकारक आहे. अधिक माहितीसाठी पंचायत समिती कार्यालयात पुजारी यांच्याशी संपर्क साधावा.

### कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालयाचे शिष्यवृत्ती परीक्षेत यश

**पिलीव, दि. ३ जुलै-**
माळशिरस तालुक्यातील पिलीव येथील कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालयाच्या आठवी व पाचवीच्या विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती परीक्षेत यश संपादन केले.आठवीमधील ७८ विद्यार्थी या परीक्षेस बसले होते त्यापैकी २२ विद्यार्थी पात्र ठरले. त्यातील चार विद्यार्थी शिष्यवृत्तीधारक ठरले आहेत. यामध्ये समृद्धी जगदाळे, श्रावणी तावरे, रुद्र यादव, राजवर्धन पाटील हे शिष्यवृत्तीधारक ठरले.तर पाचवीमधील १२ विद्यार्थी पात्र ठरले त्यामध्ये प्रित प्रशांत गांधी हा शिष्यवृत्तीधारक ठरला. आठवीचे विभागप्रमुख घोडके, सहाय्यक झाडे, पाचवीचे विभागप्रमुख जमदाडे तसेच मार्गदर्शक शिक्षक जाधव, वाघमारे, देवकर, शेगर, कदम, ऐवळे यांचे मुख्याध्यापक अशोक बागल, पर्यवेक्षक रमेश किरगत, मासाळ यांनी अभिनंदन केले.

# वारकऱ्यांना अखंडित आरोग्य सेवा मिळणार

## आषाढी वारी पार्श्वभूमीवर सभापती केदार-सावंत यांच्या अध्यक्षतेखाली बैठक



**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. ३ जुलै-**
आषाढी वारी सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर वारकऱ्यांना दर्जेदार, तत्पर व अखंडित आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यासाठी सोलापूर जिल्हा परिषद आरोग्य विभाग सज्ज असून या अनुषंगाने कासेगाव प्राथमिक आरोग्य केंद्र येथे नियोजन व आढावा बैठक जि.प.शिक्षण व आरोग्य समितीचे सभापती चेतनसिंह केदार-सावंत यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली.

दि. २५ जुलै रोजी आषाढी सोहळा पार पडणार असून आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत वारी मार्गावरील आरोग्य सुविधा, वैद्यकीय पथकांची नियुक्ती, औषधसाठा, रुग्णवाहिका व्यवस्था, आपत्कालीन उपचार सेवा, चरण सेवा, मुख्यमंत्री वारकरी सुविधा उपचार केंद्र, मुख्यमंत्री वारकरी निवारा उपचार केंद्र, मुख्यमंत्री आरोग्य रथ, आरोग्यदूत, मेडिसिन किट, उष्माघात व संसर्गजन्य आजारांवरील प्रतिबंधात्मक उपाययोजना, स्वच्छता आणि प्रत्येक पालखी सोबत एएलएस रुग्ण वाहिका देण्यात यावी अशी सूचना देण्यात आली.

तसेच वारकऱ्यांना तातडीने आरोग्य सेवा उपलब्ध होण्यासाठी करण्यात आलेल्या नियोजनाचा आढावा घेण्यात आला.

या बैठकीस आरोग्य समिती सदस्य व्यंकटराव भालके, नागनाथ भोसले, शोभा खटकाळे, सविता कोकाटे, संगीता दुधाळ, जिल्हा वैद्यकीय अधिकारी सतीश कोपुरवाड तसेच आरोग्य विभागाचे वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**वारकऱ्यांच्या सेवेसाठी प्रशासन सज्ज**

आषाढी वारी ही महाराष्ट्राच्या श्रद्धा, संस्कृती आणि सेवाभावाची अखंड परंपरा आहे. लाखो वारकऱ्यांच्या आरोग्याची जबाबदारी ही केवळ प्रशासनाची नव्हे, तर समाजाप्रती असलेली आपली सेवा आहे. प्रत्येक वारकऱ्याला वेळेत, सुरक्षित आणि दर्जेदार आरोग्य सेवा मिळावी यासाठी सोलापूर जिल्हा परिषद आरोग्य विभाग पूर्ण क्षमतेने सज्ज असून सर्व यंत्रणांनी समन्वयाने व तत्परतेने कार्य करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

**- चेतनसिंह केदार सावंत,** सभापती, जि.प.शिक्षण व आरोग्य समिती



# शिलाईच्या व्यवसायातून महिला कुटुंब सक्षम बनवतील : साठे

## मार्डी येथे शिलाई मशीनचे वाटप

**तभा वृत्तसेवा,**
**उत्तर सोलापूर, दि. ३ जुलै-**
आजही ग्रामीण भागातील महिलांसाठी शिलाईमशीनचा व्यवसाय हा त्यांच्या आवडीचा व सहज करता येण्यासारखा व्यवसाय आहे. त्यामुळे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेच्या माध्यमातून महिला सक्षमीकरण उपक्रमांतर्गत राजकुमार हिवरकर, उमा माळी यांनी महिलांना सवलतीच्या दरात शिलाई मशीन वाटपाचा सुरु केलेला उपक्रम स्तुत्य असून शिलाई मशिन व्यवसायाच्या माध्यमातून महिला त्यांचे कुटुंब निश्चितच सक्षम बनवतील, असा विश्वास जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष बळीरामकाका साठे यांनी व्यक्त केला.

मार्डी येथे शिवसेना (शिंदे) ओ.बी.सी.सेलच्या महिला तालुका अध्यक्षा उमा माळी (अकोलकर) यांनी ४०० शिलाई मशीनचे वाटप काका साठे, शिवसेनाओबीसी सेलचे प्रदेशाध्यक्ष रमेश बारसकर, जिल्हाध्यक्ष राजकुमार पाटील हिवरकर यांच्या हस्ते केले. त्यावेळी काका साठे बोलत होते.जिल्हा परिषद सदस्या शितल सिध्दाराम म्हेत्रे, मार्डी सोसायटीचे व्हाईस चेअरमन बाबासाहेब पाटील, उपसरपंच श्रीकांत मार्तंडे, राष्ट्रवादी काँग्रेसच्या तालुका अध्यक्षा सुवर्णा झाडे, प्रल्हाद काशीद, उमा माळी, सिध्दिविनायक सिमेंट पाईप इंडस्ट्रीजचे शशिकांत मार्तंडे, लक्ष्मण राठोड, संजय वडजे, भिमराव भुसनर-पाटील, दादासाहेब लोखंडे, तानाजी भोळे-पाटील, तानाजी साठे, बापूसाहेब लोखंडे, शिवदत्त मोरे, योगेश माळी, सुयश करचे, महेश पवार,नंदकुमार गरड यावेळी उपस्थित होते. यावेळी रमेश बारसकर, राजकुमार हिवरकर-पाटील यांचीही भाषणे झाली.पत्रकार दत्ता मोकाशी यांनी सूत्रसंचालन केले.

# शिष्यवृत्ती परीक्षेमध्ये एसपी स्कूलचे यश

## १७ विद्यार्थी गुणवत्ता यादीत

**तभा वृत्तसेवा,**
**करकंब, दि.३ जुलै-**
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे यांच्या वतीने फेब्रुवारी २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या शिष्यवृत्ती परीक्षेमध्ये नांदोरे ता.पंढरपूर येथील पायल फाउंडेशन संचालित एस.पी.स्कूलच्या तब्बल १७ विद्यार्थ्यांनी गुणवत्ता यादीत स्थान मिळवून नेत्रदिपक यश संपादन केले.एस.पी.स्कूलमधून इ.५वी व ८वी मधून एकूण ४१विद्यार्थी परीक्षेला बसले होते.त्यामधील ३९ विद्यार्थी पात्र झाले.यामध्ये इ.आठवी मधून वेदांत संतोष वलगे याने ३०० पैकी २७० गुण मिळवून मुलांमध्ये राज्यात १४वा क्रमांक,दानवी जयवंत नरसाळे हिने २६६ गुण मिळवून मुलींमध्ये राज्यात ४ था क्रमांक,इ.पाचवी मधून अनिरुद्ध श्रीनिवास गायकवाड याने ३०० पैकी ३७० गुण मिळवून जिल्ह्यामध्ये ९वा तसेच आरोही सुरज साळुंखे हिने २६४ गुण मिळवून जिल्हामधून मुलींमध्ये ६ वा क्रमांक मिळवत यश संपादन केले.ऋतुजा सातुरे, ओमराज कदम,वंश कुरणावळ,हर्षराज बाबर,आरोही गायकवाड,स्वरांजली पाटील, कल्याणी उलभगत,पूजा सुतार, सुहाणा मुलाणी,पायल सुरवसे, समिक्षा भिंगारे,सार्थक सरवदे, प्रणाली भोसले या विद्यार्थ्यांनी गुणवत्ता यादीमध्ये स्थान मिळवून यश संपादन केले.सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे मार्गदर्शक डॉ.नंदकुमार होनराव,संस्थापक अध्यक्ष डॉ. संतोष वलगे,शिक्षण विस्तार अधिकारी दशरथ मोरे,सचिव अश्वराज वाघ,खजिनदार विक्रम भिंगारे,प्रकल्प संचालिका वासंती वलगे,उप मुख्याध्यापक कुणाल निंबाळकर यांनी अभिनंदन केले.यशस्वी विद्यार्थ्यांना स्वाती चव्हाण,सचिन डोके,साईनाथ कुंभार,माऊली मोकळे,स्विता पांढरे,विद्या पाटील यांचे मार्गदर्शन लाभले.



# पोलिस ठाण्यासमोर दारु पिऊन गोंधळ घालणारा तरुण पोलिसांच्या जाळ्यात

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ३ जुलै-**
पोलीस ठाण्याच्या अगदी समोरच दारूच्या नशेत धिंगाणा घालून सार्वजनिक ठिकाणी शांतता भंग करणाऱ्या एका इसमास बार्शी शहर पोलिसांनी रंगेहात ताब्यात घेतले आहे. आनंद सुग्रीव कलाकार (वय ३१, रा. आर.टी.ओ. ऑफिसजवळ, सोलापूर) असे आरोपीचे नाव असून त्याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना गुरुवारी बार्शी शहर पोलीस ठाण्यासमोर घडली.

बार्शी शहर पोलीस ठाण्याचे पोलिस अंमलदार सचिन सोमनाथ राऊत व त्यांचे सहकारी पोलीस ठाण्याचे कामकाज करत असताना, दुपारी एकच्या सुमारास पोलीस ठाण्याच्या बाहेरुन अचानक मोठ्याने आरडाओरडा करीत असल्याचा आवाज आला. पोलिसांनी बाहेर येऊन पाहिले असता, एक इसम दारुच्या नशेत झिंगलेल्या अवस्थेत मोठ्याने आरडाओरडा करुन गोंधळ घालत असल्याचे दिसून आले. पोलीसांनी तातडीने त्या ठिकाणी जाऊन सदर इसमाला ताब्यात घेतले. त्याचे नाव-गाव विचारले असता तो दारूच्या नशेत काहीही बडबड करत होता व त्याच्या तोंडातून मद्याचा तीव्र वास येत होता. पोलिसांनी त्याला विश्वासात घेऊन विचारपूस केली असता त्याने आपले नाव आनंद सुग्रीव कलाकार, रा. सोलापूर असे सांगितले.

पोलीस अंमलदार सचिन राऊत यांनी सहकारी पोकों आकुलवार यांच्या मदतीने त्याला वैद्यकीय तपासणीसाठी ग्रामीण रुग्णालय येथे नेले. तेथील वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणी करुन सदर व्यक्ती दारु पिलेला असल्याबाबतचे प्रमाणपत्र दिले. सार्वजनिक ठिकाणी दारु पिऊन गैरशिस्तीने वागल्याबद्दल पोलीस अंमलदार सचिन सोमनाथ राऊत यांच्या फिर्यादीवरून आरोपीविरुद्ध बार्शी शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# रोटरी क्लबतर्फे चार्टर्ड अकाउंटंट, कृषी दिन व डॉक्टर्स डे उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**मोडनिंब, दि.३ जुलै -**
रोटरी क्लब ऑफ मोडनिंबच्या २०२६-२७ वर्षासाठी अनिल शिंदे यांनी अध्यक्षपदाची, तर डॉ. प्रशांत कोल्हे यांनी सचिवपदाची सूत्रे स्वीकारली.

शहरातील का. पू. गोळवलकर वाचनालय येथे रोटरी क्लबच्या वतीने चार्टर्ड अकाउंटंट दिन, कृषी दिन आणि डॉक्टर्स डे एकत्रितपणे साजरा केला. समाजाच्या विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या सनदी लेखापाल, प्रगतशील शेतकरी आणि डॉक्टरांचा सन्मान करण्यात आला. नवीन अध्यक्ष अनिल शिंदे यांनी रोटरीच्या माध्यमातून सामाजिक, शैक्षणिक व कृषिविषयक उपक्रम अधिक प्रभावीपणे राबविण्याचा संकल्प व्यक्त केला. डॉ गोळवलकर, डॉ. सुरेश व्यवहारे डॉ.भोसले, डॉ.वागज, डॉ. संतोष दळवी, डॉ. मनीषा दळवी, डॉ. विजय खडके, डॉ. प्रशांत कोल्हे, डॉ. निशा कोल्हे, डॉ. हर्षल गायकवाड, डॉ. रुपेश सुर्वे, डॉ. समीर गोळवलकर, डॉ. गव्हाणे, डॉ.रणजीत जाधव यांचा डॉक्टर्स डेनिमित्त सन्मान केला. चार्टर्ड अकाउंटंट यश गांधी, इको क्लबचे अध्यक्ष तानाजी इंगळे, शेतकरी प्रतिनिधी म्हणून ऋषी कोठावळे मोडनिंब, बालाजी माळी सोलंकरवाडी यांचा सन्मान केला. सचिव डॉ. प्रशांत कोल्हे यांनी संबोधित केले. सत्कार मूर्तीनीही विचार मांडले. कार्यक्रमास सरपंच डॉ. मनीषा दळवी, रो. डॉ. संतोष दळवी, निलेश गिड्डे, सुनील रेपाल,दीपक सुर्वे,प्रल्हाद साळुंके, तालुका कृषी पदवीधर समाजसेवी संघटनेचे संजय पाटील, नामदेव चिंतामणी, यशवंत भोसले, मनोज शहा, संतोष सुर्वे यासह पदाधिकारी, सभासद, मान्यवर तसेच विविध क्षेत्रातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रास्ताविक अनिल शिंदे यांनी तर, सूत्रसंचालन माजी जि. प. अध्यक्षा डॉ. निशिगंधा कोल्हे यांनी केले. आभार डॉ. प्रशांत कोल्हे यांनी मानले.

### श्रीधरराव मार्तंडे यांच्या स्मृती दिनानिमित्त उद्या रक्तदान शिबीर

**उत्तर सोलापूर, दि. ३ जुलै-**
राज्य कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी संचालक कै.श्रीधररावजी मार्तंडे यांच्या २१ व्या स्मृती दिनानिमित्त रविवार दि. ५ रोजी मार्डी येथील पेठेतील मारुती मंदिरात रक्तदान शिबीर आयोजित केले असून यावेळी दहावी-बारावीतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार, विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य व गणवेश वाटप आदी कार्यक्रमही घेण्यात येणार असल्याची माहिती सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक व कै.श्रीधररावजी मार्तंडे प्रतिष्ठानचे अध्यक्ष अविनाश मार्तंडे यांनी दिली.

शिबीराचे नियोजन करण्यासाठी ग्रामस्थांची बैठक घेण्यात आली. त्यावेळी ते बोलत होते. नागेश स्वामी महाराज, बाळासाहेब देशमुख, रेवणसिद्ध कापसे, मकबुल ढेकुळकर, रंगनाथ तोडकर, नामदेव गवळी, एम.एस.विटकर, प्राचार्य सुजित इनामदार, संजयसिंग सदिवाल, संभाजी पाटील उपस्थित होते. यावेळी प्रकाश खेलबुडे, दीपक मार्तंडे, प्रा.शाहुराजे पाटील, कुमार भाकरे, राजेंद्र मठे यांचीही भाषणे झाली. पत्रकार दत्ता मोकाशी यांनी प्रास्तविक केले.

# शिवशरण खेडगी यांच्या पुण्यस्मरणानिमित्त निबंध स्पर्धा

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ३ जुलै-**
अक्कलकोट एज्युकेशन सोसायटीचे दिवंगत चेअरमन तथा दानशूर शिक्षण महर्षी कै. शिवशरण खेडगी यांच्या चौथ्या पुण्यस्मरणानिमित्त सी.बी. खेडगी महाविद्यालयात निबंध स्पर्धेच्या उद्घाटन समारंभाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अक्कलकोट एज्युकेशन सोसायटीच्या संचालिका ज्योती धरणे उपस्थित होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून मराठी विषयाचे सेवानिवृत्त प्रा. शरणप्पा अचलेर उपस्थित होते. प्रास्ताविक प्रा. संध्या परांजपे यांनी केले. निबंध स्पर्धेसाठी कै. शिवशरण खेडगी यांचे जीवनकार्य, सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक व राजकीय कार्य हे विषय देण्यात आले होते. विद्यार्थ्यांना मराठी, हिंदी, इंग्रजी आणि कन्नड भाषेत निबंध लेखनाची संधी देण्यात आली होती. प्रमुख पाहुणे प्रा. शरणप्पा अचलेर यांनी आपल्या मार्गदर्शनात कै. शिवशरण खेडगी यांच्या कार्याचा आढावा घेतला. यावेळी महाविद्यालयाचे सेवानिवृत्त पर्यवेक्षक प्रा. संजय कलशेट्टी यांनीही कै. शिवशरण खेडगी यांच्या कार्याचा गौरवपूर्ण आढावा घेतला. कार्यक्रमास प्राचार्य डॉ. गुरुलिंगप्पा धबाले, प्रा. जयश्री बिराजदार, डॉ. विठ्ठल वाघमारे, डॉ. चौडप्पा आणेकर, प्रा. संध्या इंगळे उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा. अभिजीत कुंभार यांनी केले तर प्रा. वैभव पाटील यांनी आभार मानले.

# बार्शीतील दुष्काळग्रस्त गावांसाठी ०.६६ टीएमसी पाण्याची मागणी

## शासनस्तरावर मंत्री विखे-पाटील यांचे बैठकीचे आश्वासन

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ३ जुलै-**
बार्शी तालुक्यातील धोत्रे ते यावली या दरम्यानच्या २१ दुष्काळग्रस्त गावांना बार्शी उपसा सिंचन योजनेतून बचत होणारे ०.६६ टीएमसी पाणी उपलब्ध करून देण्यासाठी शासनस्तरावर तातडीने बैठक आयोजित करावी, अशी मागणी आमदार राजेंद्र राऊत यांनी महाराष्ट्राचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात धोत्रे ते यावली हा परिसर दुष्काळग्रस्त व उंचावरील असल्याने येथील शेती प्रामुख्याने जिरायती असून सिंचनाची कोणतीही प्रभावी व्यवस्था नसल्याचे नमूद करण्यात आले आहे. बार्शी उपसा सिंचन योजनेची वितरण व्यवस्था बंद पाईपलाईनद्वारे होत असल्यामुळे बचत होणारे ०.६६ टीएमसी पाणी तावडी तलावात सोडून तेथून उचल योजनेच्या माध्यमातून तावडीच्या माळावर आणल्यास बंद पाईपलाईनद्वारे २१



गावांतील सुमारे ५,५८३ हेक्टर क्षेत्राला सिंचनाचा लाभ मिळू शकणार असल्याचे निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे.तसेच बार्शी तालुक्यातील पिंपळगाव (ढाळे) मध्यम प्रकल्पाचा प्रकल्पीय पाणीसाठा ०.४५ टीएमसी असला तरी प्रत्यक्षात उपलब्ध पाणी अत्यल्प असल्याने अनेक गावांना आजपर्यंत अपेक्षित सिंचनाचा लाभ मिळालेला नाही. या प्रकल्पात अतिरिक्त पाणी सोडल्यास काळेगाव, इर्ले व यावली येथील बंधाऱ्यांमध्ये पाणी साठवता येईल. त्यामुळे परिसरातील गावांना सिंचनाबरोबरच पिण्याच्या पाण्याचाही मोठा लाभ होणार असल्याचे आमदार जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांच्याकडे आमदार राजेंद्र राऊत यांचे निवेदन राऊत यांनी निदर्शनास आणून दिले. या योजनेचा प्रस्ताव कृष्णा खोरे विकास महामंडळाकडे प्रलंबित असून त्यास मंजुरी देण्यासाठी तसेच प्राथमिक सर्वेक्षण करून अहवाल सादर करण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांची बैठक तातडीने बोलावण्याची विनंतीही करण्यात आली. यावर सकारात्मक प्रतिसाद देत जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी लवकरच शासनस्तरावर संबंधित अधिकाऱ्यांची बैठक आयोजित करण्यात येईल, असे आश्वासन दिल्याची माहिती आमदार राऊत यांनी दिली.

# आपला जिल्हा

**सोलापूर तरुण भारत**, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## नावाड्याच्या मुलाचे पोलिस भरतीत यश

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ३ जुलै-**

चंद्रभागा नदीत नाव किंवा होडी चालविणारे उत्तम परचंडे यांचा मुलगा शिवप्रसाद याची नुकत्याच झालेल्या महाराष्ट्र पोलिस विभागाच्या कारागृह उपमहानिरीक्षणालय,पश्चिम विभाग येरवडापुणे यांनी घेतलेल्या परीक्षेत कारागृह शिपाई भरतीत निवड झाली.

शिवप्रसाद हा देखील आपल्या वडीलांना होडी चालविण्यासाठी मदत करत शालेय, महाविद्यालयीन शिक्षण करत पोलिस भरतीसाठी प्रशिक्षण घेत होता. जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर कोणतेही स्वप्न पूर्ण करता येते याचे प्रेरणादायी उदाहरण त्याने कष्ट करणाऱ्या कोळीसमाजातील होडीचालकांच्या मुलांसमोर ठेवले आहे.

शिवप्रसादची निवड झाल्याबद्दल येथील होडी चालक-मालक संघटनेचे अध्यक्ष सतिश नेहतराव, उपाध्यक्ष अनिल अभंगराव, सचिव उमेश संगितराव आदींनी त्याचा चंद्रभागा नदी पात्रातील श्री पुंडलिक मंदिर येथे सत्कार करून अभिनंदन केले. यावेळी देवस्थानचे ट्रस्टी मारुती संगीतराव, नितिन अधटराव, मुकुंद नेहतराव, महादेव अधटराव व कोळी समाजाचे होडी चालक उपस्थित होते.



### महत्त्वाचे...



## पंकज काटकर मित्र परिवारातर्फे वोरोनोको शाळेत शैक्षणिक साहित्य वाटप

**सोलापूर, दि. ३ जुलै -**

पंकज काटकर मित्र परिवारातर्फे वोरोनोको शाळेत गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना आमदार विजयकुमार देशमुख यांच्या हस्ते बॅग व वह्या वाटप करण्यात आले. यावेळी वोरोनोको शाळेतील ४० गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना वह्या वाटप व १० गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना बॅग वाटप करून विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी मदत करण्यात आले. यावेळी पंकज काटकर, प्रसाद झुंजे, महादेव पवार, सुभाष पवार, प्रसाद कुलकर्णी, ओंकार यादव, पंकज, राहुल गायकवाड, मुख्याध्यापिका प्रभुणे व पंकज काटकर मित्र परिवार आदी उपस्थित होते.



## दशरथ वाघमोडे यांनी स्वीकारला माळशिरस पोलिस ठाण्याचा पदभार

**माळशिरस, दि. ३ जुलै -**

दशरथ वाघमोडे यांनी माळशिरस पोलिस ठाण्याचा पदभार स्वीकारला आहे. पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक विकास दिंडोरे यांची नुकतीच बदली झाल्याने रिक्त झालेल्या पोलिस निरीक्षकपदाचा पदभार दशरथ वाघमोडे यांनी स्वीकारला. दशरथ वाघमोडे गेल्या २२ वर्षांपासून पोलिस सेवेत आहेत. त्यांनी लातूर, गडचिरोली, पुणे, सोलापूर या जिल्ह्यात अनेक पोलिस स्टेशनला यापूर्वी काम केले आहे. यावेळी बोलताना त्यांनी कायद्याच्या अधीन राहून सर्वसामान्य नागरिकांच्या हक्कांना प्राधान्य देत काम करणार आहे. पोलिस व नागरिक यांच्यात समन्वय ठेवत गुन्ह्याचे प्रमाण कमी करणार असल्याची माहिती त्यांनी पत्रकारांसोबत बोलताना दिली. यावेळी एल. डी. वाघमोडे, अनंत दोशी, श्रीमंत बनकर, अशोक सिदवाडकर, नागेश होनराव आदी मान्यवर उपस्थित होते.



## प्रा. अंजली पिसे यांना पीएच.डी. पदवी प्राप्त

**पंढरपूर, दि. ३ जुलै -**

सावित्रीबाई फुले शिक्षण प्रसारक मंडळ संचलित एस. के. एन सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग पंढरपूर येथील इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन विभागातील प्राध्यापिका अंजली पिसे यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर, सोलापूर विद्यापीठ, सोलापूर येथून इलेक्ट्रॉनिक्स अभियांत्रिकी विषयात पीएच.डी. पदवी संपादन केली आहे, अशी माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. कैलाश करांडे यांनी दिली की आहे. त्यांच्या संशोधन कार्याचे शीर्षक 'एनर्जी एफिशियंट ऑप्टिमल क्लस्टर बेस्ड राऊटिंग प्रोटोकॉल इन व्हेहिक्युलर अँड-हॉक नेटवर्क्स'असे आहे. या संशोधनात व्हॅनेटसाठी ऊर्जा-कार्यक्षम क्लस्टर-आधारित राउटिंग प्रोटोकॉल विकसित केला आहे. एस. के. एन. सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनियरींग, कोर्टी, या रिसर्च सेंटरमधून मार्गदर्शक म्हणून प्राचार्य डॉ. कैलाश करांडे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.यशाबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य करांडे, उपप्राचार्य डॉ. स्वानंद कुलकर्णी, विभागप्रमुख डॉ.अल्ताफ मुलाणी, सर्व प्राध्यापक व कर्मचाऱ्यांनी पिसे यांचे अभिनंदन केले.

## पिलीव डॉक्टर्स असोसिएशनच्या अध्यक्षपदी डॉ. निलेश कांबळे

**पिलीव, दि. ३ जुलै -**

माळशिरस तालुक्यातील पिलीव येथील सर्व डॉक्टरांची नुकतीच पिलीव येथे ज्येष्ठ डॉक्टर दादासाहेब खरात यांच्या अध्यक्षतेखाली नुतन पदाधिकारी निवडीसाठी बैठक झाली. यावेळी सर्वानुमते पिलीव डॉक्टर्स असोसिएशनच्या अध्यक्षपदी डॉ. निलेश कांबळे यांची तर उपाध्यक्षपदी वनिता माने-देशमुख यांचीनिवड झाली. खजिनदारपदी अर्चना मगर, सचिवपदी डॉ. सागर जाधव, सहसचिवपदी डॉ. सागर राऊत यांच्या बिनविरोध निवडी करण्यात आल्या. बैठकीस डॉ. मिलिंद वाघमारे, डॉ. मिलिंद गुळभिले, डॉ. अनंत डिकोळे, डॉ. शशिकांत मगर, डॉ. संतोष माने- देशमुख, डॉ. दिलीप पवार, डॉ. तुषार गुळभिले, डॉ. शुभांगी डिकोळे, डॉ.सायना गुळभिले, डॉ. कुचेकर उपस्थित होते. यावेळी सर्व नुतन पदाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला.

# नमामि चंद्रभागा योजना केवळ कागदावरच?

### चंद्रभागेच्या पात्रात घाणीचे साम्राज्य; वाळवंटातील अतिक्रमण आणि पात्रातील दूषित पाण्याने भाविक त्रस्त

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.३ जुलै -**

श्री विठ्ठल-रुक्मिणीच्या आषाढी यात्रेसाठी राज्याच्या कानाकोपऱ्यातून संतांच्या पालख्या पंढरीच्या दिशेने म र्गस्थ झाल्या आहेत. ज्ञानोबा, तुकोबांचे पालखी सोहळे चार दिवसात पंढरपूरकडे प्रस्थान ठेवणार आहेत. लाखो वारकरी आणि भाविकांची पंढरपुरकडे येण्याची आस लागली आहे. मात्र, या पार्श्वभूम िवर पवित्र चंद्रभागा नदीपात्राची अत्यंत दयनीय अवस्था समोर आली आहे. नदीपात्रात कचऱ्याचे ढीग, दूषित पाणी आणि वाळवंटातील अतिक्रमण यामुळे भाविकांमधून तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

राज्य शासनाकडून आषाढी यात्रेच्या नियोजनासाठी आणि पंढरपूर शहराच्या विकासासाठी दरवर्षी मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध करून दिला जात असतो. मात्र असे असतानाही चंद्रभागा नदीपात्र आणि वाळवंटाची झालेली दुरवस्था प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण करत आहे. सध्या नदीपात्र आणि वाळवंट परिसरात मोठ्या प्रमाणावर म ोकाट जनावरे मुक्तपणे फिरताना दिसत आहेत. त्यामुळे अनेक ठिकाणी अस्वच्छता निर्माण झाली असून जागोजागी कचऱ्याचे ढीग साचले आहेत. नदीपात्रात झालेल्या अवैध वाळू उपशामुळे अनेक ठिकाणी खोल खड्डे पडले असून भाविकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे.

याशिवाय चंद्रभागा वाळवंट, मंदिर परिसर आणि घाटांवर विविध प्रकारची अतिक्रमणे वाढली आहेत. घाटांची दुरवस्था, तुटलेले पायऱ्या, अपुरी स्वच्छता आणि मूलभूत सुविधांचा अभाव यामुळे भाविकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. विशेषतः महिला भाविकांसाठी स्वतंत्र व सुरक्षित चेंजिंग रूमची सुविधा नसल्याने त्यांची मोठी गैरसोय होत आहे. दरम्यान, चंद्रभागा नदीपात्रात दूषित पाणी साचल्याने अनेक भाविक धार्मिक परंपरेनुसार त्याच पाण्यात स्नान करताना दिसून येत आहेत. मात्र, दूषित पाण्यामुळे संसर्गजन्य आजारांचा धोका निर्माण होण्याची शक्यता व्यक्त होत आहे. त्यामुळे भाविकांच्या आरोग्याचा गंभीर प्रश्न ऐरणीवर आला आहे.

राज्यभरातून येणाऱ्या वारकरी आणि भाविकांनी आषाढी यात्रेपूर्वी चंद्रभागा नदीपात्र, घाट आणि वाळवंट परिसराची तातडीने स्वच्छता करण्यात यावी, घाट आणि वाळवंटातील अतिक्रमणे हटवावीत, कचरा साफ करून आवश्यक नागरी सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी जोर धरू लागली आहे.



> लाखो भाविकांच्या श्रद्धेचे केंद्र असलेल्या पंढरपूरची प्रतिमा जपण्यासाठी तसेच माता चंद्रभागेच्या स्वच्छतेसाठी नमामी चंद्रभागा योजनेचे कागदोपत्री नियोजन न करता त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी करुन कृती साधावी.
> **- निर्मला जाधव - भाविक, अहिल्यानगर.**

> आषाढी यात्रेला अवघे काही दिवस शिल्लक आहेत. त्यामुळे प्रशासनाने तातडीने लक्ष घालून चंद्रभागा नदीपात्राची स्वच्छता, घाटांची दुरुस्ती, दूषित पाण्याचा प्रश्न आणि भाविकांसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून द्याव्यात.
> **- आण्णा सोनटक्के - भाविक,धाराशिव.**

> आषाढी यात्रा तोंडावर आली असताना चंद्रभागा वाळवंटात मोठ्या प्रमाणावर घाणीचे साम्राज्य निर्माण झाले आहे. तसेच नदीपात्रातील दूषित पाण्यामुळे भाविकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. आषाढी यात्रेपूर्वी चंद्रभागा नदी पात्र स्वच्छ करून चंद्रभागेत भाविकांना स्नान करण्यासाठी स्वच्छ पाणी सोडण्यात यावे.
> **- ज्ञानोबा मोकाशी. भाविक, पुणे.**



## माळशिरस तालुक्यातील मेंढपाळ परतीच्या मार्गावर

### चारा, पाण्याचा प्रश्न मिटला; डोंगर भागात समाधानकारक पाऊस

**तभा वृत्तसेवा,**
**माळशिरस, दि. ३ जुलै -**

तालुक्याच्या पश्चिम भागातील, गारवाड, रेडे, भांब, जळभावी भागात जून महिन्यात समाधानकारक पाऊस झाल्याने नाले, ओढ्यांना पाणी आले आहे. तसेच डोंगर माथ्यावर गवत आल्याने मेंढरे चारण्यासाठी बाहेर गेलेले मेंढपाळ गावाकडे परतू लागले आहेत.

तालुक्याचा पश्चिम भाग हा दुष्काळी भाग म्हणून ओळखला जातो. या भागातील शेती क्षेत्र संपूर्ण पावसावर अवलंबून आहे. त्यामुळे या भागातील शेतकऱ्यांचा शेतीबरोबर मेंढपाळाचा व्यवसाय आहे. दरवर्षी चारा व पाण्याचा प्रश्न निर्माण झाल्यानंतर मेंढपाळ मराठवाडा, सातारा भागात मेंढरे चारावयास घेऊन जातात. पावसानंतर गावाकडे परतात. जून महिन्यात ८३ मि.मी. पाऊस झाल्याची नोंद असली तरी या डोंगर भागात सम ाधानकारक पाऊस झाला आहे. ओढे वाहिले आहेत. बंधारे, तलावात पाणी आले आहे. पावसामुळे डोंगर माथ्यावर गवत उगवले आहे. त्यामुळे चाऱ्याचा व पाण्याचा प्रश्न मिटला आहे.त्यामुळे मेंढपाळ गावाकडे परतू लागले आहेत.

> **मेंढरांची सोय झाल्याने परतलो**
> माझा शेतीबरोबर मेंढपाळाचा व्यवसाय आहे. समाधानकारक पाऊस झाल्याने, चारा व पाण्याचा प्रश्न मार्गी लागल्याने गावाकडे परत आलो आहे.
> **- महादेव सरगर, जळभावी.**

## सोपल गटाचे नगरसेवक पठाण यांचे पद धोक्यात

### जास्त अपत्य असल्याने जिल्हा प्रशासनाकडून नोटीस

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ३ जुलै -**

नगरपरिषद निवडणूकीत प्रभाग क्र.२० मधून शिवसेना उबाठा (आमदार सोपल) गटाचे नगरसेवक मुजम्मील पठाण यांचे पद जास्त अपत्य असल्याने रद्द होणार आहे.

मुजम्मील पठाण यांना तीन अपत्य असल्यामुळे ते महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ च्या कलम १६ अन्वये नगरसेवक पदासाठी अपात्र आहेत. त्यामुळे त्यांचे पद रद्द करावे, अशी मागणी माजी नगरसेवक ॲड. महेश जगताप यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे अर्जाद्वारे केली आहे.

शासन नियमानुसार कोणत्याही सार्वत्रिक निवडणूकीत तीन अपत्य असणाऱ्या व्यक्तीस निवडणूक लढवता येत नाही.

परंतु वास्तविक नगरसेवक मुजम्मील पठाण यांना तीन अपत्य असतानाही त्यांनी निवडणूक आयोगासह, शासनाची फसवणूक करुन निवडणूक लढवत ती जिंकलीही आहे. त्यामुळे नगरपरिषद व नगरपंचायती कायद्यान्वये त्यांचे नगरसेवक पद रद्द व्हावे, अशी मागणी महेश जगताप यांनी केली आहे.

नगरपरिषद प्रशासन अधिकारी आशिष लोकरे यांनी ॲड. जगताप यांच्या अर्जाचा संदर्भ देत नगरसेवक मुजम्मील पठाण यांना सात दिवसाच्या आत आपले म्हणणे मांडून खुलासा करावा अशी नोटीस दि. १ जुलै रोजी दिली आहे. याबाबत प्रभाग क्र. २० सह बार्शी शहरातील नागरिक हवालदिल झाले आहेत. पठाण यांचे नगरसेवक पद जाणार का? याबाबत शहरवासीयांत उत्सुकता लागली आहे.

नगरसेवक मुजम्मील पठाण यांनी केलेले दखलपात्र फौजदारी गुन्हयाबाबतही जगताप हे कायदेशीर फौजदारी कारवाई करणार असल्याची माहिती मिळालेली आहे.

## शिक्षकास अपमानास्पद शब्द; शिक्षकांकडून माढ्यात निषेध

**तभा वृत्तसेवा,**
**माढा, दि. ३ जुलै -**

देवगड कणकवली येथे बीएलओ प्रशिक्षणास आलेल्या शिक्षकास उपविभागीय अधिकारी जगदीश कातकर यांच्याकडून अपमानास्पद शब्द वापरल्याबद्दल महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती माढा तालुका उपशाखा यांच्यावतीने तहसीलदारांना निवेदन देऊन निषेध व्यक्त केला आहे.



बीएलओ म्हणून नियुक्त शिक्षक कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण देवगड येथे २५ जून रोजी सुरु होते. सकाळच्या सत्रातील शालेय कामकाज पूर्ण करून शिक्षक ११ वाजता दुपारी संबंधित शिक्षकाला भुकेमुळे अस्वस्थ वाटू लागले. प्रशिक्षणातून छोटी सुट्टी देण्याची विनंती मतदार नोंदणी अधिकारी जगदीश कातकर यांच्याकडे केली. मात्र त्यांनी अपमानास्पद शब्दाने संबोधित केले. त्यामुळे संबंधितावर तात्काळ कठोर कारवाई व्हावी तसेच विद्यार्थ्यांच्या अध्यापनावर विपरित परिणाम करणाऱ्या बीएलओ कामातून शिक्षकांना मोकळे करावे अशी मागणी ही या निवेदनातून केली आहे.

यावेळी शिक्षक समितीचे विष्णू बोबडे, विजयकुमार मुकणे, तालुका अध्यक्ष कैलास काशिद,सरचिटणीस विनोद परिचारक, सुरेश माळी, बाळासाहेब शिंदे, हरी माने, अविनाश भोसले, सुरेश कांबळे, सौदागर खताळ, पांडुरंग शिंदे, सचिव प्रशांत होवाळ, राजीव साळुंके, दिलावर तांबोळी, सचिन पवार, रामदास कदम आदी उपस्थित होते. महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीकडून राज्यभरातून निवेदन देत असल्याचे म्हटले आहे.

# वळसंगमध्ये ग्रामनिधीतून कॉंक्रिट रस्त्याच्या कामास प्रारंभ

### प्रशासनाला अखेर आली जाग; तरुण भारतच्या वृत्ताची दखल

**तभा वृत्तसेवा,**
**वळसंग, दि. ३ जुलै -**

दैनिक तरुण भारतमध्ये वळसंग (ता. दक्षिण सोलापूर) येथील सांडपाण्याच्या समस्येबाबत प्रसिद्ध झालेल्या वृत्तानंतर प्रशासनाला अखेर जाग आली आहे. वळसंग येथील वार्ड क्र. ३ मधील आचेगाव रोड ते बसवेश्वर मंदिर पर्यंतच्या सी.सी. (कॉंक्रिट) रोडच्या काम ाचा आज अत्यंत प्रारंभ करण्यात आला.




काही दिवसांपूर्वीच या परिसरात रस्त्यावर सांडपाणी साचल्यामुळे नागरिक आणि विद्यार्थ्यांचे आरोग्य धोक्यात आले होते. तरुण भारतने या गंभीर समस्येकडे प्रशासनाचे लक्ष वेधत सविस्तर वृत्त प्रसिद्ध केले होते. बातमीची तात्काळ दखल घेत सरपंच जगदीश आंटद यांनी तातडीने निर्णय घेतला आणि ग्रामनिधीतून या रस्त्याच्या कामाला मंजुरी दिली.

रस्त्याचे आणि बंद गटारीचे काम सुरू करण्यासाठी प्रत्यक्ष घटनास्थळी भूमिपूजन करण्यात आले. ग्रामपंचायत सदस्य विनोद सुरपुरे यांच्या हस्ते पारंपरिक पद्धतीने नारळ फोडून या काम ाची अधिकृत सुरुवात करण्यात आली. याप्रसंगी ग्रामपंचायत सदस्य शालम अमलीचुंगे, अनिल बर्वे, सिद्धाराम वाघमारे, मलकाप्पा कोडले, श्रीशैल भुसणगी, इसाक अत्तार, खंडू वाघमारे आदी मान्यवर आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## डॉक्टर, कृषि व सी.ए. दिनानिमित्त लायन्स क्लब ऑफ अक्कलकोटतर्फे मान्यवरांचा गौरव



**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ३ जुलै -**

डॉक्टर डे, कृषिदिन व सी.ए. डे निमित्त लायन्स क्लब ऑफ अक्कलकोट यांच्या वतीने विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे आयोजन क्लबचे अध्यक्ष ला. अभय खोबरे यांच्या नेतृत्वाखाली केले. अक्कलकोट शहराचे नगराध्यक्ष मि लन कल्याणशेट्टी यांच्याहस्ते डॉ. संतोष मोटे (डायबेटॉलॉजिस्ट), डॉ. मल्लिनाथ पाटील, डॉ. श्रीकांत पाटील, डॉ. अमरदीप कंदले व डॉ. दीपा कंदले यांचा सन्मान झाला.

प्रगतशील शेतकरी जोकारे, टोमॅटो किंग जोकारे तसेच प्रमोद पाटील या प्रगतशील शेतकऱ्यांचाही गौरव करण्यात आला. सोलापूरचे सी.ए. राच्चा व सी.ए. ओम कार उटगे यांचा सत्कार केला. कार्यक्रमास माजी प्रांतपाल राजशेखर कापसे, प्रभाकर मजगे, शिरीष पंडित, लायन्स स्कूल कमिटीचे चेअरमन राजेंद्र हत्ते, गौरीशंकर कल्याणशेट्टी, मल्लीनाथ साखरे, विठ्ठल तेली, सचिव शिवशरण खुबा, सुभाष गडसिंग, मुख्याध्यापिका, शिक्षकवृंद, कर्मचारी व लायन्स क्लबचे पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते. समारोपावेळी डॉ. संतोष मोटे यांनी मधुमेह प्रतिबंधाविषयी मार्गदर्शन केले